# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ४५

## सभावृत्तांत

दिनांक - २०.६.२०१५ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जुन-२०१५ ची मासिक मा. महापालिका सभा शनिवार दि.२०.६.२०१५ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.थोरात वनिता एकनाथ
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.जगदीश शेट्टी
१७. मा.बाबर शारदा प्रकाश
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२०. मा.उल्हास शेट्टी
२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२२. मा.पवार संगीता शाम

२३. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२६. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२७. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२८. मा.भारती फरांदे

२९. मा.आर.एस.कुमार

३०. मा.जावेद रमजान शेख

३१. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

३२. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३३. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३४. मा.राजू मिसाळ

३५. मा.नंदा विकास ताकवणे

३६. मा.नेटके सुमन राजेंद्र

३७. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३८. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३९. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

४०. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

४१. मा.लोंढे गणेश नारायण

४२. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४३. मा.†›. संदीप गुलाब चिंचवडे

४४. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४५. मा.अनंत सुभाष को-हाळे

४६. मा.प्रसाद शेट्टी

४७. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४८. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४९. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५०. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५१. मा.वाबळे संजय मल्हारराव

५२. मा.मडिगेरी वर्षा विलास

५३. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५४. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५५. मा.सुपे आशा रविंद्र

५६. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५७. मा.मोहिनीताई विलास लांडे

५८. मा.अजित दामोदर गव्हाणे

५९. मा.गोफणे अनुराधा देविदास

६०. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६१. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६२. मा.महेशदादा किसन लांडगे

६३. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६४. मा. †›. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६५. मा.लोंढे शुभांगी संतोष

६६. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६७. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६८. मा.सावळे सिमा रविंद्र

६९. मा.भोसले राहूल हनुमंतराव

७०. मा.पालांडे सुजाता सुनिल

७१. मा.बहल योगेश मंगलसेन

७२. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७३. मा.कदम सदगुरु महादेव

७४. मा.गिता सुशील मंचरकर

७५. मा.कैलास महादेव कदम

७६. मा.छाया जगन्नाथ साबळे

७७. मा.आसवाणी सविता धनराज

७८. मा.वाघेरे सुनिता राजेश

७९. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८०. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८१. मा .ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८२. मा.काळे विमल रमेश

८३. मा.पाडाळे निता विलास

८४. मा.विनोद जयवंत नढे

८५. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८६. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८७. मा.विमलताई सुरेश जगताप

८८. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८९. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९०. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

९१. मा.बारणे माया संतोष

९२. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९३. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९४. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९५. मा.कलाटे स्वाती मयुर

९६. मा.नांदगुडे विलास एकनाथ

९७. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९८. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९९. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१००. मा.जवळकर वैशाली राहुल

१०१. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०२. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०३. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०४. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०५. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१०६. मा.जम सोनाली पोपट

१०७. मा.प्रशांत शितोळे

१०८. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१०९. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११०. मा.गायकवाड संध्या सुरदास

१११. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११२. मा.शेंडगे आशा सुखदेव

११३. मा.मोटे किरण बाळासाहेब

११४. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११५. मा.संजय केशवराव काटे

११६. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

११७. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

११८. मा.पाटील सुजित वसंत

११९. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.गावडे - सह आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.पाटील-सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडुसकर, मा.माने, मा.दंडवते, मा.दुरगुडे मा.खोसे-सहा.आयुक्त, मा.उबाळे- प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.निकम, मा.इंगळे, मा.साळवी, मा.पठाण, मा.औंबासे, मा.शेख - कार्यकारी अभियंता, मा.लावंड - कायदा अधिकारी, मा.वाघमारे- पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) मा.राज्य शासनाने निर्गत केलेली स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५ ची अधिसूचना व्यापा-यांचे माहितीकरीता महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. तसेच स्थानिक संस्था कर क्षेत्रीय कार्यालयाशी संपर्क साधून व्यापा-यांना योजनेची माहिती घेता येणार असल्याने त्याचे अवलोकन करणेबाबतचा तातडीचे कामकाजासंबंधातील मा.स्थायी समिती ठ.क्र.११७६९ दि. १६/६/२०१५ सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.स्थायी समितीची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

२) खडकी गावातुन बोपखेल करीता रस्ता करणेकामी मान्यतेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

३) शालाबाहय मुलांचे सर्वेक्षणाबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, मणिपूर येथील दहशतवादी हल्ल्यात शहिद झालेले जवान तसेच गोविंदराव आदिक -ज्येष्ठ नेते, कृष्णा अर्जुन घोडा-पालघरचे आमदार, चार्ल्स कोरिआ-प्रख्यात वास्तुविशारद, †›.एकनाथ आवाड - दलित चळवळीतील ज्येष्ठ कार्यशील नेते व साहित्यिक, हेमंत कानिटकर - माजी कसोटीपटू, सुनिल नेसरीकर - मुंबई अग्निशमन दलाचे आगीमध्ये शहिद झालेले मुख्य अग्निशमन अधिकारी, कु.अमित अंकुश वाघेरे, आण्णा धोंडीबा गावडे - माजी नगरसेवक, रविंद्र जगताप - थेरगावमधील रहिवासी यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.नगरसदस्य. चिंचवड गावातील प्रतिष्ठीत आणि आमचे सर्वांचे नेते आण्णा गावडे यांचे काल वृध्दापकाळाने निधन झालेले आहे. या महापालिका सभेत आपण त्यांना श्रध्दांजली वाहत आहोत. परंतु विशेष करुन महापालिका होण्यापुर्वी नगरपालिका होण्यामध्ये ज्या ग्रामपंचायतीचा समावेश केला त्या ग्रामपंचायतीच्या काळामध्ये ते ग्रामपंचायतीवर सभासद म्हणून निवडून आलेले होते. आण्णा गावडे, शंकरभाऊ मुथा, फकीरभाई पानसरे, भिकू वाघेरे, विठोबा लांडे हे सर्व त्या काळामध्ये नेतृत्व करत होते. पिंपरी चिंचवडचा संपुर्ण आराखडा बनविण्यामध्ये, पिंपरी चिंचवड हे शहर उभे करण्यामध्ये आदरणीय आण्णासाहेब मगर यांचा खुप मोठा वाटा आहे व त्यांचे सहकारी म्हणून त्या काळामध्ये आण्णा गावडे यांनी काम केलेले आहे. या आदरणीय व्यक्तीमत्वास माझ्या वतीने व आपणा सर्वांच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते

**मा.महापौर -** श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, आजची सभा आज दि.२०/६/२०१५ रोजी दुपारी ४.३० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.अमिना पानसरे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर -** सन्मा.सदस्यांचे सूचनेप्रमाणे आजची सभा आज दि.२०/६/२०१५ रोजी दुपारी ४.३० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

------

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ४५**

**सभावृत्तांत**

**(दि.२०/६/२०१५ (दु.२.००) ची तहकूब सभा)**

दिनांक - २०.६.२०१५ वेळ - दुपारी ४.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जुन२०१५ शनिवार दि.२०/६/२०१५ (दु.२.००) ची तहकूब मा. महापालिका सभा शनिवार दि.२०.६.२०१५ रोजी दुपारी ४.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर

२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू

४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ

५. मा.भालेकर अरुणा दिलीप

६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने

७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)

८. मा.थोरात वनिता एकनाथ

९. मा.सायकर अजय शंकरराव

१०. मा.जाधव साधना रामदास

११. मा.जाधव राहुल गुलाब

१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

१३. मा.काळजे नितीन प्रताप

१४. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर

१५. मा.जगदीश शेट्टी

१६. मा.बाबर शारदा प्रकाश

१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

१९. मा.उल्हास शेट्टी

२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२१. मा.पवार संगीता शाम

२२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२३. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२४. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२५. मा.भारती फरांदे

२६. मा.आर.एस.कुमार

२७. मा.जावेद रमजान शेख

२८. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२९. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३०. मा.राजू मिसाळ

३१. मा.नंदा विकास ताकवणे

३२. मा.नेटके सुमन राजेंद्र

३३. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३४. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३५. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३६. मा.लोंढे गणेश नारायण

३७. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३८. मा. †›. संदीप गुलाब चिंचवडे

३९. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४०. मा.अनंत सुभाष को-हाळे

४१. मा.पवार मनिषा काळूराम

४२. मा.प्रसाद शेट्टी

४३. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४४. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४५. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४६. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४७. मा.वाबळे संजय मल्हारराव

४८. मा.मडिगेरी वर्षा विलास

४९. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५०. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५१. मा.सुपे आशा रविंद्र

५२. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५३. मा.मोहिनीताई विलास लांडे

५४. मा.अजित दामोदर गव्हाणे

५५. मा.गोफणे अनुराधा देविदास

५६. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

५७. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५८. मा.महेशदादा किसन लांडगे

५९. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६०. मा.लोंढे शुभांगी संतोष

६१. मा.विश्‍वनाथ विठोबा लांडे

६२. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६३. मा.पालांडे सुजाता सुनिल

६४. मा.बहल योगेश मंगलसेन

६५. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६६. मा.कदम सदगुरु महादेव

६७. मा.गिता सुशील मंचरकर

६८. मा.कैलास महादेव कदम

६९. मा.छाया जगन्नाथ साबळे

७०. मा.आसवाणी सविता धनराज

७१. मा.वाघेरे सुनिता राजेश

७२. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७३. मा .ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७४. मा.काळे विमल रमेश

७५. मा.पाडाळे निता विलास

७६. मा.विनोद जयवंत नढे

७७. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

७८. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

७९. मा.विमलताई सुरेश जगताप

८०. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८१. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८२. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

८३. मा.बारणे माया संतोष

८४. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८५. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८६. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

८७. मा.कलाटे स्वाती मयुर

८८. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८९. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९०. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९१. मा.जगताप राजेंद्र गणपत

९२. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९३. मा.जगताप नवनाथ दत्तु

९४. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९५. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

९६. मा.प्रशांत शितोळे

९७. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

९८. मा.गायकवाड संध्या सुरदास

९९. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१००. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०१. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०२. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१०३. मा.संजय केशवराव काटे

१०४. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१०५. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१०६. मा.पाटील सुजित वसंत

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकूर -उपसंचालक नगररचना, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे - सहआयुक्त, मा.पाटील, मा.तुपे - सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडुसकर, मा.माने, मा.खांडकेकर, मा.दंडवते, मा.फुंदे, मा.दुरगुडे, मा.खोसे - सहा.आयुक्त, मा.उबाळे - प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.लावंड - कायदा अधिकारी, मा.दुधेकर, मा.निकम, मा.इंगळे, मा.साळवी, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.दांगट, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गद्दूवार, मा.शेख - कार्यकारी अभियंता, मा.वाघमारे - पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अ) मा.विशेष महापालिका सभा क्रमांक - ४१ दिनांक १७/३/२०१५, १८/३/२०१५ (सकाळी ११.०० व दु.१२.००) व २३/३/२०१५ (दुपारी २.०० व दुपारी ४.३० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ब) मा.महापालिका सभा क्रमांक - ४२ दिनांक २०/३/२०१५ व ६/४/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

क) मा.महापालिका सभा क्रमांक - ४३ दिनांक २०/४/२०१५ व दि.१३/५/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ड) मा.महापालिका सभा क्रमांक- ४४ दिनांक २०/५/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आप/७/कावि/१२/१५ दि.१६/१/२०१५

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र. १११८३ दि.३१/३/२०१५

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.६७२ दि.१३/५/२०१५

सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरिता आकाशचिन्ह जाहिरात कर व जागा भाडे आकारणी दर निश्चित करताना महानगरपालिकेचे उत्पन्नातील समतोल राखणेचे हेतूने जाहिरात कराचे दरात परिशिष्ठ अ प्रमाणे व जागा भाडे दरात परिशिष्ठ ब मध्ये नमूद

केलेप्रमाणे दरनिश्चित प्रस्तावित करणेची मा.आयुक्त यांची मागणी असलीतरी प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार सन २०१४-१५ चे जाहीरात कर व जागा भाड्याचे दर सन २०१५-१६ साठी कायम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते सन २०१५-१६ साठी परवाना फी चे दर प्रतिमहा १५ रु. प्रति चौ.फुट करावेत असा ठराव क्र. ६४१ दि.२६/२/२०१५ अन्वये केलेला आहे. त्यामध्ये दुरुस्ती करुन सन २०१५-१६ साठी परवाना फी चे दर निश्चित करताना सन २०१४-१५ च्या दरामध्ये १५ टक्के वार्षिक वाढ करुन सन २०१५-१६ साठीचे दर निश्चित करण्याच्या दुरुस्तीस मान्यता देणेत यावी.

**मा.आशा सुर्यवंशी -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ६९८ विषय क्रमांक - १

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आप/७/कावि/१२/१५ दि.१६/१/२०१५

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र. १११८३ दि.३१/३/२०१५

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.६७२ दि.१३/५/२०१५

सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरिता आकाशचिन्ह जाहिरात कर व जागा भाडे आकारणी दर निश्चित करताना महानगरपालिकेचे उत्पन्नातील समतोल राखणेचे हेतूने जाहिरात कराचे दरात परिशिष्ठ अ प्रमाणे व जागा भाडे दरात परिशिष्ठ ब मध्ये नमूद केलेप्रमाणे दरनिश्चित प्रस्तावित करणेची मा.आयुक्त यांची मागणी असलीतरी प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार सन २०१४-१५ चे जाहीरात कर व जागा भाड्याचे दर सन २०१५-१६ साठी कायम करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१५-१६ साठी परवाना फी चे दर प्रतिमहा १५ रु. प्रति चौ.फुट करावेत असा ठराव क्र. ६४१ दि.२६/२/२०१५ अन्वये केलेला आहे. त्यामध्ये दुरुस्ती करुन सन २०१५-१६ साठी परवाना फी चे दर निश्चित करताना सन २०१४-१५ च्या दरामध्ये १५ टक्के वार्षिक वाढ करुन सन २०१५-१६ साठीचे दर निश्चित करण्याच्या दुरुस्तीस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/८२/ २०१५ दि.२८/५/२०१५

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र. ११६१६ दि.२/६/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खाजगी मान्यताप्राप्त व मनपाचे स्र्व ५ वी ते १० वी विद्यार्थी / विद्यार्थीनीस मोफत बसपास योजना सन २००९-१० पासून लागू करणेत आली आहे. मागील वर्षी सन २०१४-१५ मध्ये एकुण २०,९३३ विदयार्थ्यांना मोफत बसपास देणेत आलेले असून त्याकामी र.रु.८,६०,४९,९९६/- इतका खर्च आलेला आहे. तरी पुणे महानगरपालिकेत अशाच प्रकारची योजना राबविली जात असलेने सन २०१५-१६ पासून सदरची योजना बंद करुन त्या ऐवजी नवीन सुधारित बसपास योजना लागु करणेस मा.महापालिका सभेची मंजुरी घेणेत आली आहे. सदर योजने अंतर्गत मनपा शाळेतील विदयार्थ्यांना संपुर्ण शैक्षणीक वर्षातील कालावधीसाठी मोफत बसपास दिला जाणार असून इतर खाजगी विदयालयांमधील विदयार्थ्यांना एकुण बसपासच्या रकमे पैकी २५ टक्के रक्कम ही विदयार्थ्यांकडून वसूल केली जाणार आहे. तरी सदर योजनेच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड मनपा मध्ये देखिल सदरची योजना राबविली असता मनपाला अर्थिक बोजा सहन करावा लागणार नाही तसेच पासधारकांची निश्चीत संख्या ही मनपाला प्राप्त होईल जेणे करून दुबार पास, बोगस नावे इ. प्रकारच्या घटना भविष्यात उद्भवणार नाही. तरी पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर मोफत बसपास ची सुधारीत योजना राबवावी असे मत आहे. पीएमपीएमएल यांनी पत्र क्र.पीएमपीएमएल/टी.एम/ ६३९ दि.०८/०५/२०१५ अन्वये इ.५ वी ते १० वीच्या विदयार्थ्यांना पुणे मनपाच्या धर्तीवर धोरण निश्चीत करुन सदरची योजना राबविणे बाबत त्वरीत आदेश मिळणे बाबत कळविले आहे. तरी सदरची योजना राबविणे हा मनपाचा धोरणात्मक निर्णय असलेने त्यास खाली नमूद केलेल्या बाबींवर मा.महापालिका सभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे. (४) यापुर्वी असलेली मोफत बसपास योजना बंद करणेस, (५) सुधारित योजने अंतर्गत मनपा विदयालयातील विदयार्थांना संपुर्ण कालावधीसाठी मोफत बसपास देणेस, (६) मनपा हददीतील खाजगी विदयालयांमधील विदयार्थ्यांकडून एकुण बसपासच्या रकमेपैकी २५% रक्कम चलनाने

मनपा कोषागारात भरुन सदरचे चलन अर्जासोबत पीएमपीएमएलकडे सादर करुन पास घेणे व पीएमपीएमएलने वितरित केलेल्या पासेसच्या रकमेचे बील मनपाकडे सादर करणे व सादर केलेल्या बिलापोटी रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय मंजूर करण्यास हरकत नाही पण यावर आपण चर्चा करावी. हे २० हजार लाभार्थी आहेत. ५ वी ते १० वी पर्यंतच्या विदयार्थ्यांना बसपास देण्याचा ठराव करतो. मला अशी माहिती पाहिजे की हे खरच २० हजार विदयार्थी याठिकाणी त्याचा लाभ घेतात का? कारण मला डाऊटफुल वाटतयं की पीसीएमसीमध्ये २० हजार विदयार्थी ५ वी ते १० वीतले शाळेसाठी बसचा वापर करतात याबद्दल शंका वाटते. म्हणून यासंदर्भात मला माहिती घ्यायची आहे की मागच्या वर्षी काय परिस्थिती होती, का फक्त आपण पैसेच देतोय. त्याचा वापर होतो का? याठिकाणी डे टू डे लाईफ मध्ये शाळेमध्ये ऍटोरिक्षा, शाळेच्या बसेस याचा वापर करतात. पिंपरी चिंचवड मधुन पुण्यामध्ये जाणारे विदयार्थी किती असणार की ते बसचा वापर करतात किंवा पिंपरी चिंचवड शहरामध्ये जे इन्टरनल रोडमध्ये शाळा आहेत त्यासाठी बसचा वापर करणारे विदयार्थी आहेत का? याबद्दल शंका आहे म्हणून संबंधीत अधिकारी यांनी याबाबत माहिती दयावी.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी याच्या पुर्वीही बोलले होते माजी आयुक्त मा.श्रीकर परदेशी साहेब चर्चा करण्यासाठी आले होते. त्यांनी आपल्याला मिटींग घेण्यास सांगीतले. कशासाठी मिटींग घेतली आपण, खास त्यांना कोटयावधी रुपये मंजूर करण्यासाठी मिटींग घेतली. आपल्या गुलालाचे पोते रिकामे झालेले आहे. मला वाटतं झामाताईनी एकदा उदाहरण दिलेल होतं की गुलालाच पोतं भरलेलं आहे ते उगीच उधळू नका विचार करा ते रिकाम व्हायचं. ते रिकाम होण्याची वेळ आता आलेली आहे आपण दुस-याकडे हात पसरणार आहोत. एलबीटी १ ऑगष्ट २०१५ पासून बंद होते याचे भान ठेवा. कोणताही विषय अभ्यासपुर्वक न मांडता प्रशासन म्हणतं आलं पत्र की आमच्यासमोर दया. खर्चाच्या विषयी त्याच्यासाठी खास आपण मिटींग घेतली आणि त्यांनी मागीतली तेवढी रक्कम त्यांना मंजूर केलेली आहे. मी त्यावेळेस आकडेवारी दिलेली होती. मा.आयुक्त साहेब, अब्जावधी रुपये आपण या पीएमपीएमएलला दिलेले आहेत आणि शिवाय आपण पुणेकरांची अरेरावीची भाषा ऐकूण घेतोय. आता मा.उल्हास शेट्टी यांनी व्यवस्थीत विषय मांडला की किती बसने विदयार्थी जातात, कोणीही मोजत नाही. पास अजून सुध्दा दिलेला नाही त्यांना पास देण्यासाठी चार महिने लागतील त्या चार महिन्याच्या पैशाचे काय? अजून एकही फॉर्म वाटलेला नाही. बसपासचे फॉर्म अजूनही वाटलेले नाहीत. जुन गेला, जुलै वाटण्यामध्ये जाईल, ऑगष्ट घेण्यात जाईल. हे पास चार-चार महिने देत नसाल आणि पैसे मात्र १२ महिन्याचे घेत असालतर याला अर्थ नाही. याबाबतीत व्यवस्थित हिशोब करुन पैसे देणारे कोण आहेत

याचा लेखाजोखा कोण ठेवतं का कोणीच ठेवत नाही. त्यांनी मागीतल आणि तुम्ही दिलं. मा.आयुक्त साहेब, झोळी आम्ही नाही, अधिका-यांना तिथं मागायला लागणार आहे. झोळी घेवून तुम्हांला जायचे आहे केंद्रशासनाच्या पुढे आणि अशावेळेस आपण आजच मंजूर करतोय, उदयाच मरण आजच ओढून घेतोय. भविष्याचा विचार करा, आपल्याकडे पैसे नाहीत. हे पासचे पैसे आपण पीएमपीएमएलला देतो या सगळया पैशाची मागणी त्यांनी राज्यसरकार कडे करावी कारण आपल्याला हा जो केंद्रशासनाकडून जीएसटी कर येणार आहे तो राज्यशासनाकडे येणार आहे आणि राज्यशासन आपल्याला देणार आहे. मला वाटत अशी व्यवस्था असेल. मग आपण हे पैसे त्यांच्याकडून आपण आणुन देणार असूतर त्यांना डायरेक्ट पैसे मागवू दयावेत मी सभागृहाला विनंती करते की, पीएमपीएमएलला पैसे देणे थांबवा. माझ्याकडे ५ वी ते १० वी पर्यंतची हायस्कूलच्या विदयार्थ्यांची यादी आहे. साधारणत: ६ हजार विदयार्थी आहेत. पास मिळत नाही त्यामुळे एवढे मुलं जात नाहीत. सायकली किती वाटलेल्या आहेत. ज्या विदयार्थ्यांना सायकली वाटलेल्या आहेत ते विदयार्थी बसने जात नाहीत, त्यांना बसपास अलौड नाही. आपण इतक्या वर्षात किती सायकली वाटल्या, १० हजार पेक्षा नक्कीच जास्त असतील. पीएमपीएमएलने पैसे मागीतले की आपण देतो. उल्हास शेट्टी यांनी माहिती मागीतली ती बरोबर आहे. त्यामुळे आता यापुढे कोणतीही संस्था आपल्याला पैसे मागीतले की त्यांना राज्यसरकारचा रस्ता दाखवा म्हणजे तेथून परस्पर जावू दयात. त्यांनी दिलेतर ठिक आहे. परंतु आपल्या हातून आपल्याकडे आलेले पैसे त्यांना देणे आपल्याला परवडणार नाही. प्रत्येकवेळेस पीएमपीएमएलच्या सगळया गोष्टी आपण तपासून घेतल्या. जागाही दयायच्यात आता तोही विषय येणार आहे. जागा सुध्दा विचार करुन दयायच्या आहेत तरी या सगळया मागणीचा विचार करावा.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय व्यवस्थित आलेला आहे तो मंजूर करण्यास अडचण नाही परंतु आता पठाणताईनी, उल्हास शेट्टी यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे तो अतीशय महत्वाचा आहे. याच्या अगोदर दरवर्षी २० हजार मुलांचे पास आपण मंजूर करायचो. त्यांनी साडे आठ कोटी मागीतले की ते आपण दयायचो. किती मुलांनी पास घेतले, कितीनी घेतले नाही, कुठला मुलगा कुठपर्यंत जातो याचं आपल्याकडे काहीच नव्हतं. पुणे महापालिकेनी ठराव केलेला आहे २५ टक्के रक्कम स्थानिक मुलांकडून ज्यांना आपण पास देणार आहेत त्यांच्याकडून व ७५ टक्के आपण भरणार आहोत. म्हणजे आपल्याला लक्षात येईल की आपल्या शहरातील किती मुलं बसचा उपयोग करतात. जेणेकरुन याच्यामध्ये कुठलेच चुकीचे होणार नाही म्हणून हा विषय आणलेला आहे. हा विषय सविस्तर आहे मंजूर करण्यासाठी काही अडचण नाही, धन्यवाद.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. यांनी सांगीतले आहे की खाजगी विदयार्थ्यांना, मग खाजगी शाळेत जाणारे गरीब विदयार्थी असतात, ते सुध्दा विदयार्थी आहेत.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. खाजगी म्हणजे याचे दोन भाग केलेले आहेत. आपल्या महापालिकेच्या शाळेतील मुलांना पुर्वी प्रमाणेच सवलत मोफत चालू ठेवणार आहोत. महापालिकेच्या शाळा सोडून इतर ज्या संस्थेच्या प्राथमीक, माध्यमिक शाळा आहेत तेथील ५ वी ते १० वीच्या विदयार्थ्यासाठी २५ टक्केची अट पुण्याप्रमाणे राहील.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ज्यांना सायकली दिलेल्या आहेत त्यांना बसपास मिळत नाही. त्या सायकली आतापर्यंत किती दिल्या तेवढे हजार वजा करा आणि मग हे बसपासचे पैसे दया. खाजगी शाळेकडून १० टक्के घ्या. गरीब जे विदयार्थी आहेत तेच बसने जातात. अन्यत: टेम्पो आहेत, त्यांच्या रिक्षा आहेत. मी वाटलतर उपसूचना देते विषय मंजूर करायचा असेलतर खाजगी शाळेतील मुलांचे २५ टक्के ऐवजी १० टक्के त्यांच्याकडून घ्यावे व त्यांना पास दयावा.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. माझी सभागृहाला अशी विनंती आहे की, हे पुण्याच्या धरतीवर आपण केलेला आहे. यामध्ये आपले पैसेही वाचणार आहेत आणि गरजू विदयार्थ्यांना आपण ७५ टक्के देतो. त्यामुळे आताच खाडे साहेबांनी सांगीतल्याप्रमाणे त्यांच्याकडून २५ टक्के किंवा १० टक्के आपण जे ठरवाल ते, पण काहीतरी पैसे घेतले पाहिजे म्हणजे कळेल की खरच तो आपल्या भागातील विदयार्थी आहे का आणि त्याचा हिशोब राहील. आपली जी शंका आहे आणि शेट्टी साहेबांनीही शंका व्यक्त केली की खरंच २० हजार विदयार्थी आहेत का, एवढे पासेस घेतात का. यामध्ये मी सभागृहाला सांगू इच्छितो की यापुढे आपले मुख्यलेखा अधिकारी आहेत त्यांच्याकडून ऑडीट करुनच पैसे देवू. आणि त्यांच्याकडून काहीतरी टक्के घेतलेतर म्हणजे कमीत कमी त्याचा हिशोब राहील. सायकली दिलेल्या लाभार्थ्यांना या सवलतीतून वगळण्यात येईल. ते पैसे कट केले जातात का याची खात्री करुन मग देवू.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, २० हजार विदयार्थी हे १०० टक्के नाहीत. प्रायव्हेट शाळेच आपण यांना कोऑर्डीनेट करायला दिल पाहिजे ज्याच्यामुळे आपल्याला ॲकच्यूअली आकडा किती आहे हे समजेल. आपण पैसे देतो त्याचा वापर होत नाही. शेवटी पीएमपीएमएलची पण परिस्थिती वाईट आहे ते आपल्याला वेळेवर बसेस देतात का नाहीत याचीही गॅरंटी नाही. म्हणून तुम्ही सरसकट त्यांना पैसे देवू नका त्याच्यावर कंट्रोल ठेवावे. प्रायव्हेट शाळेतून लीस्ट मागवावी की तुमचे विदयार्थी खरंच बसने किती प्रवास करतात. याच्यामध्ये मला नाही वाटत की १० ते २० टक्केही विदयार्थी बसचा वापर करतात. ब-याचशा जणांना रिक्षा आहेत, प्रायव्हेट बसेस आहेत, आई-वडील सोडतात. माझ्या डोळयासमोर दोन चार शाळा आहेत की त्यांच्या स्वत:च्या बसेस आहेत. ज्यांना सायकली

दिलेल्या आहेत ते कॅलक्यूलेट करावे. दर वर्षी किती सायकली देतो हे वजा केलेतर चार ते पाच हजारही विदयार्थी सापडतील असे वाटत नाही. १० वी पर्यंतचे विदयार्थी बसस्टॉपवर तरी दिसतात का. मलाही विदयार्थी बससाठी बसस्टॉपवर उभे आहेत असे दिसत नाही. पक्षनेत्यांना विनंती आहे की यावर चर्चा करायला पाहिजे. पठाणताईनी सांगीतले हे फॉर्मेट सुध्दा चुकीचे आहे. याला दोन-तीन महिने प्रोसेसला लागतील. उबाळे मॅडम यांच्याबाबतीत बोलायचे झालेतर त्या किती कार्यक्षम आहेत हे सगळयांनाच माहिती आहे, अजूनही त्यांचे शिक्षक वर्ग धरणे अंदोलनाला बसलेले आहेत. म्हणून आयुक्त साहेब हे पाहिले पाहिजे की हा करदात्यांचा पैसा आहे तो चांगल्या ठिकाणी वापरला पाहिजे. योजना चांगली आहे परंतु त्याचा उपयोग होतो असे वाटत नाही, धन्यवाद.

**मा.बाबासाहेब धुमाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला वाटते विषय ठेवताना आयुक्तांनी फार मोठी चुक केलेली आहे. या विषयाबद्दल त्यांना काय म्हणायचे हे आम्हांलाही कळत नाही. २०९३३ मुलांचा खर्च ८,६०,४९,९९६/- दाखवला आहे. दरवर्षी किती पैसे पासेसचे त्यांना तुम्ही देता, का दर महिना देतात. बारा महिन्यात किती शालेय शिक्षण होते. मे महिन्यात व दिवाळीत सुट्टी आणि इतर सुट्टया असतात त्या सुट्टया वगळल्या का, का सरसकट पैसे देता हे याठिकाणी विश्लेषण न केल्यामुळे हा शंकेचा विषय होवून बसलेला आहे. ते सुध्दा समक्ष लिहीले असतेतर बरे झाले असते. नावानिशी दिले असते खाजगी शाळेचे मुलं एवढी, आपल्या महापालिकेचे मुलं एवढी अशी त्या मुलांची यादी दिली असतीतर बरे झाले असते परंतु आपण हे याठिकाणी न दिल्यामुळे शंका निर्माण होते. आता काय झालेल आहे प्रत्येक विषय घेताना पाच कोटी, आठ कोटी, दहा कोटी असा आकडा दिलेला आहे. आता पठाणताईनी सांगीतलेल आहे की १ ऑगष्टला काय होणार आहे. असं असताना भविष्यामध्ये आपण विचार करणं ही काळाची गरज आहे. शिक्षणमंडळाचा बोजवारा कसा वाजला हे मगाशी मी त्याबद्दल तुम्हांला सांगीतल आहे. शासनाचे आदेश असताना सुध्दा तीन पत्र आलेले की त्या मॅडमला तुम्ही परत पाठवा म्हणून, त्यावर काहीतरी ऍक्शन घ्या म्हणून. पण आजपर्यंत सुध्दा तुम्ही ऍक्शन घेतली नाही. हा सेप्रेट विषय तुम्ही घेतला असतातर त्याच्यावर काहीतरी झाल असतं. आणि म्हणून पठाणताईनी सांगीतलेल्या विषयावर किंवा शेट्टीनी सांगीतलं त्या धरतीवर तुम्ही ठोस अशी लिस्ट बनवून काम करा. लिस्ट ठेवा कुठल्या शाळेचे किती मुलं कुठं जातात, कोणत्या शाळेत जातात याची लिस्ट ठेवा. का सरसकट आपलं अनुदान आहे म्हणून वाटत सुटलात. शिवाजीनगर असेल, पुणे स्टेशन असेल, दापोडी असेल काही बाणेरला जातात असं कुठ कुठ मुलं जातात हे बघा. का सरसकट तुम्ही पैसे देता त्याचे सुध्दा विश्लेषण करणे ही काळाजी गरज आहे. याच तुम्ही विश्लेषण केल असतंतर आम्हांला सुध्दा शंका घेता आली नसती. म्हणून आपल्याला विनंती करतो की, विषय तर तुम्ही मंजूर करणार आहेत परंतु हे पैसे योग्य माणसाच्या हातात जावेत हीच आमची इच्छा आहे, धन्यवाद.

**मा.आशा शेडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय कितीही चांगला असलातरी शंका येते. ८ कोटी ६० लाखाला भागले त्या अमौंटनेतर जवळपास साडेचार हजार पर्यंत वर्षाला त्या विदयार्थ्यावर खर्च करतो आणि तसं पाहिलतर मला वाटतय हे गणीत आपण सुध्दा मांडले पाहिजे की हे साडेचार हजार रुपये खाजगी शाळेच्या एका विदयार्थ्यामागे आपण खर्च करु शकतो का. ते करत असताना दिवाळीची सुट्टी असेल, उन्हाळयाची सुट्टी असेल साधारणत: २६० दिवस सुध्दा शाळा वर्षेभरात चालत नाही. साधारणत: २८४ दिवस एकूण शाळा होते, याठिकाणी कुठंतरी आपल्या अधिका-यांनी आणि पीएमपीएमएलच्या अधिका-यांनी सुध्दा हे वर्कींग केले पाहिजे. ज्यादिवशीचा आमचे विदयार्थी तुमच्या बसचा प्रवासच करत नाहीत मग आपण त्या संख्येला आपण २८४ ने भागलतर ४५० रु आपण महिन्याला त्यांना देणार आहोत. त्याठिकाणी ६५० चा ऑल रुटचा पास असतो. मग एका रुटला आपण ४५०/- रुपये मोजण्याचे काय कारण आहे. आपण सरसकट देतो पुण्याला जाणा-या विदयार्थ्याला तीच अमौंट, दापोडीला जाणा-या विदयार्थ्याला तीच अमौंट, शिवाजीनगरला जाणा-या विदयार्थ्याला तीच अमौंट घेणार. येथे किलो मीटरचे गणीत मांडल जाते का. याचे स्पष्टीकरण याठिकाणी दयावं, धन्यवाद.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरंतर पीएमपीएमएल ही एक स्वतंत्र संस्था आहे. या स्वतंत्र संस्थेला त्यांनी स्वत:चे असे दिवस आणले पाहिजे की महापालिकेला आपण त्यांना पैसे देण्याची गरजच पडली नाही पाहिजे. पाच वर्षा पुर्वी ही योजना लागू झाली त्यावेळेला मी पदावर होतो त्यावेळेस आशिष शर्मा साहेब या महापालिकेचे आयुक्त होते. इतक्या मोठया संख्येने विदयार्थ्यांना मोफत बसपास दयायचा त्याचे पैसे महापालिकेनी दयायचे. त्यावेळेला राजकीय स्वार्थापोटी हा एक निर्णय त्या त्या महापालिकेनी घेतलेला होता. परंतु दोन्ही महापालिकांना प्रत्यक्षात बघितल गेलंतर फार मोठा आर्थिक तोटा म्हणा किंवा आर्थिक तरतूदी कराव्या लागतात. ही प्रत्यक्ष बाजू बघीतलीतर त्याचा विचार करण्यासारखे आहे. शर्मा साहेबांची गोष्ट आठवते की ज्यावेळेस एवढा मोठा आकडा झाला तो आकडा समोर आला की इतके इतके पैसे पिंपरी चिंचवडच्या मुलांचे झाले त्यावेळेला शर्मा साहेबांनी पुर्ण कॅलक्यूलेट केले, त्यांच्या काळात या महापालिकेची आर्थिक घडी विसकटलेली होती. ती व्यवस्थित बसवायचा त्यांनी प्रयत्न केला आणि कोटयावधी रुपये दयायचे म्हणून इतक्या विदयार्थ्याचे पैसे का दयायचे त्यांनी सरसकट सगळा हिशोब ३०० ते ३७५ दिवसाचा हिशोबाने पैसे मागीतले होते. त्यांनी ज्यावेळेला असं केल की जेवढे दिवस शाळेचे चालू आहेत तेवढे दिवसाचे पैसे दयायचे. आपण पाहिलेतर बसस्टॉपवर खरोखरच विदयार्थ्यांची संख्या खुप कमी दिसते. नागरीकांना शिक्षणासाठी अशाप्रकारची मोफत वाहतूक व्यवस्था करणे जिथं शक्य आहे त्याठिकाणी केली पाहिजे पण हे करत असताना आपला आर्थिक ताळमेळ सुध्दा कुठतरी टिकला पाहिजे. हे करत असताना त्या शाळावर आपल्या

शिक्षणमंडळाचा कंट्रोल ठेवावा अशी आमची विनंती आहे. पीएमपीएमएललाही सोप आहे, रोज पाच-दहा रुपयाचा पास देण्यापेक्षा आपण काय करतो हे घ्या दोन कोटी, त्यांना एकदम पैसे मिळतात. त्यांना माहिती आहे पिंपरी चिंचवड पुणे सारख्या पैसे देणा-या संस्था आहेत म्हणून त्यांच कामकाज जे डबघाईला चाललेल आहे ते तसंच आहे. त्यांना माहिती आहे आपल्याला तारणा-या या दोन संस्था आहेत. आपण कितीही गाळात गेलोतरी आपल्याला या दोन संस्था वर उचलणा-या आहेत. त्यांना पैसे देण्याचे बंद करुन टाका. त्यांनी त्यांच कमवाव. आपण या बीआरटीला इतक्या सुविधा उदयाच्या काळात देणार आहोत. बीआरटी रुटवर एकही शाळा नाही, विदयार्थ्यांना काय उपयोग होणार. सांगायच तात्पर्य हे आहे की आपला खर्च कुठतरी उपयोगाला आला पाहिजे. तो प्रत्यक्ष त्या जनतेला किंवा वापरणा-या व्यक्तिला त्याची जाणीव झाली पाहिजे. त्यामुळे तुम्ही त्या शाळेला किंवा पीएमपीएमएलला बंधनकारक करा. शाळेचा पुर्ण अहवाल आल्या शिवाय त्या विदयार्थ्यांनी बसमधुन पुर्णपणे बसप्रवास केल्याशिवाय तशाप्रकारची कांऊटरसाईन शिक्षणमंडळाची असल्याखेरीज त्यांना कुठल्याही प्रकारच पेमेंट आदा केले जाणार नाही असे करावे. त्यांना पैसे देण्याबाबत याठिकाणी कोणाचीही नकाराची भूमिका नाही किंवा विरोधाची भूमिका नाही परंतु ते व्यवस्थित दिले जावे. आपल्याला उदयाच्या काळात आर्थिक अडचणीला काही प्रमाणात सामोरे जावे लागेल. असं असताना अशाप्रकारची बचत करणं आपलच काम आहे. आठ कोटी वाचविणे आपले काम नाही आठचे दहा कोटी असू दया परंतु ते व्यवस्थित जावेत. ते विदयार्थ्या पर्यंत प्रॉपर पोहचावेत. महापालिकेनी पैसे दिले म्हणजे हा विषय संपला असं न राहता त्याची नोंद शिक्षणमंडळाकडे असावी, त्याचं थर्डपर्टि इन्सपेक्शन असाव. ज्या विदयार्थ्यांना पासेस दिलेले आहेत शाळेनी त्याची नोंद आणि त्यांच रेकॉर्ड पीएमपीएमएलकडून आपल्या पर्यंत पोहचविणे बंधनकारक करावे आणि त्यानंतर अशा शर्तीवर त्यांना रक्कम दिली जावी अशी सूचना राहिल.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझे सर्व सहकारी. आताचा जो विषय आहे याला विरोध नाही परंतु हा विषय करत असताना एवढी मोठी रक्कम ८ कोटी रुपये देणार आहोत. मला असे विचारायचे आहे की, आपण पिंपरी चिंचवड शहरातील विदयार्थ्यांसाठी योजना केलेल्या आहेत, तुम्ही म्हणालात ज्यांनी सायकली नेल्या त्यांना पास देणार नाहीत. यात आपण पहिल्यांदा २५ टक्के रक्कम घेणार आहोत, मीतर असे सांगेल सायकली देताना सुध्दा तुम्ही २५ टक्के रक्कम घ्या. कारण त्या विदयार्थ्याने २५ टक्के रक्कम भरलीतर तो डोळयात तेल घालून बघेल की आपल्याला मिळणारा माल चांगला मिळतो का. आपण शिष्यवृत्ती देतो, सायकल देतो मग बसपासची कटौती कशाला करायची. एका विदयार्थ्याला ४५००/- बसपाससाठी दिलेले आहेत. सायकल दिलीतर १५०० रुपये सायकलीचे धरले, शिष्यवृत्ती देतो, त्यांचा वार्षीक खर्च करतो, कार्पोरेशनच्या शाळेतील विदयार्थ्यांना मोफत पास देतो. आमचे म्हणणे असे आहे की त्या नागरीकांना हे कळल पाहिजे, शहरामधल्या

लोकांनाही कळलं पाहिजे की आपण विदयार्थ्यावर एकूण टोटल खर्च किती करतो. खर्च करण्यासाठी आमचे दुमत नाही. आम्हीतर असं सांगू की येथून पुढे तुम्ही जीसायकल योजना करणार त्यात २५ टक्के रक्कम त्यांच्याकडून घ्या. शिलाई मशीनमध्ये सुध्दा २५ टक्के रक्कम त्यांच्याकडून घ्या. कारण फुकटच मिळतय म्हणून माणूस डोळे झाकतो आणि तसच घरी घेवून जातो, तो म्हणतो जाऊ दयानां फुकटचच आहे. पण ज्यावेळेला ते २५ टक्के रक्कम भरणार त्यावेळेला तो कसून चौकशी करेल. काही ठिकाणी अशी परिस्थिती आहे की ठेकेदारांने दुकान ठरवून दिलेले आहेत हे दहा दुकानं आहेत तिथून तुम्ही तुमची सायकल घ्या, येथून २५ टक्के भरल्यानंतर आपण त्यांना शिक्का मारुन दयायचा आणि त्या दुकानातून सायकल घ्या त्यावेळेला त्याला क्वॉलीटीची सायकल तो माणूस देतो. उदा. त्याला असं वाटल की मला ११००/- च्या ऐवजी १८००/- ची घ्यायची म्हणलेतरी तो वरचे पैसे देईल. आज काय होत ज्या मुलाला तुम्ही सायकल दिलेली आहे त्यांच्याकडे सायकल तरी आहे का. शिलाई मशीन दिलेल्या आहेत त्या शिलाई मशीन सुध्दा नाहीत. त्यामुळे याचा सारासार विचार करावा. आम्हांला पुढच्या जी.बी.मध्ये प्रत्येक विदयार्थ्यावर शिष्यवृत्तीच्या माध्यमातून किती खर्च केला जातो, बसपास कार्पोरेशनच्या शाळेतील विदयार्थ्यांना दिले जातात ते किती बसपासेस वापरले जातात याची माहिती दयावी. ज्या दिवशी मुलगा शाळेत गेलाच नाही तरी देखील त्याचा बसपास पंचींग होणार आहे का. पुर्वी १,२,३,४,५ असे आकडे असलेला बसपास होता ज्या दिवशी तो विदयार्थी जाणार त्या दिवशी तो पंचींग होत. आता आपण सरसकट पैसे देतोत. शाळेत जे विदयार्थी जाणार आहेत त्यांना एक बसपास दयावा. त्या विदयार्थ्यांनी त्यादिवशी प्रवास केला का त्यांचे पंचींग व्हावे आणि मग पीएमपीएमएलच्या बसेसचा पास सवलतीच्या दरात त्यांना दिले गेले पाहिजे. त्यांनी किती दिवस प्रवास केला त्याप्रमाणे आपल्याकडून पैसे दिले पाहिजेत. अशा माध्यमातून ही योजना व्यवस्थित आणावी. आम्हांला ही योजना शहरातील विदयार्थ्यांना गरीब लोकांना सर्वसामान्य जणांना दयायची आहे, ज्याची ऐपत आहे तो आपल्याकडे येणार नाही. २० हजार नाहीतर २५ हजार विदयार्थी येवू दया हरकत नाही परंतु नागरीकांना आपण काय काय फॅसिलीटी शहरात देणार आहेत त्याची चौकट आम्हांला मिळाली पाहिजे. एका विदयार्थ्यामागे वर्षाला दहा हजार रुपये खर्च करतो का आठ हजार रुपये खर्च करतो हा आकडा आम्हांला कळू दयावा. त्यादृष्टिकोनातून आपल्याला हा विषय व्यवस्थित हॅण्डल करता येईल. आम्हांला लोक लगेच म्हणतात आहो, काय ती सायकल दिली होती त्याला चैनच नव्हती. मग त्या सायकलीचा काय उपयोग आहे. म्हणून कोणतीही योजना करा आपलं स्वत:चं काहीतरी टाकलंतर मग ते पाच रुपये असू देत, दहा रुपये असु देत, लोक सुध्दा ती समोरची वस्तू तपासून घेतात. नागरीकांनी २५ टक्के टाकलेले असतात म्हणून ती वस्तु तो बघुन घेतो. अशा पध्दतीने हा परत विषय पुढच्या महिन्यात आणावा. आपण एका विदयार्थ्यावर किती पैसे खर्च करतो, मग त्यामध्ये आपण शिक्षण सुध्दा फ्रि करु शकतो

बाकीचे खर्च जर बंद केलेतर सगळया माध्यमिकच्या फि सुध्दा आपण भरु शकतो. मग १ ली ते १० वी पर्यंत शिक्षण आपण फ्रि केलंतर कुठं बिघडलं, शाळांना आपण पैसे देवूत. एका विदयार्थ्यावर किती पैसे खर्च होणार आहेत याचा आम्हांला तक्ता मिळाला पाहिजे. विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ६९९ विषय क्रमांक - २

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/८२/२०१५ दि.२८/५/२०१५

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र. ११६१६ दि.२/६/२०१५

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.रामदास बोकड -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो-

विषय क्रमांक - ३

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/७/३७/२०१५ दिनांक ३०/०५/२०१५

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र. ११६६४ दि.०९/०६/२०१५

मौजे पिंपळे गुरव येथील स.नं. ७८/१/१/५ पैकी मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रूंद रस्ता या प्रयोजनाने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात देणेबाबत अर्ज श्री.तानाजी प्रभाकर जगताप, पिंपळे गुरव यांनी दाखल केलेला होता. सदर प्रकरणी अर्जदार यांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली आहे. मौजे पिंपळे गुरव भागाची विकास योजना नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसूचना क्र.TPS/1893/1276/CR-174/93/UD-13, दि.१८ सप्टेंबर १९९५ अन्वये शासनाकडून मंजूर करणेत आली आहे. सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव महानगरपालिकेने पाठविला असून भूसंपादनाची कार्यवाही विशेष भूमी संपादन अधिकारी, विशेष घटक क्र.२ यांचेमार्फत सुरू आहे. सदर रस्त्याची संयुक्त

मोजणी पुर्ण झाली असून, शकपुर्तता सुरू आहे. श्री वैभव तानाजी जगताप यांनी प्रपत्र " ब " द्वारे जागेवर रस्ता करणेस दि. ५।१२।२०१२ रोजी महानगरपालिकेस संमती दिली होती, तथापि जागेवर रस्त्याचे काम सुरू केले असता प्रत्यक्ष मोबदला दिलेनंतरच बाधित जागेवर काम करावे असे त्यांनी सांगितले व काम करणेस विरोध केला आहे. ७/१२ उता-यावर श्री वैभव तानाजी जगताप यांचे नांव दि. १७।०९।२०१३ रोजी दाखल केले असून उर्वरीत कागदपत्रे दि. १९।०६।२०१४ रोजी महानगरपालिकेस सादर केलेली आहेत. सदर नस्ती मालकी हक्काची तपासणी करणेसाठी कायदा सल्लागार यांचेकडे पाठविणेत आली होती. त्यास अनुसरून कायदा सल्लागार यांनी खालील कागदपत्रे अर्जदार यांचेकडून घेणेबाबत त्यांचे अभिप्रायात नमूद केले आहे. १) सुभद्राबाई जगताप यांचे मृत्यूपत्राची प्रत. २) मंजूर विकास योजनेतील रस्त्याने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात देणेबाबत चे हक्क व अधिकार अर्जदार वैभव तानाजी जगताप यांना असल्याबाबत फेरफार क्र.१८३२४ मध्ये नमूद इतर सर्व वारसांची नाहरकत. अर्जदार यांनी दि.३०।१०।२०१४ रोजी वरील बाबींची पुर्तता केलेली आहे. प्रत्यक्ष बाधित जागेवर रस्ता विकसित झालेला नसून, सदरचे क्षेत्र खुले आहे. सदरचे क्षेत्र सृष्टी हॉटेल चौकाचे जवळ असलेने, सदर भागात रस्ता न झालेने वारंवार वाहतुकीस अडचण होऊन अपघात होण्याची दाट शक्यता आहे. तरी सदरचे क्षेत्र तातडीने ताब्यात घेणे आवश्यक आहे. सदरचे प्रस्तावाची छाननी केली असता, प्रामुख्याने आढळून आलेल्या बाबी खालीलप्रमाणे आहेत. १) सदरचा भूखंड पाटबंधारे विभागाकडील नकाशानुसार पवनानदी ते निळ्या पूररेषेमध्ये येत आहे. २) सदर मिळकतीचे १८.०० मी. रूंद रस्त्याने बाधित क्षेत्र सुमारे १०५.७५ चौ.मी. इतके असून, मंजूर विकास योजनेच्या नकाशाचे अवलोकन केले असता १८.००मी. रूंद रस्त्याचे एका बाजूस निवासी क्षेत्र तसेच दुस-या बाजूस हरीत विभाग (Green Zone ) आहे. तरी वरील बाबींचा विचार करता, बाधित क्षेत्राचे मुल्यांकन करणेसाठी सन २०१४ चे वार्षिक मुल्यदर तक्त्यातील निवासी विभागाचा दर र.रू.७२००/- प्रति चौ.मी. प्रमाणे अर्जदारास शीघ्र सिध्द गणक दरसूची सन २०१४ चे नुसार खुली बाधीत जमिनीचे येणारे मुल्यांकन ररू. ७,६१,४००/- व मा. खाजगी वाटाघाटी समितीने दि. १०।०४।१५ रोजी झालेल्या बैठकीत मंजूर केलेली वाढीव ३०% रक्कम रू. २,२८,४२०/- असे एकूण र.रू.९,८९,८२०/- अदा करणेस, तसेच याकामी येणा-या खर्चास, जसे वकील नेमणे व त्या अनुषंगिक शुल्क, नोंदणी शुल्क, मुद्रांक शुल्क व इतर खर्च (टायपिंग इ.) यास मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी वरील बाबींचा विचार करता सदरचे बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.राजेंद्र काटे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- प्रभाग क्रमांक ५७ पिंपळे गुरव मध्ये ठिकठिकाणी रुंदीकरण झालेल्या व मनपाचे ताब्यात आलेल्या रस्त्यांचे

खडीमुरुम व बीबीएम करणेकामी निविदा नोटीस क्रमांक ३/५४-२०१४-१५ चे कामास रक्कम रु. २५,००,०००/- पर्यंत प्रशासकीय मान्यता आहे. सदर कामास वाढीव र.रु. १,७५,००,०००/- (एकुण २ कोटी) पर्यंतचे रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.बाळासाहेब तरस -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील फ क्षेत्रीय कार्यालयातील मुख्यालयाच्या कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत खालील कामांना उपसुचनेव्दारे तरतूद करणेत आलेली आहे परंतु सदर कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमा अंदाजपत्रकात समाविष्ट केलेल्या नाहीत, त्यामुळे तरतुद असुनही निविदा काढता येत नाही सबब खालील कामांना तक्त्यामध्ये दर्शविले नुसार अंदाजपत्रकीय रक्कम समाविष्ट करणेस मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | तरतूद | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर मधील रस्ते सिमेंट करणे | २,००,००,००० | ४,००,००,००० |
| २ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथे विविध ठिकाणी सी.सी.टी.व्ही. बसविणे. | १,५०,००,००० | ३,००,००,००० |
| ३ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथील साई उदयानाची दुरुस्ती करणे रंगरंगोटी करणे पाथवे बसविणे, व्यायामशाळांची दुरुस्ती करणे. | १,००,००,०००/- | २,००,००,००० |
| ४ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथील अभ्यासिका, व्यायामशाळा व ओ.पी.डी. मधील फर्निचर बसविणे. | ५०,००,००० | १,००,००,००० |
| ५ | दुरसंचार योजना पानांक ३८० मधील अ.क्र.२६ “मनपाची विवीध कार्यालये व विवीध हॉस्पिटल येथे उभारणेत आलेल्या सीसीटीव्ही यंत्रणा ऑप्टीक फायबरव्दारे | १,४०,००,००० | ४,००,००,००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | मुख्यालयास जोडणे. | | |
| ६ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथे विवीध ठिकाणी सीसीटीव्ही बसविणे पानांक ३८० अ.क्र.३५ दूरसंचार योजना | १,५०,००,००० | ३,००,००,००० |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकास ठराव क्र. ६६३ दि. ६/४/२०१५ अन्वये एकत्रित प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. तथापि, यामधील महसुली अंदाजपत्रक क्र. ३ मधील पान क्र. ६८३ वरील अ.क्र. १,२ व ६ या कामांची अंदाजपत्रकीय रक्कम नजरचुकीने शुन्य (०) झालेली आहे. तथापि, यामधील आकुर्डी, रावेत व कासारवाडी येथील मैलाशुध्दीकरण केंद्राचे चालन, देखभाल, दुरुस्तीच्या कामांची मुदत संपत असल्याने नव्याने निविदा मागविणेची आवश्यकता आहे. त्यासाठी सदरचे तिन्ही कामांसाठीची प्रत्येकी अंदाजपत्रकीय र.रु. ३.०० कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच मनपाच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकीय तरतूदीमध्ये खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस प्रशासकीय मान्यता देण्यात यावी.

| पान क्र. | अनु.क्र. | कामाचे नांव | वाढ करावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| ३२२ | १२४ | प्रभाग क्र. ३९ संत तुकारामनगर परीसरातील मनपा उदयानांची देखभाल दुरूस्ती व स्थापत्यविषयक कामे करणे. | २१ लाख |
| ३२२ | १३७ | प्रभाग क्र. ३९ संततुकारामनगर स्व.राजेश बहल उदयानांमध्ये स्थापत्यविषयक कामे करणे. | १६ लाख |
| ३२२ | १३८ | प्र.क्र ३९ संततुकारामनगर मधील डी.वाय.पाटील मेडीकल कॉलेजच्या मागील बाजूस अस्तित्वातील नाल्याच्या जागेत नाला पार्क विकसीत करणे. | ३३ लाख |
| | | एकूण र.रु. | ७० लाख |

वरील कामाचे मध्ये सन २०१५-१६ चे तरतूद रकमेमध्ये खालील कामाच्या तरतूद ररु. ७० लाख वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

| पान क्र. | अ.क्र. | कामाचे नांव | घट करावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| ४२ | १२३ | नाशिक फाटा ते मोशी हा रस्ता विकसीत करणे<br>(तरतूद २२,२३,००,०००/-) | ७० लाख |

तसेच ड प्रभाग क्षेत्रातील ताब्यात येणा-या आरक्षित व मोकळया जागांना सिमाभिंत बांधणे व स्थापत्यविषयक अनुषंगिक कामे करणे कामाची निविदा क्र. २८/१२/२०१२-१३ हा असून या कामाची निविदा र.रु. ८४,०२,१२९/- इतकी आहे. सदर काम ६० % पुर्ण झाले आहे. सदर कामाचा सुधारीत नकाशा व ताब्यात आलेल्या जागेचा एकूण विचार करता सदर कामासाठी होणारा अंदाजे अपेक्षित खर्च र.रु. १,३५,००,०००/- इतका होणार आहे. तरी सदर कामासाठी र.रु. १,३५,००,०००/- चे सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्रमांक ५७ पिंपळे गुरव मध्ये ठिकठिकाणी रुंदीकरण झालेल्या व मनपाचे ताब्यात आलेल्या रस्त्यांचे खडीमुरुम व बीबीएम करणेकामी निविदा नोटीस क्रमांक ३/५४-२०१४-१५ चे कामास रक्कम रु. २५,००,०००/- पर्यंत प्रशासकीय मान्यता आहे. सदर कामास वाढीव र.रु. १,७५,००,०००/- (एकुण २ कोटी) पर्यंतचे रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच ड प्रभागातील उदयानांचे स्थापत्य व उदयानविषयक नुतनीकरणाची कामे करणे या कामाची निविदा क्र. २८/२/२०१२-१३ हा असून या कामाची निवीदा र.रु. १,१७,७३,३२०/- इतकी आहे. सदर कामाचा सुधारीत नकाशा व एकुण ताब्यात आलेल्या जागेचा विचार करता या कामासाठी सुमारे र.रु. १,९५,००,०००/- चे सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच मौजे पिंपळे सौदागर प्रभाग क्र. ५५ मधील स्मशानभूमी विकसित करणेच्या कामास र.रु. २.५० लाख (२ कोटी ५० लाख) पर्यंतचे सुधारीत प्रशासकीय खर्चास मान्यता देणेत यावी सदर चालू काम निवीदा क्र. जी4बी/३८/२५/२०११-१२ अन्वये चालू असून उर्वरित काम अत्यावश्यक आहे त्यामुळे सदर खर्चास ठराव कायम होणेची वाट न पहाता मान्यता देण्यात यावी.

**मा.किरण मोटे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय क्रमांक ३ मध्ये सुंदर अशा उपसूचना आलेल्या आहेत त्या उपसूचनांसंदर्भात मला आपल्याला विनंती करायची आहे की, यापुर्वी आम्ही आमच्या भागामध्ये पैसे वाढवून दयावे असे म्हणलेले होते. प्रत्येकाचे बजेट आम्ही चेक केल्यानंतर मला वाटतं आमच्या हातात वाटाण्याच्या अक्षता देण्याचे काम प्रशासनाने केलेले आहे. आता ज्या उपसूचना वाचल्यात त्या काय आहेत कशा आहेत याच आम्हांला घेणे देणे नाही. पण ज्यावेळेस सुधारीत भाग हा डेव्हलप होत असताना ग्रामीण भागाची तुलना करत असताना या आता उपसूचना आलेल्या आहेत या उपसूचना घेत

असताना कुठून कुठे पैसे घेणार आहेत याचा खुलासा केलातर बरे होईल. म्हणजे आम्हांलाही समाधान वाटेल. कुठल्या हेडवरुन पैसे ट्रान्सफर करायचे हे माहिती पाहिजे. कारण अनेकवेळा आम्ही उपसूचना देण्याचा प्रयत्न करत असतो ते होत नाही. आता एका नावाखाली शंभर उपसूचना आणि त्याही दोन कोटी चार कोटीच्या उपसूचना वेलडेव्हलप भागामध्ये जर होत असतीलतर याबाबत मी या उपसूचनेचा जाहीरपणे निषेध करतो.

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मोशी प्रभाग क्र. ६ भौगोलिक दृष्टया मोठा असून वाढत्या गृहप्रकल्पामुळे तेथील लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. तेथील नागरीकांसाठी उदयान नाही व उदयानाची आरक्षणे ताब्यात आलेली नाहीत. मोठया प्रमाणावर तेथील नागरिकांकडून सदर भागात उदयान करणेची मागणी होत आहे. सदर मागणीचा विचार करता प्रभाग क्र. ६ मोशी येथील गायरान क्षेत्रातील गट क्र. ४६५ व ६४५ मध्ये अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे होऊ नयेत या उद्देशाने तेथे उदयान विकसित करणेस मान्यता देणेत यावी तसेच सदर कामाच्या नावाचा सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात समावेश करुन मान्य करणेस व त्यासाठी अपेक्षित अंदाजपत्रकीय रक्कम रु. ८५.०० लक्ष आणि सदर काम करुन घेणेसाठी वृक्षसंवर्धन विभागाकडील सन २०१५-१६ अंदाजपत्रकातील १) मोकळया जागा व अंतर्गत रस्ते करुन वृक्षारोपण करणे व लेखाशीर्षावरील रक्कम रु. ५०.०० लक्ष २) गायराने व मोकळया जागा नुतनीकरण व सुशोभिकरण करणे या लेखाशीर्षावरील रक्कम रु. ३५.०० लक्ष अशी एकुण रक्कम रु. ८५.०० लक्ष वर्गीकरणासही मान्यता देणेत यावी.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. उपसूचना मंजूर करण्यास हरकत नाही मला प्रशासनाकडून माहिती पाहिजे. या उपसूचनामधली जी रक्कम सांगीतलेली आहे ती तुम्ही कुठून ट्रान्सफर करणार आहेत. या उपसूचना दिल्यानंतर पेपरमध्ये येणार की इतके इतके पैसे मंजूर झाले आणि जर प्रशासनाने अंमलबजावणी केली नाहीतर काय होणार. मला उपसूचनेला विरोध करायचा नाही पण आम्हांला सांगीतले गेले की उपसूचना देताना कुठल्या हेड मधुन ट्रान्सफर करायचे हेही मेन्शन पाहिजे. आयुक्त साहेब मला एवढच सांगा की या ठरावाची अंमलबजावणी करणार का. आम्ही सुध्दा उपसूचना देतो.

**मा.अजीत गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी उपसूचना वाचल्या गेल्या. ज्येष्ठ नगरसेवक आर.एस.कुमार आणि दत्तात्रय साने यांनी उपसूचनांच्या बाबत निषेध व्यक्त केला. आम्हां सर्व नगरसेवकांची अशी अपेक्षा असते, आम्हांला असे वाटते आमच्या सगळयांच्या प्रभागामध्ये कामं व्हावीत. बजेटच्या अगोदर मी तुम्हांला भेटलो होतो तुम्ही सांगीतल की तुमचे कुठलेही काम राहणार नाहीत असे तुम्ही आम्हांला सांगीतलेले आहे. ग्रामीण भागात नवीन जी काम आहेत ती मागच्या पाच-दहा वर्षात दुर्लक्षीत झाली याला तुम्ही जास्तीचा निधी देणार असा शब्द दिला होता परंतु प्रत्यक्षात पाहिलं, खोलात गेलोतर

वस्तुस्थिती अशी आहे की त्याठिकाणची काम आज काढता येत नाहीत. माझ्या भागातील कामासंदर्भात मी आपल्याला भेटलो, तुम्ही म्हणालांत काम होईल परंतु टेक्निकल अशी अडचण आहे की काम करता येत नाही कारण बजेटमध्ये तरतूद नाही. ठरावीक नगरसेवकांना कळतं की उपसूचना कशी दयायची आणि त्या उपसूचनाच्या माध्यमातून आपल्या वॉर्डातल काम करता कसं येतं परंतु सगळयाच नगरसेवकांना हे माहिती नसतं. त्यामुळे माझी प्रशासनाला विनंती आहे की आपण जे जे शब्द दिलेले आहेत आणि सगळयांचा समान अधिकार आहे. प्रत्येक नगरसेवकांना त्याच्या वॉर्डात पुर्ण काम करायचा अधिकार आहे आणि विशिष्ठ एकाच भागात काम झाले नाही पाहिजे. वारंवार आम्ही सांगत आलो आहेत की ठरावीक भागात खुप जास्त मोठया प्रमाणात विकास होतो आणि ठरावीक भाग तसाच मागास राहतो हे कुठतरी थांबलं पाहिजे आणि माझी सर्वच सभागृहाला विनंती आहे की हे आपण कुठतरी थांबवल पाहिजे आणि सगळयांना समान न्याय दिला पाहिजे. धनंजय आल्हाट यांनी उपसूचना दिलेली आहे, मोशीमध्ये एखादेतरी उदयान व्हावं, त्यांची काय चुकीची अपेक्षा आहे. एवढ मोठ गाव आहे, दहा-बारा वर्षे झाले ते गाव महापालिकेमध्ये आलेल आहे आणि त्या गावात एखाद जरी उदयान डेव्हलप होत नसेलतर हे महापालिकेच्या दृष्टिने दुर्दैवी आहे. या भागामध्ये सगळयांचाच असा दृष्टिकोन असला पाहिजे की प्रभागापुरता विचार न करता पुर्ण पिंपरी चिंचवड शहरात सगळया वॉर्डाचा विकास कसा होईल हा दृष्टिकोन डोळयासमोर ठेवून काम झाले पाहिजे. आयुक्त साहेब, आपण बजेटच्या वेळेस शब्द दिलेला आहे. मागच्या पाच वर्षात असा अनुभव होता की कुठलेही काम सांगीतलेतर त्याला नकार नसायचा आणि ते काम व्हायचे परंतु या पाच वर्षात अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की सांगीतलेले काम होत नाही. आज आपण अडचणीत आहोत अशा अडचणीत असताना आपल्याला जे गरजेचे आहे ते शंभर टक्के झाले पाहिजे परंतु काही ठिकाणी मुलभूत सुविधा सुध्दा नाहीत आणि दुस-या बाजूला काही वॉर्डात खुप मोठया प्रमाणात खर्च करतो हे अत्यंत चुकीच आहे. त्यामुळे माझी सर्व सभागृहाला आणि प्रशासनाला विनंती आहे की असं होवू देवू नका सगळया भागात समान विकास व्हावा. ग्रामीण भागामध्ये जास्तीचा विकास व्हावा अशी अपेक्षा याठिकाणी व्यक्त करतो.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझे सर्व सहकारी. सर्व सदस्यांचे म्हणणे अगदी योग्य आहे मी सुध्दा त्यांच्या म्हणण्यामध्ये सहमत आहे. ज्यावेळेला काही पानांवर शुन्य रक्कम आलेली आहे त्या त्या ठिकाणी त्यावेळेला बजेटमध्ये तरतूद केलेली होती. त्या तरतूदीमधले काही पान शुन्य रक्कमेचे आहेत आणि ज्या लोकांनी त्यांच्याच वॉर्डातून वर्ग केलेले असेल तेवढया उपसूचना स्विकारा. दुसरीकडून कुठून घेतलेले असेलतर त्या उपसूचना किंवा ज्यांनी अशाच मोघम उपसूचना दिलेल्या आहेत त्या घेवू नका. परंतु ज्यांनी पहिल्यांदा बजेटमध्ये मंजुर केले ते बजेटमधील हेडमध्ये हेड ओपन आहे परंतु बजेट

पुस्तकामध्ये शुन्य रक्कम आली आहे किंवा त्यांनी त्यांच्या वॉर्डातील रक्कम इकडून तीकडे म्हणजे एखादयाला वॉर्डातील हा रस्ता करायचा होता त्यावर ती रक्कम होती किंवा ते बजेट त्याच वॉर्डातील एखादया गोष्टीसाठी आहे पण त्या गोष्टीच बजेट त्या गोष्टीसाठी न वापरता इतर गोष्टीसाठी वापरा असं जिथ असेल त्यांच्याच उपसूचना स्विकारा या मताशी मी पण आहे. सर्व ठिकाणी समान बजेट वापरले गेले पाहिजे. खुप ठिकाणी काही वॉर्डातून आपल्याला चांगल्या पध्दतीने टॅक्स मिळतो परंतु त्या वॉर्डात तेवढ आपण काम करतो का. काही इन्डस्ट्रीचा जो भाग आहे त्यांच्याकडून, विकसीत भागामधुन खुप चांगला टॅक्स मिळतो परंतु त्या लोकांना आपण काही मदत करतो का, नाही करत. अशा माध्यमातून ज्या उपसूचना आहेत त्या त्यांनी त्यांच्या वॉर्डातूनच वर्ग केलेल्या असतीलतर त्या उपसूचना तुम्ही घ्याव्यात आणि त्याच्यावर खुलासा करावा की या उपसूचना त्यांच्याच वॉर्डातून वर्ग केलेल्या आहेत का त्यांचे कार्यकारी अभियंता बोलवून घ्या आणि विचारा आणि त्याच पध्दतीच्या उपसूचना स्विकाराव्यात अशी मी विनंती करते.

**मा.रामदास बोकड -** मा.महापौर साहेब, सर्व उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७०० विषय क्रमांक - ३

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/७/३७/२०१५

दिनांक ३०/०५/२०१५

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र. ११६६४ दि.०९/०६/२०१५

मौजे पिंपळे गुरव येथील स.नं. ७८/१/१/५ पैकी मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रूंद रस्ता या प्रयोजनाने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात देणेबाबत अर्ज श्री.तानाजी प्रभाकर जगताप, पिंपळे गुरव यांनी दाखल केलेला होता सदर प्रकरणी अर्जदार यांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली आहे. मौजे पिंपळे गुरव भागाची विकास योजना नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसूचना क्र.TPS/1893/1276/CR-174/93/UD-13, दि.१८ सप्टेंबर १९९५ अन्वये शासनाकडून मंजूर करणेत आली आहे. सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव महानगरपालिकेने पाठविला असून भूसंपादनाची कार्यवाही विशेष भूमी संपादन अधिकारी, विशेष घटक क्र.२ यांचेमार्फत सुरू आहे. सदर रस्त्याची संयुक्त मोजणी पुर्ण झाली असून शकपुर्तता सुरू आहे श्री वैभव तानाजी जगताप यांनी प्रपत्र " ब " द्वारे जागेवर रस्ता करणेस दि. ५।१२।२०१२ रोजी महानगरपालिकेस संमती दिली होती, तथापि जागेवर रस्त्याचे काम सुरू केले असता प्रत्यक्ष मोबदला दिलेनंतरच बाधित जागेवर काम करावे असे त्यांनी सांगितले व काम करणेस विरोध केला आहे. ७/१२ उता-यावर श्री वैभव तानाजी जगताप यांचे नांव दि. १७।०९।२०१३ रोजी दाखल केले असून उर्वरीत

कागदपत्रे दि. १९।०६।२०१४ रोजी महानगरपालिकेस सादर केलेली आहेत. सदर नस्ती मालकी हक्काची तपासणी करणेसाठी कायदा सल्लागार यांचेकडे पाठविणेत आली होती. त्यास अनुसरून कायदा सल्लागार यांनी खालील कागदपत्रे अर्जदार यांचेकडून घेणेबाबत त्यांचे अभिप्रायात नमूद केले आहे. १) सुभद्राबाई जगताप यांचे मृत्यूपत्राची प्रत. २) मंजूर विकास योजनेतील रस्त्याने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात देणेबाबत चे हक्क व अधिकार अर्जदार वैभव तानाजी जगताप यांना असल्याबाबत फेरफार क्र.१८३२४ मध्ये नमूद इतर सर्व वारसांची नाहरकत. अर्जदार यांनी दि.३०।१०।२०१४ रोजी वरील बाबींची पुर्तता केलेली आहे. प्रत्यक्ष बाधित जागेवर रस्ता विकसित झालेला नसून, सदरचे क्षेत्र खुले आहे. सदरचे क्षेत्र सृष्टी हॉटेल चौकाचे जवळ असलेने, सदर भागात रस्ता न झालेने वारंवार वाहतुकीस अडचण होऊन अपघात होण्याची दाट शक्यता आहे. तरी सदरचे क्षेत्र तातडीने ताब्यात घेणे आवश्यक आहे. सदरचे प्रस्तावाची छाननी केली असता, प्रामुख्याने आढळून आलेल्या बाबी खालीलप्रमाणे आहेत. १) सदरचा भूखंड पाटबंधारे विभागाकडील नकाशानुसार पवनानदी ते निळ्या पूररेषेमध्ये येत आहे. २) सदर मिळकतीचे १८.०० मी. रूंद रस्त्याने बाधित क्षेत्र सुमारे १०५.७५ चौ.मी. इतके असून, मंजूर विकास योजनेच्या नकाशाचे अवलोकन केले असता १८.००मी. रूंद रस्त्याचे एका बाजूस निवासी क्षेत्र तसेच दुस-या बाजूस हरीत विभाग (Green Zone ) आहे. तरी वरील बाबींचा विचार करता, बाधित क्षेत्राचे मुल्यांकन करणेसाठी सन २०१४ चे वार्षिक मुल्यदर तक्त्यातील निवासी विभागाचा दर र.रू.७२००/- प्रति चौ.मी. प्रमाणे अर्जदारास शीघ्र सिध्द गणक दरसूची सन २०१४ चे नुसार खुली बाधीत जमिनीचे येणारे मुल्यांकन ररू. ७,६१,४००/- व मा. खाजगी वाटाघाटी समितीने दि. १०।०४।१५ रोजी झालेल्या बैठकीत मंजूर केलेली वाढीव ३०% रक्कम रू. २,२८,४२०/- असे एकूण र.रू.९,८९,८२०/- अदा करणेस, तसेच याकामी येणा-या खर्चास, जसे वकील नेमणे व त्या अनुषंगिक शुल्क, नोंदणी शुल्क, मुद्रांक शुल्क व इतर खर्च (टायपिंग इ.) यास मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी वरील बाबींचा विचार करता सदरचे बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्रमांक ५७ पिंपळे गुरव मध्ये ठिकठिकाणी रुंदीकरण झालेल्या व मनपाचे ताब्यात आलेल्या रस्त्यांचे खडीमुरुम व बीबीएम करणेकामी निविदा नोटीस क्रमांक ३/५४-२०१४-१५ चे कामास रक्कम रु. २५,००,०००/- पर्यंत प्रशासकीय मान्यता आहे. सदर कामास वाढीव र.रु. १,७५,००,०००/- (एकुण २ कोटी) पर्यंतचे रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील फ क्षेत्रीय कार्यालयातील मुख्यालयाच्या कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत खालील कामांना उपसुचनेव्दारे तरतूद करणेत आलेली आहे परंतु सदर कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमा अंदाजपत्रकात समाविष्ट केलेल्या नाहीत, त्यामुळे

तरतुद असुनही निविदा काढता येत नाही सबब खालील कामांना तक्त्यामध्ये दर्शविले नुसार अंदाजपत्रकीय रक्कम समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | तरतूद | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर मधील रस्ते सिमेंट करणे | २,००,००,००० | ४,००,००,००० |
| २ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथे विविध ठिकाणी सी.सी.टी.व्ही. बसविणे. | १,५०,००,००० | ३,००,००,००० |
| ३ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथील साई उदयानाची दुरुस्ती करणे रंगरंगोटी करणे पाथवे बसविणे, व्यायामशाळांची दुरुस्ती करणे. | १,००,००,०००/- | २,००,००,००० |
| ४ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथील अभ्यासिका, व्यायामशाळा व ओ.पी.डी. मधील फर्निचर बसविणे. | ५०,००,००० | १,००,००,००० |
| ५ | दुरसंचार योजना पानांक ३८० मधील अ.क्र.२६ “मनपाची विवीध कार्यालये व विवीध हॉस्पिटल येथे उभारणेत आलेल्या सीसीटीव्ही यंत्रणा ऑप्टीक फायबरव्दारे मुख्यालयास जोडणे. | १,४०,००,००० | ४,००,००,००० |
| ६ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथे विवीध ठिकाणी सीसीटीव्ही बसविणे पानांक ३८० अ.क्र.३५ दूरसंचार योजना | १,५०,००,००० | ३,००,००,००० |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकास ठराव क्र. ६६३ दि. ६/४/२०१५ अन्वये एकत्रित प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. तथापि, यामधील महसुली अंदाजपत्रक क्र. ३ मधील पान क्र. ६८३ वरील अ.क्र. १,२ व ६ या कामांची अंदाजपत्रकीय रक्कम नजरचुकीने शुन्य (०) झालेली आहे. तथापि, यामधील आकुर्डी, रावेत व कासारवाडी येथील मैलाशुध्दीकरण केंद्राचे चालन, देखभाल, दुरुस्तीच्या कामांची मुदत संपत असल्याने नव्याने निविदा मागविणेची आवश्यकता आहे. त्यासाठी सदरचे तिन्ही कामांसाठीची प्रत्येकी अंदाजपत्रकीय र.रु. ३.०० कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपाच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकीय तरतूदीमध्ये खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| पान क्र. | अनु.क्र. | कामाचे नांव | वाढ करावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| ३२२ | १२४ | प्रभाग क्र. ३९ संत तुकारामनगर परीसरातील मनपा उदयानांची देखभाल दुरुस्ती व स्थापत्यविषयक कामे करणे | २१ लाख |
| ३२२ | १३७ | प्रभाग क्र. ३९ संततुकारामनगर स्व.राजेश बहल उदयानांमध्ये स्थापत्यविषयक कामे करणे. | १६ लाख |
| ३२२ | १३८ | प्र.क्र ३९ संततुकारामनगर मधील डी.वाय.पाटील मेडीकल कॉलेजच्या मागील बाजूस अस्तित्वातील नाल्याच्या जागेत नाला पार्क विकसीत करणे. | ३३ लाख |
| | | एकूण र.रु. | ७० लाख |

वरील कामाचे मध्ये सन २०१५-१६ चे तरतूद रकमेमध्ये खालील कामाच्या तरतूद र.रु. ७० लाख वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

| पान क्र. | अ.क्र. | कामाचे नांव | घट करावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| ४२ | १२३ | नाशिक फाटा ते मोशी हा रस्ता विकसीत करणे<br>(तरतूद २२,२३,००,०००/-) | ७० लाख |

तसेच ड प्रभाग क्षेत्रातील ताब्यात येणा-या आरक्षित व मोकळया जागांना सिमाभिंत बांधणे व स्थापत्यविषयक अनुषंगिक कामे करणे कामाची निविदा क्र. २८/१२/२०१२-१३ हा असून

या कामाची निविदा र.रु. ८४,०२,१२९/- इतकी आहे. सदर काम ६० % पुर्ण झाले आहे. सदर कामाचा सुधारीत नकाशा व ताब्यात आलेल्या जागेचा एकूण विचार करता सदर कामासाठी होणारा अंदाजे अपेक्षित खर्च र.रु. १,३५,००,०००/- इतका होणार आहे. तरी सदर कामासाठी र.रु. १,३५,००,०००/- चे सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्रमांक ५७ पिंपळे गुरव मध्ये ठिकठिकाणी रुंदीकरण झालेल्या व मनपाचे ताब्यात आलेल्या रस्त्यांचे खडीमुरुम व बीबीएम करणेकामी निविदा नोटीस क्रमांक ३/५४-२०१४-१५ चे कामास रक्कम रु. २५,००,०००/- पर्यंत प्रशासकीय मान्यता आहे. सदर कामास वाढीव र.रु. १,७५,००,०००/- (एकुण २ कोटी) पर्यंतचे रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच ड प्रभागातील उदयानांचे स्थापत्य व उदयानविषयक नुतनीकरणाची कामे करणे या कामाची निविदा क्र. २८/२/२०१२-१३ हा असून या कामाची निवीदा र.रु. १,१७,७३,३२०/- इतकी आहे. सदर कामाचा सुधारीत नकाशा व एकुण ताब्यात आलेल्या जागेचा विचार करता या कामासाठी सुमारे र.रु. १,९५,००,०००/- चे सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे पिंपळे सौदागर प्रभाग क्र. ५५ मधील स्मशानभूमी विकसित करणेच्या कामास र.रु. २.५० लाख (२ कोटी ५० लाख) पर्यंतचे सुधारीत प्रशासकीय खर्चास मान्यता देणेत येत आहे सदर चालू काम निवीदा क्र जी4बी/३८/२५/२०११-१२ अन्वये चालू असून उर्वरित काम अत्यावश्यक आहे त्यामुळे सदर खर्चास ठराव कायम होणेची वाट न पहाता मान्यता देण्यात येत आहे. तसेच मोशी प्रभाग क्र. ६ भौगोलिक दृष्टया मोठा असून वाढत्या गृहप्रकल्पामुळे तेथील लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. तेथील नागरीकांसाठी उदयान नाही व उदयानाची आरक्षणे ताब्यात आलेली नाहीत. मोठया प्रमाणावर तेथील नागरिकांकडून सदर भागात उदयान करणेची मागणी होत आहे. सदर मागणीचा विचार करता प्रभाग क्र. ६ मोशी येथील गायरान क्षेत्रातील गट क्र. ४६५ व ६४५ मध्ये अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे होऊ नयेत या उद्देशाने तेथे उदयान विकसित करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच सदर कामाच्या नावाचा सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात समावेश करुन मान्य करणेस व त्यासाठी अपेक्षित अंदाजपत्रकीय रक्कम रु. ८५.०० लक्ष आणि सदर काम करुन घेणेसाठी वृक्षसंवर्धन विभागाकडील सन २०१५-१६ अंदाजपत्रकातील १) मोकळया जागा व अंतर्गत रस्ते करुन वृक्षारोपण करणे या लेखाशीर्षावरील रक्कम रु. ५०.०० लक्ष २) गायराने व मोकळया जागा नुतनीकरण व सुशोभिकरण करणे या लेखाशीर्षावरील रक्कम रु. ३५.०० लक्ष अशी एकुण रक्कम रु. ८५.०० लक्ष वर्गीकरणासही मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.रामदास बोकड -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ७०१ विषय क्रमांक - ४

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/७५/ २०१५ दिनांक ०८/०५/२०१५

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र. ११७०४ दि.०९/०६/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यम्क्रि शिक्षण विभागांतर्गत कार्यरत असणा-या १८ माध्यमिक विदयालयांमधील इ.१० वीमध्ये उत्तम गुण संपादन करुन यशस्वी होणा-या विदयार्थ्यांना दरवर्षी प्रोत्साहनपर रक्कम धनादेशाद्वारे अदा केली जाते. सन २०१४-१५ या शैक्षणीक वर्षात एकुण ८९ विदयार्थ्यांना एकुण र.रु.३३,९०,०००/- इतकी बक्षीस रक्कम वाटप करणेत आली आहे. तसेच सन २०१४-१५ पासून १८ माध्यमिक विदयालयातील अंध व अपंग विदयार्थ्यांना देखिल प्रोत्साहनपर बक्षीस रक्कम अदा करणेस सुरवात करणेत आली असून मनपा शाळेतील ४ अपंग व ९ अंध विदयार्थ्याना एकुण र.रु ६,५०,०००/- इतकी रक्कम वाटप करणेत आली आहे. त्याबाबत खालीलप्रमाणे निकष निर्धारित केले आहेत.

इ. १० वीच्या परीक्षेत उत्तीर्ण होणा-या मनपा शाळेतील विदयार्थ्यांना खालील प्रमाणे बक्षीस रक्कम अदा केली जाते.

| **टक्केवारी** | **बक्षीस रक्कम** |
|---|---|
| ८०.०० ते ८५.९९ | २५,०००/- |
| ८६.०० ते ९०.९९ | ५०,०००/- |
| ९१.०० ते पुढे | १,००,०००/- |

तसेच मनपा विदयालयांमधील अंध व अपंग विदयार्थ्यांच्या बाबतीत खालील प्रमाणे निकष निर्धारित करणेत आले आहेत.

५०.०० टक्के व त्यापुढे - र.रु ५०,०००/-

अपंगत्वाची टक्केवारी किमान ४० टक्के पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

परंतू सन २०१५-१६ या शैक्षणीक वर्षापासून सदरच्या योजनांमध्ये बदल करणेस मा.आयुक्त सो. यांनी समक्ष सुचना दिल्या असलेने खालील नमूद केलेप्रमाणे मामहापालिका सभेच्या मान्यतेने धोरण निश्चीत करणे आवश्यक आहे.

१. मनपाच्या १८ माध्यमिक विदयालयांमधील इ.१० वीच्या परीक्षेत उत्तीर्ण होणा-या विदयार्थ्यांना खालील प्रमाणे प्रोत्साहनपर बक्षीस रक्कम अदा करणेत येईल.

| टक्केवारी | बक्षीस रक्कम |
|---|---|
| ८०.०० ते ८४.९९ | २५,०००/- |
| ८५.०० ते ८९.९९ | ५०,०००/- |
| ९०.०० ते पुढे | १,००,०००/- |

२. मनपाच्या १८ माध्यमिक विदयालयांमधील अंध व अपंग विदयार्थ्यांना इ. १० वीच्या परीक्षेत किमान ३५ टक्के पेक्षा जास्त गुण संपादन केलेल्या व अपंगत्वाची टक्केवारी किमान ४० टक्के पेक्षा जास्त असलेल्या विदयार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षीस रक्कम र.रु ५०,०००/- अदा केली जाईल.

सदरचा विषय हा मनपाच्या अर्थिक हिताशी संबंधीत असल्याने धोरण निश्चीत करणे आवश्यक असल्याने मान्यता देणेत येत आहे.

**मा.राजेंद्र काटे -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.रामदास बोकड -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ७०२ विषय क्रमांक - ५

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.आशा सुर्यवंशी, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव -

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.५१ दि.६/५/२०१५

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.६९२ दि.२०/५/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सन २०१२ पासून बी.आर.टी.एस. प्रकल्प राबविण्यात आला आहे व आज रोजी सन २०१३-२०१४ मध्ये नाशिक फाटा ते वाकड व औंध किवळे हे बी.आर.टी.एस. चालू करण्यात आले. पिंपळे गुरव सनं.८४ व ८५ मध्ये बी.आर.टी.एस.बाधित लोकांनी स्वत:चे घर स्वत: काढून घेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिका नगररचना विभागाला व बी.आर.टी.एस.विभागाला ताबा दिलेला असून ज्या नागरिकांनी घरकुल मिळविण्याकरीता अर्ज करुन देखील व आरक्षणामध्ये घरकुल शिल्लक असताना घरकुल मिळत नाही. या प्रकल्पाचा सर्वे झाला असताना सन २००६ ते २००७ मध्ये नागरिकांनी स्वत:चे कुटूंबाचे संरक्षणासाठी छोटीशी दुबार मिळकत घेतल्यामुळे १००% (शंभर टक्के) जागा व घर रस्त्यात जाऊन देखील दूबार प्रॉपर्टीमुळे नागरिकांना आरक्षणामध्ये घरकुल शिल्लक असताना

घरकुल मिळत नाही. काळेवाडी बी.आर.टी.एस.रोड सर्वे नं.८० ते ९९ या सर्वे नं.मध्ये वरील प्रमाणे बी.आर.टी.एस. रोड बाधीत व दुबार प्रापर्टी असणारे नागरिक आहेत. तरी पिंपरी चिंचवड शहरातील बी.आर.टी.एस. बाधीत व दुबार प्रॉपर्टी धारकांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनामार्फत ई.डब्लू.एस. मधील २५७ मधील आरक्षण मधून घरकुल देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ६

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.भूजि/७/कावि/१५/ २०१५ दि.१५/४/२०१५

२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.भूजि/७/कावि/१४/ २०१५ दि.१५/४/२०१५

३) मा.महापालिका सभा ठराव क्र. ६८५ दि.१३/५/२०१५

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे सद्यस्थितीत १४५० बसेस व भाडेतत्वावरील ६६२ बसेस अशा मिळून एकूण २११२ बसेस आहेत. यासाठी महामंडळाकडे पुणे हद्दीत ७ डेपो व पिंपरी चिंचवड हद्दीत ३ डेपो असे+मिळून एकूण १० डेपो आहेत. बस संख्येच्या प्रमाणात जागा उपलब्ध नसल्याने सद्यस्थितीत महामंडळाच्या शेकडो बसेसचे पार्किंग रस्त्यावर करण्यात येते. भविष्यामध्ये जे.एन.यु.आर.एम. अंतर्गत ५०० नविन बसेस परिवहन महामंडळास प्राप्त होणार आहेत. सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सर्व बसेसचे पार्किंग संरक्षित जागेत होणे आवश्यक आहे. तरी सदर बसेसचे अंतर्गत पार्कींग व देखभाल दुरुस्तीसाठी महामंडळास जागेची अत्यंत आवश्यकता आहे व त्यासाठी मनपा हद्दीतील रिकाम्या झालेल्या विविध जकात नाक्यांच्या जागा बस डेपो/बसस्थानकाचे वापरासाठी मिळणेस परिवहन महामंडळाने विनंती केलेली आहे व अशा १० जकात नाक्यांच्या जागेंची यादी त्यांनी दिलेली आहे.

तथापी यापूर्वी मनपा हद्दीतील बस टर्मिनससाठी आरक्षित असलेल्या एकूण ४ जागा आदेश क्रं.भूजि/सर्व्हे-२/कावि/१७०/१४ दि.३/२/१४ अन्वये परिवहन महामंडळास सदर जागांची असणारी तातडी लक्षात घेता तात्पुरत्या स्वरुपात देणेत आल्या आहेत.

पि.चि.म.न.पा. हद्दीतील एकूण १० जकात नाक्यांच्या संपूर्ण जागा ताब्यात मिळणेबाबत परिवहन महामंडळाने विनंती केली आहे. सदर जकात नाक्यांचे जागांचा ताबा दि. ८/४/१५ रोजी एल.बी.टी. (जकात) विभागाकडून या विभागांस प्राप्त झाला आहे. सदर मागणी केलेल्या १० जकात नाक्यापैकी एकूण ३ जागा परिवहन महामंडळास देता येणे शक्य आहे. याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.क्रं. | गावाचे/जकात नाक्याचे नाव | प्रयोजन | स.नं. | क्षेत्र (हे.आर.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | निगडी | | से.क्रं.२२ | १.०० | प्राधिकरणाकडून ताबा |
| २ | च-होली | | ९९३ पै. | ०.४३ | T.D..R. ने ताबा |
| ३ | डुडुळगाव | | ५० पै. | ०.४० | ताबा आहे. |
| | | | एकूण क्षेत्र | १.८३ हे. | |

सदर जागा परिवहन महामंडळास देणेबाबतची तातडी पाहता, सद्यस्थितीत उपरोक्त नमूद केलेप्रमाणे मनपाच्या एकूण ३ जकात नाक्यांच्या जागा कायदा, नगररचना विभाग यांचे अभिप्राय/अटी-शर्तीस अधिन राहून पुणे महानगर परिवहन महानगर लियांस बसडेपो/बसस्थानकाचे वापरासाठी तात्पुरत्या स्वरुपात देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रध्दा लांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.आशा सुर्यवंशी -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७०३ विषय क्रमांक - ६

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.भूजि/७/कावि/१५/२०१५ दि.१५/४/२०१५

२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.भूजि/७/कावि/१४/२०१५ दि.१५/४/२०१५

३) मा.महापालिका सभा ठराव क्र. ६८५ दि.१३/५/२०१५

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ७

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माध्य/शि/७/कावि/१९९/२०१५ दि.०९/०६/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात पिंपरी चिंचवड मनपा शिक्षण मंडळ मार्फत कार्यरत असलेल्या भोसरी येथील इंग्रजी माध्यम शाळेत इ.१ ली ते ८ वी पर्यंतचे वर्ग सुरु आहेत. सदर शाळेत इ.९ वी व १० वी चे वर्ग सुरु नसल्याने तेथील पालक यांची इ ९ वी व १० वीचे वर्ग सुरु करणेची मागणी आहे. तसेच इयत्ता ८ वीचे विद्यार्थ्यांची संख्या पट ३० इतकी असून हजर संख्या २९ इतकी विचारात घेता भोसरी येथील इंग्रजी माध्यम शाळेत शिक्षण विभागामार्फत इ. ९ वी व १० वीचे वर्ग सुरु करावयाचे असल्याने माआयुक्त यांना भोसरी येथील इंग्रजी माध्यम शाळेत इ. ९ वी व १० वीचे वर्ग सुरु करण्याकामीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. शासन निर्णय क्र.नमाश २००९/ (४९७/०९)/माशि - १ दिनांक ११/०६/२००९ नुसार माध्यमिक शाळेचे वर्ग स्वत:च्या उत्पन्नातून व राज्य शासनावर कोणतेही आर्थिक दायित्व न येता सुरु करु इच्छित असतील तर असे इ.८ वी ते १२ वीचे वर्ग सुरु करण्यास यापुढे शासन स्तरावरुन राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार राहणार नाही या अटीचे अधीन राहून परवानगी देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर शाळेचा आर्थिक भार मनपास सहन करावा लागणार आहे. तथापि मनपाचे ऐच्छिक कर्तव्य म्हणून इ.९ वी १० वीचे इंग्रजी माध्यमचे वर्ग सुरु करणे असलेने त्यासाठी पदनिर्मितीसाठी नगरविकास विभागाची मान्यता ही प्रशासन विभागामार्फत घ्यावी लागणार आहे. तसेच कर्मचारी वर्ग व येणा-या खर्चास मा.महानगरपालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच अंदाजपत्रकीय तरतूद करणे आवश्यक आहे. यासाठी काही कालावधी लागणार आहे. सबब या सर्व बाबींचा विचार केल्यास अल्प कालावधीमध्ये पदनिर्मिती व पदे भरणे ही प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नसल्याने तसेच सदरचा निर्णय हा धोरणात्मक असलेने भोसरी येथील इंग्रजी माध्यम शाळेत सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षापासून इ. ९ वी व १० वीचे वर्ग सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रध्दा लांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सहकारी. हा विषय ८ वी व ९ वी चे वर्ग सुरु करण्याचा विषय आहे. गेल्या तीन महिने शिक्षण मंडळाच्या सर्व सभासदानी याच ट्रेनिंग घेतलेल होत. शिक्षणमंडळाच्या विदयार्थ्यांचा दर्जा सुधारणेबाबत मागे पण जीबीमध्ये शिक्षणमंडळाच बजेट होतं त्यावेळेला आपण चर्चा केली आणि यासाठी आपण गेली तीन महिने चांगल्या पध्दतीने प्रयत्न करतो. जसं थरमॅक्स कंपनीनं त्या ठिकाणी

इंग्रजीच्या चार शाळा केल्या त्यामध्ये पुर्वीच्या दोन होत्या आणि आताच्या दोन. अशा माध्यमातून आता थरमॅक्स कंपनीकडे चार शाळा आहेत. आता मराठी माध्यमाच्या ज्या आपल्या शाळा आहेत त्या शाळेमध्ये आपण ज्ञानप्रबोधिनी आणि मॉर्डन यांना रिक्वेष्ट केलेली होती की जवळच्या शाळेमध्ये तुम्ही आम्हांला मार्गदर्शन करा. आमची गुणवत्ता वाढीसाठी ज्याठिकाणी आमच्या मराठी शाळा आहेत, त्यांच्या मराठी शाळा आहेत त्याठिकाणी आपल्याला त्यांनी गुणवत्ता वाढीसाठी मार्गदर्शन करावं. माझ्या मते तानाजी शिंदे असतील, उबाळे मॅडम असतील, बाकी त्यांचे सर्व सहकारी असतील किंवा शिक्षणमंडळाचे सहकारी असतील त्यांच्या सोबत त्यांच्या ब-याचशा मिटींग झाल्या आहेत परंतु त्याच्यातून अजून आऊटपुट आलेलं नाही. आता माझ्या माहितीप्रमाणे टेंडर पब्लिश केलेलं आहे. आपण ५०-५० टक्के किंवा त्या माध्यमातून शाळा चालविण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करणार आहेत, आपल्याकडे ४० हजार विदयार्थी आहेत त्यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण देते, किंबहूना जास्तच शिक्षणासाठी विदयार्थी असतील परंतु कमी होणार नाहीत हा शिक्षणाचा दर्जा चांगला वाढविण्यासाठी मॉर्डन आणि ज्ञानपेबोधिनीचा विचार करावा किंवा त्यांच्याशी ट्रेनिंग घ्यायचे होते किंवा ते कोणत्या माध्यमातून आपल्याला सहकार्य करणार आहेत याची मान्यता तुम्ही आमच्याकडून घ्यावी. कारण त्यांना आपण शाळा देत नाही फक्त त्यांनी आपल्याकडे येवून आपली गुणवत्तावाढ कशी केली गेली पाहिजे याच्यासाठी त्यांनी आपल्याकडे गेल्या तीन महिन्यापासून प्रयत्न केलेला आहे. याच्यामध्ये उबाळे मॅडम, शिक्षणमंडळाचे सर्व सहकारी या सगळया लोकांनी सुध्दा त्याच्यावर खुप काम केलेल आहे. आता जून महिना गेल्यानंतर पुढे ते लोक काम करु शकतील असं नाही तो विषय सुध्दा याच्यामध्ये इन्क्ल्यूड करावा. मॉर्डर्न आणि ज्ञानप्रबोधिनी सारख्या संस्था आपल्याला मार्गदर्शन करण्यासाठी त्यांना जी जी मदत लागेल ती आपण करावी. ५ वी ते १० वीच्या मुलींसाठी आम्ही होस्टेल सुध्दा चालवायला तयार आहोत प्राधिकरणातील तुम्ही आम्हांला एक शाळा दया असे त्यांनी सांगीतले. ५ वी साठी जे काही १०० ते १५० मुली असतीलतर त्यांचा दहावीचा निकाल सुध्दा आम्ही आमच्या शाळेसारखा लावून दाखवू असा सुध्दा आपल्याकडे एक प्रस्ताव आला होता परंतु मला वाटत नाही की त्या प्रस्तावावर पुढे विचार केला गेला. परंतु जरी तो आला तरी सुध्दा तो करायला काहीच हरकत नाही कारण ते कष्ट करणार आहेत, ते मेहनत घेणार आहेत. ते पिंपरी चिंचवडच्या शेजारी आपल्या आहेत ते काम करतात म्हणून ते त्याच्यामध्ये सहभाग घेणार आहेत. तरी आयुक्त साहेब याबाबतीत आपण सुध्दा पुढाकार घ्यावा आणि त्या बाबतीत त्यांची मिटींग घ्यावी त्यांना ज्या ज्या गोष्टी पाहिजे त्या देवून या दहा दहा शाळा पहिल्यांदा प्रायोगीक तत्वावर आपण मार्गदर्शनासाठी किमान त्यांच जे काही म्हणणं असेल ते तुम्ही एकूण घेवून त्याच्यासाठी तुम्ही दयाव्यात अशी मी विनंती करते.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- ज्ञान प्रबोधीनीला दहा शाळा, मॉडर्नला १० शाळा व ज्ञानप्रबोधीनी ५ वी ते १० वीचे हॉस्टेल चालविण्यास तयार असतीलतर त्यांच्या ज्या अटी शर्ती असतील त्यास मान्यता देणेत यावी.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- १) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, शिक्षण मंडळ मार्फत सांगवी येथे इयत्ता १ ते ७ वी पर्यंत मुली- १/ मुले-१ प्राथमिक शाळा चालू आहेत. सन २०१६-२०१७ मध्ये इयत्ता ८ वी चे वर्ग सुरु करणेबाबत कार्यवाही चालू आहे. २) सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षापासून माध्यमिक शिक्षण विभागामार्फत इयत्ता ९ वी १० वी चे वर्ग सुरु करणेस मान्यता देणेत यावी ३) सन २०१५-२०१६ या वर्षात ज्या प्रमाणे भोसरी येथील इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता ९ वर्गास मान्यता घेणार आहे त्याचप्रमाणे सांगवी येथील मराठी माध्यमाचे इयत्ता ९ वी व १० वी च्या वर्गास मान्यता देणेत यावी. ४) सन २०१५-२०१६ या वर्षात महाराष्ट्र शासनाची पदनिर्मितीस मान्यता घेणेत यावी. ५) वरील आवश्यक संपुर्ण खर्चास मान्यता देणेत यावी. तसेच १) पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण मंडळ मार्फत बोपखेल येथे इयत्ता १ ली ते ७ वी प्राथमिक शाळा चालु आहे. सन २०१५-२०१६ मध्ये इयत्ता ८ वी चे वर्ग सुरु करणे बाबत कार्यवाही चालू आहे. २) सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षापासून माध्यमिक शिक्षण विभागामार्फत इयत्ता ९ वी १० वी चे वर्ग सुरु करणेत यावेत. ३) सन २०१५-२०१६ या वर्षात ज्या प्रमाणे भोसरी येथील इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता ९ वर्गास मान्यता घेणार आहे त्याचप्रमाणे बोपखेल येथील मराठी माध्यमाचे इयत्ता ९ वी व १० वी च्या वर्गास मान्यता देणेत यावी. ४) सन २०१५-२०१६ या वर्षात महाराष्ट्र शासनाची पदनिर्मीतीस मान्यता घेणेत यावी. ५) वरील आवश्यक संपुर्ण खर्चास मान्यात देणेत यावी. तसेच १) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, शिक्षण मंडळ मार्फत निगडी येथे इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंत मुली-१/ मुले-१ प्राथमिक शाळा चालू आहेत. सन २०१६-२०१७ मध्ये इयत्ता ८ वी चे वर्ग सुरु करणेबाबत कार्यवाही चालू आहे. २) सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षापासून माध्यमिक शिक्षण विभागामार्फत इयत्ता ९ वी १० वी चे वर्ग सुरु करणेत यावेत. ३) सन २०१५-२०१६ या वर्षात ज्या प्रमाणे भोसरी येथील इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता ९ वर्गास मान्यता घेणार आहे त्याचप्रमाणे निगडी येथील मराठी माध्यमाचे इयत्ता ९ वी व १० वी च्या वर्गास मान्यता देणेत यावी. ४) सन २०१५-२०१६ या वर्षात महाराष्ट्र शासनाची पदनिर्मीतीस मान्यता घेणेत यावी. ५) वरील आवश्यक संपुर्ण खर्चास मान्यता देणेत यावी. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता त्वरीत अंमलबजावणी करावी.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेला मी अनुमोदन **देतो.**

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सभागृह. या विषयामध्ये १२ वी पर्यंत चालू करण्यासाठी शासनाचे कुठलेही बंधन नाही. शाळा चालू करायची असेलतर महापालिकेनी स्वत:च्या खर्चातून करावे. शासनाच काय चाललं हे कळत नाही कारण शासन म्हणतं सर्व मुलांनी शिकले पाहिजे. मुलांनी चांगल्या चांगल्या पध्दीने शिक्षण घेतले पाहिजे. मा.विनोद तावडे यांनी शिक्षणाबद्दल लक्ष घातलेले आहे. सगळे आहे पण खर्च दयायचा नाही. एलबीटी तुम्ही बंद करणार आहेत. महापालिकेची परिस्थिती सध्या डबघाईला चालली आहे. या सगळया गोष्टी चालल्या असताना शासनाने शाळेला जे अनुदान दिले पाहिजे ते शासन हात वर करते आणि तुमच तुम्हीच चालवा म्हणतयं याबद्दल मला शासनाची खंत वाटते. केंद्रसरकार, राज्यसरकार हे बीजेपी सरकारचे आहे आणि बीजेपी सरकारकडून जे अच्छे दिन बघायचे दिवस होते ते झोपडपट्टी भागाचा नगरसेवक या नात्याने मला वाईट वाटतंय की हे अच्छे दिन नसून हे शहराचे वाईट दिवस बघायचे दिवस दिसतात.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब उपसूचनां स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७०४ विषय क्रमांक - ७

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माध्य/शि/७/कावि/१९९/२०१५
दि.०९/०६/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात पिंपरी चिंचवडमनपा शिक्षण मंडळ मार्फत कार्यरत असलेल्या भोसरी येथील इंग्रजी माध्यम शाळेत इ.१ ली ते ८ वी पर्यंतचे वर्ग सुरु आहेत. सदर शाळेत इ.९ वी व १० वी चे वर्ग सुरु नसल्याने तेथील पालक यांची इ. ९ वी व १० वीचे वर्ग सुरु करणेची मागणी आहे. तसेच इयत्ता ८ वीचे विद्यार्थ्यांची संख्या पट ३० इतकी असून हजर संख्या २९ इतकी विचारात घेता भोसरी येथील इंग्रजी माध्यम शाळेत शिक्षण विभागामार्फत इ. ९ वी व १० वीचे वर्ग सुरु करावयाचे असल्याने मा.आयुक्त यांना भोसरी येथील इंग्रजी माध्यम शाळेत इ. ९ वी व १० वीचे वर्ग सुरु करण्याकामीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. शासन निर्णय क्र.नमाश २००९/ (४९७/०९)/माशि - १ दिनांक ११/०६/२००९ नुसार माध्यमिक शाळेचे वर्ग स्वत:च्या उत्पन्नातून व राज्य शासनावर कोणतेही आर्थिक दायित्व न येता सुरु करु इच्छित असतील तर असे इ.८ वी ते १२ वीचे वर्ग सुरु करण्यास यापुढे शासन स्तरावरुन राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार राहणार नाही या अटीचे अधीन राहून परवानगी देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर शाळेचा आर्थिक भार मनपास सहन करावा लागणार आहे. तथापि मनपाचे ऐच्छिक कर्तव्य म्हणून इ.९ वी १० वीचे इंग्रजी माध्यमचे वर्ग सुरु करणे असलेने त्यासाठी पदनिर्मितीसाठी नगरविकास विभागाची मान्यता ही प्रशासन विभागामार्फत

घ्यावी लागणार आहे. तसेच कर्मचारी वर्ग व येणा-या खर्चास मा.महानगरपालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच अंदाजपत्रकीय तरतूद करणे आवश्यक आहे. यासाठी काही कालावधी लागणार आहे. सबब या सर्व बाबींचा विचार केल्यास अल्प कालावधीमध्ये पदनिर्मिती व पदे भरणे ही प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नसल्याने तसेच सदरचा निर्णय हा धोरणात्मक असलेने भोसरी येथील इंग्रजी माध्यम शाळेत सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षापासून इ. ९ वी व १० वीचे वर्ग सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच ज्ञान प्रबोधीनीला दहा शाळा, मॉडर्नला १० शाळा व ज्ञानप्रबोधीनी ५ वी ते १० वीचे हॉस्टेल चालविण्यास तयार असतीलतर त्यांच्या ज्या अटी शर्ती असतील त्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच १) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, शिक्षण मंडळ मार्फत सांगवी येथे इयत्ता १ ते ७ वी पर्यंत मुली- १/ मुले-१ प्राथमिक शाळा चालू आहेत. सन २०१६-२०१७ मध्ये इयत्ता ८ वी चे वर्ग सुरु करणेबाबत कार्यवाही चालू आहे २) सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षापासून माध्यमिक शिक्षण विभागामार्फत इयत्ता ९ वी १० वी चे वर्ग सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे ३) सन २०१५-२०१६ या वर्षात ज्या प्रमाणे भोसरी येथील इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता ९ वर्गास मान्यता घेणार आहे त्याचप्रमाणे सांगवी येथील मराठी माध्यमाचे इयत्ता ९ वी व १० वी च्या वर्गास मान्यता देणेत येत आहे ४) सन २०१५-२०१६ या वर्षात महाराष्ट्र शासनाची पदनिर्मितीस मान्यता घेणेस मान्यता देणेत येत आहे ५) वरील आवश्यक संपुर्ण खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच १) पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण मंडळ मार्फत बोपखेल येथे इयत्ता १ ली ते ७ वी प्राथमिक शाळा चालु आहे. सन २०१५-२०१६ मध्ये इयत्ता ८ वी चे वर्ग सुरु करणे बाबत कार्यवाही चालू आहे २) सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षापासून माध्यमिक शिक्षण विभागामार्फत इयत्ता ९ वी १० वी चे वर्ग सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे. ३) सन २०१५-२०१६ या वर्षात ज्या प्रमाणे भोसरी येथील इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता ९ वर्गास मान्यता घेणार आहे त्याचप्रमाणे बोपखेल येथील मराठी माध्यमाचे इयत्ता ९ वी व १० वी च्या वर्गास मान्यता देणेत येत आहे. ४) सन २०१५-२०१६ या वर्षात महाराष्ट्र शासनाची पदनिर्मीतीस मान्यता घेणेस मान्यता देणेत येत आहे. ५) वरील आवश्यक संपुर्ण खर्चास मान्यात देणेत येत आहे तसेच १) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, शिक्षण मंडळ मार्फत निगडी येथे इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंत मुली-१/ मुले-१ प्राथमिक शाळा चालू आहेत. सन २०१६-२०१७ मध्ये इयत्ता ८ वी चे वर्ग सुरु करणेबाबत कार्यवाही चालू आहे २) सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षापासून माध्यमिक शिक्षण विभागामार्फत इयत्ता ९ वी १० वी चे वर्ग सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे. ३) सन २०१५-२०१६ या वर्षात ज्या प्रमाणे भोसरी येथील इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता ९ वर्गास मान्यता घेणार आहे त्याचप्रमाणे निगडी येथील मराठी माध्यमाचे इयत्ता ९ वी व १० वी च्या वर्गास मान्यता देणेत येत आहे. ४) सन २०१५-२०१६ या वर्षात महाराष्ट्र शासनाची पदनिर्मीतीस मान्यता देणेत येत आहे. ५) वरील आवश्यक

संपुर्ण खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता त्वरीत अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ८

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माध्य/शि/७/कावि/२००/२०१५, दि.०९/०६/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात पिंपरी चिंचवड मनपा शिक्षण मंडळ मार्फत कार्यरत असलेल्या १) रुपीनगर, २) थेरगांव, ३) खराळवाडी, ४) नेहरुनगर, ५) लांडेवाडी, ६) दापोडी इ. ६ उर्दु प्राथमिक शाळेत इ ८ वी पर्यंतचे वर्ग सुरु आहेत. तसेच कासारवाडी उर्दु प्राथमिक शाळेत इ. ८ वीचा वर्ग सद्यस्थितीत सुरु नाही. तो सुरु झालेनंतर पुढील वर्षात माध्यमिक शिक्षण विभागामार्फत ९ वी व त्यानंतर १० वीचा वर्ग सुरु करता येईल. सदर नमुद शाळेत इयत्ता ९ वी व १० वीचे वर्ग सुरु नसल्याने तेथील पालक यांची इयत्ता ९ वी व १० वीचे वर्ग सुरु करण्याची मागणी आहे. तसेच एकूण ६ उर्दु प्राथमिक शाळेतील इयत्ता ८ वीचे विद्यार्थ्यांची संख्या २५४ इतकी विचारात घेता वरील ठिकाणी माध्यमिक शिक्षण विभागामार्फत इयत्ता ९ वी व १० वीचे वर्ग सुरु करावयाचे आहेत. याबाबत मा.स्थायी समिती सदस्यांनी ठराव क्रमांक १०४८८ विषय क्रमांक १२७ दिनांक १३/०१/२०१५ अन्वये उपरोक्त नमुद उर्दु प्राथमिक शाळेत इयत्ता ९ वी व १० वीचे वर्ग सुरु करावे म्हणून सदस्य पारीत ठराव सर्वानुमते मंजूर केलेला आहे. सदर ठरावास आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. शासन निर्णय क्र.नमाश २००९/ (४९७/०९)/माशि - १ दिनांक ११/०६/२००९ नुसार माध्यमिक शाळेचे वर्ग स्वत:च्या उत्पन्नातून व राज्य शासनावर कोणतेही आर्थिक दायित्व न येता सुरु करु इच्छित असतील तर असे इ.८ वी ते १२ वीचे वर्ग सुरु करण्यास यापुढे शासन स्तरावरुन राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार राहणार नाही या अटीचे अधीन राहून परवानगी देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर शाळेचा आर्थिक भार मनपास सहन करावा लागणार आहे. तथापि मनपाचे ऐच्छिक कर्तव्य म्हणून इ.९ वी १० वीचे उर्दु माध्यमचे वर्ग सुरु करणे असलेने त्यासाठी पदनिर्मितीसाठी नगरविकास विभागाची मान्यता ही प्रशासन विभागामार्फत घ्यावी लागणार आहे. तसेच कर्मचारी वर्ग व येणा-या खर्चास मा.महानगरपालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच अंदाजपत्रकीय तरतूद करणे आवश्यक आहे. यासाठी काही

कालावधी लागणार आहे. सबब या सर्व बाबींचा विचार केल्यास अल्प कालावधीमध्ये पदनिर्मिती व पदे भरणे ही प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नसल्याने तसेच सदरचा निर्णय हा धोरणात्मक असलेने उपरोक्त नमुद केलेल्या उर्दु प्राथमिक शाळेत सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षापासून इ. ९ वी व १० वीचे वर्ग सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण आता विषय वाचलेला आहे त्यामध्ये एकूण सात शाळा आहेत. सहा शाळेत आठवी पर्यंतचे वर्ग आहेत आणि कासारवाडीमध्ये सातवी पर्यंतचे वर्ग आहेत. आता विषय असा आहे की आपल्याकडे एकूण सहा शाळांमध्ये आठवी शिकून नववी मध्ये गेलेले उर्दू माध्यमाचे २५४ विदयार्थी आहेत. मा.आयुक्त साहेब, या २५४ पैकी ७० टक्के या विदयार्थीनी आहेत. परिस्थिती अशी आहे की त्या मुली आपल्या घराजवळच्या शाळेपेक्षा दुर जावु इच्छित नाहीत किंवा पालक पाठवू इच्छित नाहीत. त्यामुळे एकटया त्या आकुर्डी माध्यमिक विदयालयामध्ये जे येतात ते जास्तीत जास्त विदयार्थी येतात विदयार्थीनी येत नाहीत, प्रवेश घेत नाहीत आणि त्यांची गळती होते. एक स्त्रि शिकली, एक मुलगी शिकलीतर दोन कुटूंब शिकतात. या समाजामध्ये या समाजाच्या उन्नतीसाठी जे वेगवेगळे भाषण करतात त्यामध्ये एक महत्वाच म्हणजे मुलींना शिक्षण देणं किंवा मुलांना या आमच्या समाजाला जर शिक्षण दिलं, उर्दुतून असो किंवा इंग्रजीतून असो किंवा मराठीतून असो तर तो समाज नक्कीच पुढे जाईल. परंतु जास्तीत जास्त मुली शिकाव्यात हे आपलही धोरण आहे, परवा मी आपल्याशी चर्चा करताना आपण सांगीतलं की खर्चाच्या बाबतीत शिक्षणासाठी आपण कुठेही, काहीही कमी पडू देणार नाहीत. आपल्या मराठी माध्यमाच्या या विषयाच्या अनुषंगाने मी काही त्रुटी सांगते. वर्ग सुरु करायचे होते, वर्ग आपल्याला प्राथमीकला जोडून सुरु करता येत नाहीत कारण माध्यमिक हा वेगळा विभाग आहे. मराठी माध्यमाच्या विभागातील नववीच्या तुकडया हया कमी होवू पाहतात. अनेक कारण त्याला असल्यामुळे आपल्याला ते वर्ग सुरु करता येत नाहीत आता विषय आहे २०१६-१७ चा परंतु आपल्याकडे २५४ विदयार्थी, विदयार्थींनी या यावर्षात आलेल्या आहेत. २०१५-१६ साठी वाट बघतात. त्याच शाळेत बसून आहेत. एकालाही शाळा सोडल्याचा दाखला दिलेला नाही. आपल्या शब्दावरुन ते त्याच शाळेमध्ये बसतात. आठवीला लागून एक एक वर्ग आहेत तिथं त्यांची व्यवस्था केलेली आहे. त्यांना जे आठवीचे शिक्षक आहेत तेच अजून शिकवत आहेत. आणि अशा परिस्थितीमध्ये फक्त आकुर्डी सोडून त्यांना दुसरीकडे कुठल्याही शाळेत ॲडमीशन घेता येत नाही. त्यामुळे आपल्याला यांना शिकवण्यासाठी आपल्याला नववीचे वर्ग या वर्षी सुरु करायचे आहेत त्यासाठी मी उपसूचना देणार आहे. तत्पुर्वी या विषयाच्या अनुषंगाने मी मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेत शाळेंच्या मुख्याध्यापकांशी बोलले, काही शिक्षकांशी बोलले आणि त्यांची परिस्थिती जाणुन घेतली. आपण आता लाखावर बक्षीस जाहीर केलेल आहे.

यावर्षीतर ब-याचशा विदयार्थ्यांना खुप मोठया प्रमाणावर बक्षीस मिळालेली आहेत. याही पेक्षा हे लाख कोटीवर जाऊ दया म्हणजे कोटी कोटी आपलं बक्षीस त्यांना जाऊ दया. एवढे विदयार्थी आपल्याकडून घडावेत, एवढे विदयार्थी त्याठिकाणी तयार व्हावेत हाच आपला शिक्षणाचा उद्देश आहे. त्यासाठी मराठी माध्यमाच्या विभागामध्ये, आपल्या १८ हायस्कूलमध्ये ज्या काही त्रुटी आहेत त्या मी याठिकाणी मा.आयुक्त साहेब तुमच्यासमोर मांडणार आहे. माध्यमिक शाळेमध्ये रुपीनगर, पिंपळेगुरव, थेरगांव, वाकड आणि मला इतरांशी काही कॉन्ट्रॅक्ट झालेला नाही, या शाळेमध्ये विदयार्थी खाली बसतात. त्याठिकाणी बेंचेस नाहीत. मागणी पाठवून वर्षे वर्षे झाले आहे, आपला भांडार विभाग काय करतो त्याकडे आपण जरा कटाक्ष टाकावा. आपल्याकडे १५ माध्यमिकच्या अनुदानीत शाळा आहेत त्याच पुर्ण अनुदान आपल्याला शासनाकडून मिळतं. अशावेळेस आपलं जे कर्तव्य आहे तिथं जे जे नाही ते ते आपण पुर्ण करावं तिथं मुख्याध्यापकच नाहीत. दोन-दोन, तीन-तीन वर्षे प्रभारी म्हणुन एक शिक्षक काम करतात. एखादया सहशिक्षकाला मुख्याध्यापक म्हणून प्रभारी पद दिलंतर, मी नाही त्यांच ऐकणार साहेब. मी कायतर कुठलाच शिक्षक ऐकणार नाही. मुख्याध्यापकांची ऑर्डर आहे का, नाही. या शाळा अनुदानीत असल्यामुळे मुख्यापकांच्या पगारावर आपल्याला जे अनुदान मिळतं तेही बुडतयं. आपल आर्थिक नुकसान होतय. त्यामुळे ताबडतोब या १५ माध्यमिक शाळांमध्ये मुख्याध्यापक नाहीत तिथं त्वरीत मुख्यध्यापकांची नेमणुक करावी. आयुक्त साहेब, माझी पहिली मागणी आहे की माध्यमिकच्या ठिकाणी शासनाचा एखादा अधिकारी त्वरीत नेमावा. त्याठिकाणी आपले माध्यमिकचे शिक्षणाधिकारी होते त्यांनी खेळी केली १८ च्यावर एकही शाळा त्यांनी वाढू दिलेली नाही कारण माध्यमिकच्या २१ शाळा झाल्यातर आपल्याला शासनाकडून अधिकारी मागवावा लागेल आणि तो मागवता येवू नये म्हणून त्यांनी ही खेळी केलेली आहे. आता शाळा वाढणारच आहेत तरी आपण त्यावर एखादा शासकीय शिक्षण अधिकारी कसा नेमता येईल त्याबाबतीमध्ये त्वरीत लक्ष घालाव आणि ते करावं. शिक्षक रिटायर्ड होतात, रिटायर्ड शिक्षकांच्या जागेवर वर्षवर्ष आपण इतर दुसरे शिक्षक नेमत नाहीत. त्या मुलांच किती हे दुर्दैव आहे किमान अनुदानीत शाळेततरी त्या नेमणुका त्वरीत कराव्यात. लेडीज शिक्षीका या लिव्ह व्हेकन्सीवर जातात, सहा महिने नियमाने त्यांना लिव्ह आहे आणि मुलं पाच वर्षाच होईपर्यंत त्या कितीही रजा घेवू शकतात. महिला बालकल्याणच्या बाबतीत आपला नियम आहे. त्यांच्या जागेवर आपण कधीही कुठेही शिक्षक नेमलेला नाही. एखादा बीएस्सी.बीएड गेलातर गणीताचे तास काही आर्टसचे शिक्षक घेवू शकणार नाहीत. त्यांच्या जागेवर तुम्ही सहा महिन्यासाठी घेवू शकतात. त्यांना तुम्हांला परमनंन्ट कराव अशी काही अट नाही, असा कायदा नाही. सहा महिन्यासाठी तुम्ही एखादे शिक्षक नेमू शकतात व तशी तरतूद कायदयामध्ये आहे. या सगळया बाबी मी तुमच्या पुढे सांगीतलेल्या आहेत. याचा तुम्ही विचार करायचा आहे, आपल आर्थिक नुकसानही होवू देवू नये मी एक उपसूचना मांडणार आहे

उर्दु मेडीयमची खरं म्हणज याच श्रेय आपले सहकारी जावेदभाई शेख यांना दयाव त्यांचा खुप आग्रह होता. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून माध्यमिक शिक्षण विभागाचे कार्यरत असलेल्या माध्यमिक विदयालयामध्ये उर्दू माध्यमाचे ६ ठिकाणी इयत्ता ९ वी व १० वी वर्ग सुरु करणेबाबत मुस्लीम विकास परिषदेचे अध्यक्ष मा.अखिल मुजावर यांनी पाठपुरावा केलेला आहे व या कामास सुरवातीपासून मा.कैलास कदम माजी विरोधीपक्ष नेता तसेच मा.सद्गुरु कदम नगरसेवक यांनी वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे.

दुसर म्हणजे मराठी माध्यमाच्या शाळेत सुध्दा काही अनुदानीत शाळा आहेत त्याचप्रमाणे विनाअनुदानीतही शाळा आहेत. शिक्षकांची आता इतकी कसरत चालू आहे, आठ दिवसातून एकदा लोक सहया करतात. समायोजन जे आहे ते बंद करा. शिक्षक किती कमी आहेत ते बघाव, तुम्हांला कळेलतरी. एकदा बदल्या करुन टाका. साहेब, तुम्ही एक तास जरी दिलातरी तुमच्या या चानक्ष बुध्दीने तुम्ही जाणुन घ्याल की किती शिक्षक कमी आहेत.त्या समायोजनाच्या ऐवजी बदल्या करुन टाका. आणखीन एक महत्वाच म्हणजे आपल्याला समायोजन करण्याची वेळ का येते. ६० हजाराच्या वर पगार आहे ज्या शिक्षकांना २००२ मध्ये अतिरीक्त आयुक्त मा.कोंडे साहेब होते त्यांनी महापालिकेतर्फे त्यांना बी.पी.एड. करायला ठेवल हे ३८ शिक्षक बी.पी.एड. करुन आलेले आहेत. हे शिक्षक डेप्युटेशनवर आलेले आहेत. आपण पगार वर्षभर दिला. फक्त ग्रॅज्युएट लोकांना हा पगार दिला आणि त्यांनी बी.पी.एड. केलेल आहे. हे शिक्षक सध्या कुठे आहेत हे क्रीडा अधिकारी मा.फुंदे साहेबांनी सांगावे. साहेब, या शिक्षकांना स्विमींग टँकवर पावत्या फाडायला ठेवलेल आहे. बरेचसे शिक्षक निवडणूकीच्या कामात निवडणूकीच्या काळात असतात. ते इतर वेळेत काय करतात, क्रीडा विभागात असतात का कुठं असतात. क्रिडा विभागाकडील कार्यरत असलेले बी.पी.एड क्रिडा शिक्षक माध्यमिक शिक्षण विभागाकडे ३८ पैकी ३५ शिक्षक वर्ग करणेत यावेत.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते १) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, शिक्षण मंडळामार्फत कार्यरत असलेल्या १) रुपीनगर २) थेरगांव ३) खराळवाडी ४) नेहरुनगर ५) लांडेवाडी / भोसरी ६) दापोडी या ६ ठिकाणी उर्दू माध्यमाच्या इयत्ता ८ वी च्या विदयार्थ्यांची संख्या २५४ इतकी आहे. इयत्ता ८ वी पास झालेले २५४ विदयार्थी हे इयत्ता ९ वी मध्ये गेले आहेत. २) इयत्ता ८ वी तील २५४ विदयार्थी संख्या विचारात घेता सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षामध्ये मराठी माध्यम विदयालयामध्ये इयत्ता ९ वी उर्दूची प्रत्येकी एक तुकडी सुरु करावी त्यासाठी उर्दू माध्यमिक शिक्षकांची आवश्यकता लागणार आहे. ३) उर्दु माध्यम इयत्ता ९ वी च्या ६ तुकडयासाठी B.sc.B.Ed. ३ शिक्षक व B.A., B.Ed. ४ शिक्षक घडयाळी तासिका बेसिसवर नेमणूक करणे तसेच वरील प्रमाणे मराठी माध्यमासाठीही B.sc.B.Ed. ३ व B.A.,B.Ed. ३ शिक्षकांची नेमणूक मुख्याध्यापकांचे मार्फत करावी. ४) पुढील काळात आवश्यकतेनुसार शिक्षकांची संख्या कमी जास्त करण्याचे अधिकार

तसेच आवश्यकतेप्रमाणे मानधनावर शिक्षक नियुक्ती करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देणेत यावेत. ५) मराठी, इंग्रजी, हिंदी या तीन विषयासाठी माध्यमिक विदयालयातील शिक्षकांचे नियोजन करणे. ६) क्रिडा विभागाकडील कार्यरत असलेले बी.पी.एड क्रिडा शिक्षक माध्यमिक शिक्षण विभागाकडे वर्ग करणेत यावेत. (एकूण ३८ पैकी ३५ शिक्षक वर्ग करणे) ७) सन २०१५-१६ या वर्षात महाराष्ट्र शासनाची पदनिर्मितीस मान्यता घेणेत यावी. सन २०१६-१७ पासून उपरोक्त सहाही ठिकाणी उर्दू माध्यमिक विदयालये सुरु करावीत नैसर्गिक वाढीच्या तत्वानुसार इ. १० वीचे वर्ग त्याचवेळी सुरु करावेत ८) वरील आवश्यक संपुर्ण खर्चास मान्यता देण्यात यावी.

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.किरण मोटे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका, शिक्षण मंडळातंर्गत कार्यरत असलेल्या कासारवाडी उर्दू शाळेत इयत्ता ८ वीचे वर्ग सुरु करणेची कार्यवाही ही शिक्षण मंडळ यांचे मार्फत चालू असल्याने सदर शाळेत इयत्ता ९ वी ची तुकडी सन २०१५-२०१६ या सालीच सुरु करावी. त्यासाठी उर्दू माध्यमिक शिक्षकांची आवश्यकता लागणार आहे. २) इयत्ता ९ वी चे तुकडीसाठी २ बीएस्सी बी.एड व बीए बी.एड २ असे एकूण ४ शिक्षकांची घडयाळी तासिका बेसीसवर नेमणूक करणे. सदरची नेमणूक ही मुख्याध्यापकांमार्फत करावी. ३) पुढील काळात आवश्यकतेनुसार शिक्षकांची संख्या कमी जास्त करण्याचे अधिकार तसेच आवश्यकते प्रमाणे मानधनावर शिक्षक नियुक्ती करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात यावेत. ४) सन २०१५-२०१६ या वर्षात महाराष्ट्र शासनाची पदनिर्मितीस मान्यता घेणेत यावी. तसेच कासारवाडी माध्यमिक विदयालय इयत्ता ९ वी चे वर्ग सुरु करावेत व नैसर्गिक वाढीच्या तत्वानुसार इयत्ता १० वी चे वर्ग त्यावेळेस सुरु करावेत. ५) वरील आवश्यक संपुर्ण खर्चास मान्यता देणेत यावी. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता त्वरीत अंमलबजावणी करावी.

**मा.संजय काटे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, सर्व उपसूचनां स्विकारल्या आहेत.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता शिक्षकांच्या संदर्भात उपसूचना मांडलेल्या आहेत त्या आपल्याला करता येतील का. से.नं. २२ याठिकाणी उर्दू शाळा आहे त्याठिकाणी १ ली ते ७ वी पर्यंत आहे. आता किरण मोटे यांनी विषय वाचला की कासारवाडीवरुन आकुर्डीला यावे लागते. तसच माझ्या परिसरातील जे काही विदयार्थी असतील विदयार्थींनी असतील त्यांना से.२२ वरुन आकुर्डीच्या शाळेत याव लागत. माझ्या पण शाळेच्या वर्ग खोल्या आहेत त्याठिकाणी १० वीचा वर्ग चालू करत असताना तो दोन शिफ्टमध्ये करावा. मा.आयुक्त साहेब, त्याठिकाणी शिक्षकांमुळे तेथे एकाच शिफ्टला शाळा चालते. वर्ग खोल्या कमी आहेत म्हणून माध्यमिकचे दुसरे लोक प्राथमिकच्या ज्या मराठी

शाळा आहेत तिथले वर्ग ते मागतात तरी तसं न करता दोन शिफ्टमध्ये शाळा दहावी पर्यंत सुरु करावी अशी विनंती करतो.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७०५ विषय क्रमांक - ८

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माध्य/शि/७/कावि/२००/२०१५, दि.०९/०६/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात पिंपरी चिंचवड मनपा शिक्षण मंडळ मार्फत कार्यरत असलेल्या १)रुपीनगर, २) थेरगांव, ३) खराळवाडी, ४) नेहरुनगर, ५) लांडेवाडी, ६) दापोडी इ. ६ उर्दु प्राथमिक शाळेत इ ८ वी पर्यंतचे वर्ग सुरु आहेत. तसेच कासारवाडी उर्दु प्राथमिक शाळेत इ. ८ वीचा वर्ग सद्यस्थितीत सुरु नाही. तो सुरु झालेनंतर पुढील वर्षात माध्यमिक शिक्षण विभागामार्फत ९ वी व त्यानंतर १० वीचा वर्ग सुरु करता येईल. सदर नमुद शाळेत इयत्ता ९ वी व १० वीचे वर्ग सुरु नसल्याने तेथील पालक यांची इयत्ता ९ वी व १० वीचे वर्ग सुरु करण्याची मागणी आहे. तसेच एकूण ६ उर्दु प्राथमिक शाळेतील इयत्ता ८ वीचे विद्यार्थ्यांची संख्या २५४ इतकी विचारात घेता वरील ठिकाणी माध्यमिक शिक्षण विभागामार्फत इयत्ता ९ वी व १० वीचे वर्ग सुरु करावयाचे आहेत. याबाबत मा.स्थायी समिती सदस्यांनी ठराव क्रमांक १०४८८ विषय क्रमांक १२७ दिनांक १३/०१/२०१५ अन्वये उपरोक्त नमुद उर्दु प्राथमिक शाळेत इयत्ता ९ वी व १० वीचे वर्ग सुरु करावे म्हणून सदस्य पारीत ठराव सर्वानुमते मंजूर केलेला आहे. सदर ठरावास आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. शासन निर्णय क्र.नमाश २००९/ (४९७/०९)/माशि - १ दिनांक ११/०६/२००९ नुसार माध्यमिक शाळेचे वर्ग स्वत:च्या उत्पन्नातून व राज्य शासनावर कोणतेही आर्थिक दायित्व न येता सुरु करु इच्छित असतील तर असे इ.८ वी ते १२ वीचे वर्ग सुरु करण्यास यापुढे शासन स्तरावरुन राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार राहणार नाही या अटीचे अधीन राहून परवानगी देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर शाळेचा आर्थिक भार मनपास सहन करावा लागणार आहे. तथापि मनपाचे ऐच्छिक कर्तव्य म्हणून इ.९ वी १० वीचे उर्दु माध्यमचे वर्ग सुरु करणे असलेने त्यासाठी पदनिर्मितीसाठी नगरविकास विभागाची मान्यता ही प्रशासन विभागामार्फत घ्यावी लागणार आहे. तसेच कर्मचारी वर्ग व येणा-या खर्चास मा.महानगरपालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच अंदाजपत्रकीय तरतूद करणे आवश्यक आहे. यासाठी काही कालावधी लागणार आहे. सबब या सर्व बाबींचा विचार केल्यास अल्प कालावधीमध्ये पदनिर्मिती व पदे भरणे ही प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नसल्याने तसेच सदरचा निर्णय हा धोरणात्मक असलेने उपरोक्त नमुद केलेल्या उर्दु प्राथमिक शाळेत सन २०१६-२०१७ या

शैक्षणिक वर्षापासून इ. ९ वी व १० वीचे वर्ग सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच १) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, शिक्षण मंडळामार्फत कार्यरत असलेल्या १) रुपीनगर २) थेरगांव ३) खराळवाडी ४) नेहरुनगर ५) लांडेवाडी / भोसरी ६) दापोडी या ६ ठिकाणी उर्दू माध्यमाच्या इयत्ता ८ वी च्या विदयार्थ्यांची संख्या २५४ इतकी आहे. इयत्ता ८ वी पास झालेले २५४ विदयार्थी हे इयत्ता ९ वी मध्ये गेले आहेत. २) इयत्ता ८ वी तील २५४ विदयार्थी संख्या विचारात घेता सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षामध्ये मराठी माध्यम विदयालयामध्ये इयत्ता ९ वी उर्दूची प्रत्येकी एक तुकडी सुरु करावी त्यासाठी उर्दू माध्यमिक शिक्षकांची आवश्यकता लागणार आहे. ३) उर्दु माध्यम इयत्ता ९ वी च्या ६ तुकडयासाठी B.sc.B.Ed. ३ शिक्षक व B.A., B.Ed. ४ शिक्षक घडयाळी तासिका बेसिसवर नेमणूक करणे तसेच वरील प्रमाणे मराठी माध्यमासाठीही B.sc.B.Ed. ३ व B.A.,B.Ed. ३ शिक्षकांची नेमणूक मुख्याध्यापकांचे मार्फत करण्यास मान्यता देणेत येत आहे. ४) पुढील काळात आवश्यकतेनुसार शिक्षकांची संख्या कमी जास्त करण्याचे अधिकार तसेच आवश्यकतेप्रमाणे मानधनावर शिक्षक नियुक्ती करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देण्यास मान्यता देणेत येत आहे. ५) मराठी, इंग्रजी, हिंदी या तीन विषयासाठी माध्यमिक विदयालयातील शिक्षकांचे नियोजन करणे. ६) क्रिडा विभागाकडील कार्यरत असलेले बी.पी.एड क्रिडा शिक्षक माध्यमिक शिक्षण विभागाकडे वर्ग करणेत यावेत. (एकूण ३८ पैकी ३५ शिक्षक वर्ग करणे) ७) सन २०१५-१६ या वर्षात महाराष्ट्र शासनाची पदनिर्मितीस मान्यता घेणेत यावी. सन २०१६-१७ पासून उपरोक्त सहाही ठिकाणी उर्दू माध्यमिक विदयालये सुरु करावीत नैसर्गिक वाढीच्या तत्वानुसार इ. १० वीचे वर्ग त्याचवेळी सुरु करावेत. ८) वरील आवश्यक संपुर्ण खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका, शिक्षण मंडळातंर्गत कार्यरत असलेल्या कासारवाडी उर्दू शाळेत इयत्ता ८ वीचे वर्ग सुरु करणेची कार्यवाही ही शिक्षण मंडळ यांचे मार्फत चालू असल्याने सदर शाळेत इयत्ता ९ वी ची तुकडी सन २०१५-२०१६ या सालीच सुरु करावी. त्यासाठी उर्दू माध्यमिक शिक्षकांची आवश्यकता लागणार आहे. २) इयत्ता ९ वी चे तुकडीसाठी २ बीएस्सी बी.एड व बीए बी.एड २ असे एकूण ४ शिक्षकांची घडयाळी तासिका बेसीसवर नेमणूक करणे. सदरची नेमणूक ही मुख्याध्यापकांमार्फत करण्यास मान्यता देणेत येत आहे. ३) पुढील काळात आवश्यकतेनुसार शिक्षकांची संख्या कमी जास्त करण्याचे अधिकार तसेच आवश्यकते प्रमाणे मानधनावर शिक्षक नियुक्ती करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देण्यास मान्यता देणेत येत आहे. ४) सन २०१५-२०१६ या वर्षात महाराष्ट्र शासनाची पदनिर्मितीस मान्यता घेणेत यावी. तसेच कासारवाडी माध्यमिक विदयालय इयत्ता ९ वी चे वर्ग सुरु करावेत व नैसर्गिक वाढीच्या तत्वानुसार इयत्ता १० वी चे वर्ग त्यावेळेस सुरु करण्यास मान्यता देणेत येत आहे. ५) वरील आवश्यक संपुर्ण खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता त्वरीत अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७०६ विषय क्रमांक - ९

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.नगरसचिव

**<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>**

अ) दि. २२/४/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि. १३/५/२०१५ व १६/५/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७०७ विषय क्रमांक - १०

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

अ) दि.१५/४/२०१५ व ६/५/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि. ६/५/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७०८ विषय क्रमांक - ११

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.नगरसचिव

**<u>मा.क्रिडा समिती</u>**

दि. ६/५/२०१५ व दि.७/५/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १२

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) अ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्र. अप्र/११/कावि/६/२०१५ दि.०९/०१/२०१५

२) मा.आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव.

३) मा.अ प्रभाग समिती कडील ठ.क्र. ५१ दि. १७/१२/२०१४

४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ६४९ दि.२६/२/२०१५

ट्रान्सपोर्टनगरी सेक्टर २३ लगत (देहु रोड कॅन्टोमेंट बोर्ड हद्दीत) असलेल्या "दी इंस्टिटयूट ऑफ चार्टेड अकौंटन्ट ऑफ इंडिया" या कार्यालयास सध्य स्थितीत पिण्याचे पाण्याचा नळ नाही. सदर इंस्टिटयूट ने पाण्याचे नळ मिळणेकामी विनंती केलेली आहे. पिंण्याचे पाणी ही अत्यंत महत्वाची बाब असलेने त्यांना नळकनेक्शन देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.आशा सुर्यवंशी -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७०९ विषय क्रमांक - १२

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) अ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्र. अप्र/११/कावि/६/२०१५ दि.०९/०१/२०१५

२) मा.आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव.

३) मा.अ प्रभाग समिती कडील ठ.क्र. ५१ दि. १७/१२/२०१४

४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ६४९ दि.२६/२/२०१५

विषय क्रमांक १२ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १३

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.प्रशासन अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय यांचे पत्र क्र.कक्षे/कावि/६७/२०१५ दि.०८/०६/२०१५

२) मा.प्रशांत शितोळे व मा.रोहित आप्पा काटे यांचा प्रस्ताव.

३) मा.क प्रभाग समितीकडील ठ.क्र.१२४ दि.०३/०६/२०१५

पिंपरी चिंचवड शहरामध्ये अनाधिकृत बांधकामाचा प्रश्न अतिशय जटील झाला व त्यामुळे आज अनेक सर्वसामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. वास्तविक पाहता औद्योगिक नगरीमध्ये समाविष्ठ असणा-या विविध गावांमध्ये १०० स्क्वेअर फुटांपासून ते ३००० स्क्वेअर फुटांपर्यंत छोटे भूखंड करुन त्याची खरेदी विक्री झाली. महानगरपालिका बांधकाम नियंत्रण नियमावली मध्ये छोटया बांधकामांकरिता परवानगी प्रक्रिया अतिशय किचकट असल्याने छोटे भूखंडधारक विशेषता २०० स्क्वेअर मीटरपर्यंतचे भूखंड मालक महानगरपालिकेकडे परवानगीसाठी आलेच नाहीत, त्यामुळे शहरातील असंख्य छोटया भूखंडधारकांनी किचकट वेळखाऊ बांधकाम परवानगी प्रक्रिया असल्याने परवानगीविना बांधकामे केली व त्याच अनाधिकृत बांधकामाचे स्वरुप आज शहरात कठीण स्वरुपात दिसत आहे. याकरिता शहरातील छोटया भूखंडधारकांना सोप्या पध्दतीने बांधकाम परवानगी महानगरपालिकेने देणे आवश्यक आहे. यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये काही प्रमाणात सुधारणा व बदल होणे गरजेचे आहे. यासाठी २०० स्क्वेअर मीटर पर्यंतच्या छोटया आकाराच्या भूखंडासाठी खालीलप्रमाणे बदल व्हावेत व MRTP च्या कलम १९६६ अन्वये विकास नियंत्रण नियमावलीमध्ये - १) शहरात २०० स्क्वेअर मीटरच्या भूखंडापर्यंतची मोजणी महानगरपालिका ठरवेल इतकी माफक फी आकारुन महानगरपालिकेच्या नगररचना व बांधकाम परवानगी विभाग यांचेमार्फत संयुक्तरित्या केली जाईल व तदनंतर मा.जिल्हाधिकारी व मा.नगर भू-मापन अधिकारी यांना कळविणेत येईल. २) २०० स्क्वेअर मीटरपर्यंतचे जागेचे क्षेत्रफळास दाटवस्ती (Congested Area) चे बांधकाम परवानगी नियम लागू असावेत. ३) Congested Area मधील २०० स्क्वेअर मीटर पर्यंतचे क्षेत्रफळास कमाल २.०० चटई निर्देशांक लागू राहिल. ४) Congested Area मधील पार्कींग नियमावलीत बदल करणे. ५) Congested Area मध्ये Shifted Boundary शिथील करणे. याप्रमाणे बदल होणेकामी मा.महापालिका सभेमार्फत मा.शासन मान्यतेस पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, या विषयाच्या अनुषंगाने एक माहिती देऊ इच्छितो की, आपल्या शहरात ज्या काही अडचणीच्या गोष्टी आहेत त्या रेग्युलराईज व्हाव्यात या दृष्टीने या सभागृहाची मंजूरी व्हावी त्यामुळे शहरातील नागरीकांची जी काही टांगती तलवार डोक्यावर आली आहे. ती दूर करण्यासाठी हे होणे गरजेचे आहे. मा.महापौर साहेब,विषय पूर्ण व्यवस्थित वाचला असेल तर तुम्हाला एक लक्षात येईल की, गेले काही वर्षांपासून मा.उच्च न्यायालयाने शहरातील अनधिकृत बांधकामे पाडायचा जो आदेश दिला, निर्णय घेतला. त्यानंतरसुद्धा शासनाकडे त्यांनी काही शासनाच्या अखत्यारित निर्णय होऊन शहरातील नागरीकांना न्याय देता येतो का हा मार्ग आजदेखील मोकळा ठेवला आहे हे विसरून चालणार नाही. गेले सहा महिन्यांपूर्वी आमच्या पक्षाचे सरकार ज्यावेळी राज्य शासनात व केंद्र शासनात कार्यरत होते, त्यावेळी आमचे आदरणीय नेते या राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना अनेक बैठका घेऊन कुंटे समिती स्थापन केली त्या समितीत तुमच्या अनेक तांत्रिक बाबी मागवल्या गेल्या. त्यानंतर या जटील प्रश्नावर कुठला मार्ग काढावा हे शोधायचे काम गेले दोन वर्षांपासून चालू आहे. ब-याच अंशी हे काम मार्गी लागल्यानंतर दूर्दैवाने राज्यात आमच्या पक्षाचे सरकार आले नाही. आणि हा प्रश्न आजसुद्धा त्याचप्रकारे प्रलंबित राहीलेला आहे. आजच्या सरकारमध्ये निर्णय घेण्याची क्षमता असलेली लोकं त्यावेळी विरोधी पक्षात होते, त्यावेळी ते आमच्या नावाने ओरडत होते की, एका शहरातील दीड लाख लोकांचा प्रश्न सोडवू शकत नाहीत. राष्ट्रवादीचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार किंवा त्यावेळी तत्कालिन जे मंत्री होते, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे होते त्या त्या लोकांवर बरेच गंभीर आरोप अनधिकृत बांधकामाच्या प्रश्नाबाबत केले गेले होते. खरेतर भाजपाचे सरकार येऊन ६/७ महिने झाले आहेत. निवडणूका झाल्या झाल्या, दिवाळीनंतर अधिवेशन लागले. त्या अधिवेशनात शहरातील सगळ्या आमदारांनी हा प्रश्न प्रामुख्याने उपस्थित केला होता. तिथे धरणे धरायचा प्रयत्न केला. मा.मुख्यमंत्री यांनी आग्रहाने हा प्रश्न सोडवावा म्हणून त्यांनी प्रयत्न केला. आमदार मा.महेश लांडगे असतील, मा.गौतम चाबुकस्वार असतील, मा.लक्ष्मण जगताप असतील हे तिथे होते. योगायोगाने हे तीनही आमदार काही अंशी सरकारमध्ये समाविष्ट आहेत. दोन तर पक्षाचेच आहेत. मा.महेश लांडगे अपक्ष असले तरी ते शहरातील लोकांसाठी, त्यांना मदत करण्याची त्यांची भूमिका असते. तरीदेखील आज जवळपास दोन अधिवेशने झाली, तरीसुद्धा हा प्रश्न काही मार्गी लागलेला नाही. केवळ आंदोलने करुन, रस्त्यावर बसून यामुळे हा प्रश्न सूटणार नव्हता हे आम्हालाही राष्ट्रवादीच्या लोकांना कळत होते, काँग्रेसच्या लोकांनाही कळत होते. परंतू सगळ्या बाबी कायदेशीर मार्गाने जाऊन, त्यात कोणतीही अडचण न येता निर्णय घेतला तरी चुकीचा, नाही घेतला तरी चुकीचा अशी

परिस्थिती त्यावेळी निर्माण झाली. परंतू आम्हाला निर्णयापर्यंत पोहोचता आले नाही. ज्यावेळी निर्णय घ्यायचा होता त्यावेळी आचारसंहिता लागू झाली. त्यामुळे तेव्हा निर्णय घेता आला नाही. हा प्रश्न प्रलंबित आहे. सोडवू शकलेले नाहीत. आज मात्र शंभर टक्के भाजप-शिवसेनेचे सरकार असल्यामुळे हा प्रश्न प्रलंबित आहे. ज्यावेळी आमचे वरीष्ठ कायदेशीर कारण सांगायचे, त्यावेळी हा कळीचा मुद्दा म्हणून, भावनिकरित्या लोकांचे प्रश्न समोर आणून हे विरोधी पक्षात असताना कोणत्या पद्धतीने सरकार आपल्याला फसवते आहे अशा प्रकारची जाणीव करुन देत होते. आज हेच निर्णय घेण्याच्या भूमिकेत आहेत. ते आल्यानंतरसुद्धा हा प्रश्न तसाच आहे. ज्यावेळी अनधिकृत बांधकामाबाबतीत न्यायालयाचा अवमान न होता निर्णय घेताना उल्हासनगरच्या धर्तीवर असेल किंवा दिल्लीसारख्या राज्यात घरांचे रेग्युलराईजेशन झाले, गुजरातमध्ये झाले किंवा इतर राज्यांत झाले, चांगले मार्ग आपल्या राज्यांत आणून तसा कोणत्या प्रकारचा कायदा आपल्याकडे करता येतो का. सर्वांना शहरातील नागरीकांना संरक्षण देता येते का याचा अभ्यास चालू असतानाच ज्यानेत्याने राजकीय पोळी भाजायला सुरुवात केली. या हेतूने त्यात्या वेळी उच्च न्यायालयात ज्यांनी भूमिका मांडली, जे-जे आदेश दिले. तुम्हाला दर महिन्याला, एक/दोन महिन्यांना किती बांधकामांवर कारवाई केली याचा अहवाल द्यावा लागतो, ही खरेतर आपल्या दृष्टीने निंदनीय गोष्ट आहे. आपल्या देशात अशा प्रकारे निर्णय झाल्यानंतर त्याला रेग्युलराईज करायचे सोडून तुम्हाला ही कारवाई करण्यात आजच्या राज्य सरकारला मजा वाटते. ही खरेतर अतिशय वाईट गोष्ट आहे हे मुद्दाम खेदाने नमूद करावेसे वाटते. गेली ५/१० वर्षे काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असताना अनेक शहराच्या हिताचे निर्णय घेतले. त्यातील अनधिकृत बांधकामाचा प्रश्न तिथपर्यंत पोचला नाही ही दूर्दैवाची गोष्ट आहे. परंतू तो करत असताना आम्ही अभ्यासपूर्वक परिस्थिती हाताळल्यानंतर किंवा पाहिल्यानंतर अशा गोष्टी लक्षात आल्या की, महापालिकेच्या डि.सी. रुलमध्ये, महापालिकेच्या काही नियमांत ब-याच त्रुटी आहेत. म्हणून हा प्रश्न तसाच प्रलंबित राहीला. त्यामुळे हा विषय मार्गी लावण्यासाठी मी सभागृहाला विनंती करतोय. त्यासाठी हा विषय समोर आणला आहे. तुम्ही जी-जी कारवाई आज करताय, ती न्यायालयाच्या आदेशानुसार करताय. परंतू ही कारवाई करत असताना एका बाजूला त्याचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्याचा प्रयत्न होत असताना आपण जी बांधकामे पाडतोय, ती दोन हजार ते अडीच हजार स्क्वे.फूटाच्या आतल्या भूखंडावर झाली आहेत. हा विचार होणे गरजेचे आहे. एवढ्याच क्षेत्रफळावर ही बांधकामे का झालीत याची कारणे इथून मागेसुद्धा बरेच वेळा सांगितली आहेत. आजही सांगतो की, आपली महापालिकेची बांधकाम परवाना प्रक्रिया किचकट आहे. आमच्या घराच्या प्लॉट एवढी कॉस्ट जर मोजणीसाठी द्यावी लागत असेलतर तो मोजणी कशासाठी करेल. मी जर गरीब कामगार आहे, ज्या शेतक-यांनी मला जागा विकली आहे, तेवढ्याच जागेत मी चार कॉलम बांधतो, दोन/तीन बेडरुम बांधतो आणि वरचे बांधकाम अनधिकृत करत राहतो. सुरुवातीला परमिशन

मिळत नाही. अशा प्रकारची बांधकामे माझ्या प्रभागात असतील तर माझे मतदार म्हणून यात प्रत्येक पक्षाच्या राजकीय व्यक्तीचेसुद्धा चुकले आहे. हे सगळे होत असताना जो-तो व्यक्ती सदस्यांकडे जाऊन, माझे असे-असे काम आहे, या कामात कोणतीही अडचण येऊ देऊ नका अशी विनंती त्या काळात करत होता व आजही करतो आहे. परंतू ही वेळ का यावी. वास्तविक पाहता, कोणत्याही प्रशासकीय मंजूरीचे अधिकार नगरसेवक करु शकतो का, नाही करु शकत. ही प्रशासकीय बाब आहे. त्यांना इथे आल्यानंतर वेळकाढूपणा वाटला नाही पाहिजे. सगळ्यात किचकट प्रक्रिया भोसरीची आहे. म्हणून ही प्रक्रिया सुलभ करणे गरजेचे आहे राज्य शासनाने आत्ता एन.ए. बाबतीत निर्णय घेतला, काय केले. विनाकारण एन.ए.चे एक टेबल वाढवले. इथला वेळ वाचला असता. ते तुम्हाला कलेक्टर यांच्याकडे पाठवावेच लागते. सरसकट डीपीवर आर झोन दिसत असेल तर सरसकट आरझोन देण्याची इथे गरजच नाही. कलेक्टर यांच्याकडे कोणीही जावे. परंतू तसे न करता तुम्ही फक्त सुविधा करुन दिलीत. बाकी काही केले नाही. अशा प्रकारच्या त्रुटींना सर्वसामान्य नागरीक जेव्हा अप्लाय करतो, त्यावेळी असणा-या परवानगीमध्ये सुलभात पाहिजे. आज तसे न करता आणखी जटीलता आणतोय. नागरीकांना त्रास होत असेल तर आपल्या डिजिटायझेशन असलेल्या महापालिकेत अशा प्रकारचे काम अपेक्षित नाही. ते सोप्पे करावे म्हणून छोट्या आकाराच्या भूखंडांचे जे अर्ज भविष्यात येतील, त्याच्या किमान कागदपत्रांची मागणी करणे किंवा त्याप्रमाणे बांधकाम परवाना देणे आवश्यक आहे. त्यात स्पष्ट लिहिले आहे की, २०० स्क्वे. मीटरच्या भूखंडांना महापालिकेच्या नगररचना व बांधकाम परवाना विभागाकडूनच संयुक्तरित्या मोजणी केली जाईल. नंतर जिल्हाधिकारी व भूमापन अधिका-यांना कळविले जाईल. त्यांनी मोजणी करु नये असे म्हणत नाही. बिल्डींग परमिशन विभागाकडे माणसाने परवानगीसाठी अर्ज दाखल झाल्यानंतर आपला माणूस साईट व्हिजिटसाठी जातच असतो. तो प्लॉटची मोजणी का करत नाही. शासकीय मोजणीच कशाला पाहिजे. जिथे परमिशन देण्याचा अधिकार आहे, तिथे मोजणी करायचा पण अधिकार पाहिजे. त्यासाठी माझी आपल्याला विनंती आहे की, कदाचित या विषयात काही फेरबदल किंवा बदल करावेसे वाटत असतील तर ते शासनाकडे सादर करावेत व त्याप्रमाणे करण्याचा प्रयत्न असेल तर तशा प्रकारचे बदल आपण सूचवले पाहिजेत. २०० स्क्वे.मीटर जागेच्या क्षेत्रफळात गावठाणाचे नियम लावतो. आज रोजी दीड लाख बांधकामांवर जी टांगती तलवार आहे, त्यांना कंजस्टेड एरियाचा नियम लागू केला, त्यानंतर शासनाने अतिरिक्त एफएसआयचा नियम लागू करायचे सूचवले तर ही बांधकामे शंभर टक्के रेग्युलराईज होतील. भविष्यात शहरातील जे रिकामे प्लॉट आहेत, चिखलीचा परिसर आहे, सांगवी असेल, पिंपळेगुरव असेल, थेरगाव असेल, भोसरीचा परिसर आहे, जिथे कामगार वस्ती दाट आहे तिथे आजसुद्धा रिकामे भूखंड असे आहेत. तिथे काही ठिकाणी जाण्यासाठी रस्ता नाही. तिथे शिफ्टेड बाऊंड्रीचा प्रश्न येतो. तिथे काही नियमांत शिथिलता आणणे आवश्यक आहे. काही अंशी नियम शिथिल करुन चांगले

नियम करुन आहे ते बांधकाम रेग्युलराईज करणे, नवीन बांधकामांना बिल्डींग परमिशन देऊन ऑथोराईज करणे हे क्रमप्राप्त होईल. कंजस्टेड एरियात २०० स्क्वे. मीटरचे क्षेत्रफळात कमाल २ निर्देशांक लागू राहील. छोट्या प्लॉटधारकांनाही हा नियम शंभर टक्के लागू राहणार आहे. माझा जर २ गुंठे प्लॉट आहे. मला तुमच्या नियमाप्रमाणे ठराविक रुंदीचा रस्ता मिळाला नाहीतर मी तिथे हाईचपर्यंत जाऊ शकेल. कदाचित साईड मार्जिनचा प्रश्न येणार नाही. पण फ्रंट मार्जिनला अडचण येत असेलतर, रस्त्यामधील साईडला ब-याच इतर अडचणी असतील तर हाईटमधील पूर्ण एफएसआय मला लागू होत नाही माझा एफएसआय ४ इतका झालेला असतो. मी २ गुंठ्यांत ८,००० ते ९,००० स्क्वे.फूट बांधकाम केलेले असते. आज हिच परिस्थिती आहे. तुम्हाला नियमांत सुसूत्रता आणायची असेलतर तुम्हाला सरसकट २ गुंठ्यांपर्यंत २ एफएसआय लागू केलातर तो संबंधित अर्जदार ४,००० स्क्वे. फूटाचे बांधकाम करु शकेल. नागरीकांना त्यामध्ये थोडासा रिलिफ मिळेल. हे मी मांडतोय म्हणून ते व्हावे असे नाहीतर तुम्हाला यामध्ये नागरीकांच्या हरकती/सूचना घ्याव्या लागणार आहेत. तुम्हाला नियम ३७ला जावे लागेल. नियम ३७ प्रमाणे करायचे म्हटलेतर सूचना हरकती घ्याव्या लागतील. ज्या सूचना हरकती ग्राह्य राहतील त्यानुसार शासनाक़डे प्रस्ताव पाठवावा अशीही विनंती आहे कंजस्टेड एरियात पार्किंगचा नियम आहे. गावठाणांत पार्किंग याची तुलना केलीतर डि.सी. रूल व्यवस्थित पाहिलातर अत्यंत विरोधाभास जाणवेल की, आपण काय पार्किंग अलाऊट करतोय, जागेवर काय परिस्थिती आहे. कोणत्या क्षेत्रफळात आहे,नॉर्मल झोनमध्ये आहे,इंडस्ट्रियलमध्ये आहे, कंजस्टेड एरियात आहे. कंजस्टेड एरियात पार्किंग नॉर्मस् फार किचकट आहेत यात कुठेतरी शिथिलता आणावी. त्याप्रमाणे नागरीकांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. तुम्ही याबाबतीत विचार करावा. शिफ्टेड बाऊंड्रीत सुधार करा अशी सुद्धा सूचना केली आहे. थोडक्यात काय हे सगळे नियम आजरोजी शहरातील सर्वसामान्य नागरीकांसाठी लागू करा. कमर्शियल माणसाला हे नियम लागू होणार नाहीत राहत्या घरांना किवां इमारतींना अशा प्रकारच्या परवानग्या देण्यात येतील. म्हणून हा विषय मा.महासभेच्या मान्यतेसाठी आणला आहे. शहरातील जवळपास दीड लाख लोकांच्या घरांचा प्रश्न प्रलंबित आहे. राज्य शासनाला प्रश्न मिटवण्याचा मार्ग सापडेल. आत्तातरी सापडेल. आम्ही त्या निर्णयापर्यंत आलो होतो. तो घेता आला नाही हे खेदाने म्हणावे लागते आहे. त्यांनी सुद्धा हा निर्णय शहरवासियांसाठी आजपर्यंत घेतलेला नाही. म्हणून अशाप्रकारच्या चांगल्या बदलाला आपण मान्यता द्यावी व हा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावा अशी विनंती आहे.

**मा.अजित गव्हाणे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, याठिकाणी मा.प्रशांत शितोळे यांनी प्रभागातून महापालिका सभेपुढे विषय आणला आहे. आपण आल्यापासून किंवा या पूर्वीपासून ही पिंपरी चिंचवडमधील जटील समस्या आहे मा.प्रशांत शितोळे यांनी उल्लेख केल्याप्रमाणे याविषयावर विधानसभेच्या, लोकसभेच्या निवडणूका घडल्या गेल्या. आम्हाला

पराभवाला सामोरे जावे लागले. या विषयाचे राजकारण न होता विषय सोडवला गेला पाहिजे. जवळपास दीड लाख घरे किंवा प्रत्यक्षात खूप मोठ्या संख्येने लोक यात बाधित होत आहेत. यामुळे लोकांवर अन्याय होतो आहे. सर्वपक्षीय लोकांनी पुढाकार घेऊन प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. तीन आमदारांनी खूप प्रयत्न केला. आमच्या पक्षाचे नेते अजितदादा पवार यांनी खूप प्रयत्न केले. पण प्रत्यक्षात हा प्रश्न सुटला नाही. कुंटे समिती स्थापन केली गेली. या समितीच्या माध्यमातून शासनाने पुढे कारवाई करायचा प्रयत्न चालू केला आहे. परंतू हा प्रश्न आजही प्रलंबित आहे. मा.प्रशांत शितोळे यांनी हा विषय छोट्या प्लॉटधारकांसंदर्भात आणला आहे. मला वाटते, बिल्डींग परमिशनच्या पठाण साहेबांनी व त्यांच्या टिमने आपल्याकडे फक्त फ्रंट मार्जिन ठेवले पाहिजे व साईड मार्जिनचे रिलॅक्सेशन दिले जावे अशी चर्चा झाली होती. हे शासनाकडे पाठवले आहे अशी माहिती आहे. पण प्रत्यक्षात त्यात पुढे काय झाले. आज परिस्थिती अशी आहे की, त्याठिकाणी लोकांनी एफएसआय जास्त वापरला आहे. त्यात त्याठिकाणी मार्जिन नाही. त्या लोकांची घरे आज नियमित करत नाहीत. शासनापुढे अडचणी आहेत. मुळात हा प्रश्न का निर्माण होतो. इथून पुढील काळात अशा प्रकारचा प्रश्न शहरात निर्माण होऊ शकतो. किंबहुना शंभर टक्के होणार आहे. शासनाने जे नियम लावले आहेत किंवा महापालिकेचे जे नियम आहेत. ते मुळात इतके किचकट आहेत एन.ए.चा उल्लेख केलातर खरेतर आपला रेसिडेन्शियल प्लॉट असतो. पुन्हा कलेक्टरकडे जाऊन एन.ए.ची मान्यता घ्यायची ही किती अवघड प्रोसिजर आहे. सर्वसामान्य माणूस मोजणी करु शकत नाही. त्याचबरोबर यूएलसी कायदा रद्द होऊन किती वर्षे झालीत. प्रत्यक्षात एन.ए.ला फाईल जाते त्यावेळी त्याला युएलसी आणावी लागते. जर शासनाने युएलसी कायदा रद्द केला आहे तर तिथेदेखील दुकान उघडे ठेवले आहे. सामान्य माणसाच्या दृष्टिकोणातून हे शक्य आहे का, बिल्कूल शक्य नाही. त्यांच्या दृष्टीने स्वप्नच असणार आहे. तुम्ही प्रत्येकाने एक प्लॉट घ्या व अनुभव घेऊन पहा. प्लॅन सॅक्शन करायचा. सगळ्यांना अनुभव येईल की, किती बिकट परिस्थिती आहे. त्या लोकांवर अन्याय होतो. अशा परिस्थितीत आपण सगळे विशेषतः प्रशासन, महापालिकेचा अधिकारी खूप चांगल्या प्रकारे सहकार्य करतो. पण नागरीकांना महसूल खात्यात इतका वाईट अनुभव येतो. तिथे काम करणे इतके किचकट व अवघड आहे. परंतू महाराष्ट्र सरकारमध्ये पूर्ण राज्यात अशा प्रकारचा निर्णय घ्यावा लागणार आहे. माझ्या माहितीप्रमाणे मोदी साहेबांनी गुजरातमध्ये जी डेव्हलपमेंट केली आहे त्यात प्रमुख मुद्दा होता की, त्यांनी सगळे कायदे सुटसुटीत केले आहेत. म्हणजे लोकांना प्रत्यक्षात काम करता यावे असे मी ऐकून आहे. प्रत्यक्षात माहिती नाही. पण महापालिका हद्दीत जर लोकांना सहजपणे प्लॅन पास करता आलातर अनधिकृत बांधकामे होणारच नाहीत. ही कामगार नगरी आहे. मुळात जो कामगार नागरीक आहे तो कामानिमित्ताने इथे आला आहे. लोकांकडे पाच पैसे नाहीत. पिंपरी चिंचवड महापालिका निर्माण झाली. एमआयडीसी आली. त्यानंतर ख-या अर्थाने

इथे येणा-या कामगारांना स्वस्तात घर मिळावे म्हणून प्राधिकरण निर्माण झाले. परंतू प्रत्यक्षात तसे घडले नाही. त्याठिकाणी कामगारांना शेतक-यांच्या जमिनी होत्या त्या मिळाल्या. अर्बन लँड सिलिंग ऍक्ट आला म्हणून त्याच्या भितीपोटी शेतक-यांनी त्यांच्या जमिनी विकल्या. तिथे पिंपरी चिंचवड शहरामध्ये फार मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झाली लोकप्रतिनिधींनी, सगळ्या राजकीय पक्षाच्या लोकांनी लोकांना मदत केली, प्रशासनाने सुद्धा मदत केली. आज एवढी मोठी कठीण परिस्थिती निर्माण झाली आहे. आत्ता सत्ताधारी पक्षातील लोकांना माझी विनंती राहणार आहे की, यात पाठपुरावा करा. आम्ही आंदोलन करणार नाही. परंतू तुम्हाला मदत करायचा निश्चितपणे प्रयत्न करणार. आगामी काळात लवकरात लवकर हा प्रश्न शहराच्या दृष्टिकोणातून सुटला पाहिजे असे प्रयत्न झाले पाहिजेत. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या निमित्ताने मला आपल्याला सांगायचे आहे की, विषय वेगळा आहे परंतू पिंपरी चिंचवड शहराचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश केला गेलेला नाही आपल्याला कल्पना आहे. राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेसचे सरकार असताना पवार साहेबांच्या माध्यमातून, अजितदादा पवार यांच्या माध्यमातून, त्यावेळी मा.मंगलाताई कदम महापौर होत्या, तेव्हा पिंपरी चिंचवड शहराचे नाव जेएनएनयूआरएम योजनेत होते. पुणे शहराबरोबर आपल्याही शहराचा अंतर्भाव केला होता. म्हणून इथे मोठ्या प्रमाणावर विकास दिसतोय. जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून केंद्र शासनाने, राज्य शासनाने फंड दिला. म्हणून खूप मोठ्या प्रमाणात कायापालट झालेला दिसतोय. आपल्या पिंपरी चिंचवड शहराला बेस्ट सिटीचा अवॉर्ड मिळाला कारण आपल्याला एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी मिळाला. इथल्या नेतृत्वाखाली अत्यंत चांगल्या प्रकारे विकास करायचा प्रयत्न केला. म्हणून पूर्ण भारतात शहरात आपली वेगळी ओळख दिसते आहे जर आपल्या महापालिकेचा समावेश स्मार्ट सिटीमध्ये केला गेला नाहीतर भविष्यकाळात आपल्या वॉर्डातील नागरीकांना प्राथमिक सुविधा देणे सुद्धा शक्य होणार नाही. मा.आयुक्त साहेब, मला माहित नाही आपण प्रशासकीय लेवलवर काय प्रयत्न केला. पण मा.महापौर साहेब आपण शहराच्या प्रथम नागरीक आहात, आपण सुद्धा यात लक्ष घातले पाहिजे. जरी सरकार वेगळ्या पक्षाचे असले तरी महापौर म्हणून तुम्ही व सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे. स्मार्ट सिटी म्हणून ज्या शहरांची निवड केली आहे, त्यात पिंपरी चिंचवड शहराचा अंतर्भाव केला पाहिजे. महापालिका स्तरावर, विधानसभा स्तरावर जे प्रतिनिधी आहेत त्यांनी, विशेषतः शिवसेना-भाजपाच्या प्रतिनिधींनी प्रमुख पुढाकार घेऊन आपल्या शहराचा यात अंतर्भाव केला पाहिजे अशी माझी आग्रही मागणी यानिमित्ताने असणार आहे. प्रशासक म्हणून आपण यात लक्ष घालावे. आम्हाला सगळ्यांना यात विश्वासात घ्यावे. आपल्या नगररचना विभागात डि.सी. रुलमध्ये बदल करायचे चालले आहे. हे काम इतके सस्पेन्स चालले आहे. कोणालाही काहीच कळू द्यायचे नाही. बिल्डींग परमिशन यांना सुद्धा माहित नाही. अधिका-यांना कल्पना नाही. मुळात यात सगळ्यांना,आर्किटेक्ट लोकांना सामावून घेतले पाहिजे. बाकी लोकांना समाविष्ट

करुन घेतले पाहिजे. नियम करत असताना सर्व लोकांना विश्वासात घेतले पाहिजे. बीआरटीचा नियम करताना अशी चूक झाली. हा बीआरटीचा नियम करताना असा केला गेला आहे की, त्यामुळे कोणीही खाजगी प्लॅटधारक/विकसक बिल्डींग बांधू शकत नाही. अशी परिस्थिती तिथे झाली आहे. म्हणून असे काहीतरी होऊ नये म्हणून माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे की, त्यांनी नगररचना विभागाला सांगा. ही काय तुमची प्रायव्हेट प्रॉपर्टी नाही. आपण शहराचे नियम करायला बसलोय. शहराचा विकास करायचा आहे. त्यामुळे हे डी.सी. रूल सिक्रेट न ठेवता लोकांना विश्वासात घ्या. त्यासंबंधात ज्या-ज्या लोकांना नॉलेज आहे, त्यांना विश्वासात घ्या मग हे डि.सी. रूल बनवायला घ्या अशी अपेक्षा व्यक्त करतो. मा.प्रशांत शितोळे यांनी जो विषय मांडला आहे तो खरोखर लोकांच्या हिताच्या दृष्टीने विषय आहे. यात आपण खरोखर सकारात्मक विचार करावा. नगररचना विभागाकडून अपेक्षा आहे की, नागरीक जेव्हा मोजणी नकाशा घेऊन येतात तेव्हा ९० टक्के नकाशा कधीच जुळत नाही. त्यामुळे सी.टी. सर्वे विभाग व नगररचना विभाग यांचा जॉईंट मॅंजरमेंट करा. त्यामुळे मोजणी करताना ज्या काही अडचणी निर्माण होतात, त्या होऊ नयेत अशी काळजी भविष्यात घ्यावी अशी विनंती आहे.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह, माझे सहकारी मित्र मा.प्रशांत शितोळे यांचे मी खरेतर अभिनंदन करतो. आपल्या शहरात अनेक दिवसांपासून अनधिकृत बांधकामाचा जटिल प्रश्न समोर आला आहे. त्यात जास्तीत जास्त सर्वसामान्य नागरीकांच्या घरांवर बुलडोजर फिरवण्याचे काम महापालिका न्यायालयाच्या माध्यमातून करते आहे. आत्ता पुणे महापालिकेची बातमी आहे, १५ दिवसांत ११६ बांधकामांवर हातोडा. मा.उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करणार. दि.३० जून २०१५ ला कोर्टात हे सगळे सादर करायचे आहे. मा.आयुक्त साहेब, आपल्याला या विषयासंदर्भात अतिशय महत्वाचे मुद्दे मा.प्रशांत शितोळे यांनी प्रभागाच्या माध्यमातून आपल्यासमोर आणायचा प्रयत्न केला आहे. गेली अनेक वर्षे ज्यावेळी राज्यात राष्ट्रवादीची सत्ता होती, त्यावेळी आमच्या सर्व नेते मंडळींनी महापौर, पक्षनेते, सर्व सभागृह यांनी वेगवेगळ्या पद्धतीने अनधिकृत बांधकामे कशी रेग्युलराईज करायची यासाठी प्रयत्न केला आहे. मा.अजित गव्हाणे यांनी सांगितले, या माध्यमातून केवळ अनधिकृत बांधकामाचा प्रश्न मांडून विधानसभा व लोकसभा निवडणूका जिंकायचा प्रयत्न झाला आहे ही वस्तुस्थिती आहे. माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे की, आमच्या आदरणीय अजितदादा पवार यांनी ज्यावेळी कुंटे समिती नेमली होती, त्यात आपण देखील सदस्य होता. आपण अनेक वेळा महापालिकेची बाजू व्यवस्थितरित्या मांडायचा प्रयत्न केला आहे. माझी आपल्याला खरोखरच विनंती आहे की, महापालिकेच्या माध्यमातून मागे हेच बोलत होतो. आजही हेच बोलतोय. उद्यादेखील हेच बोलणार आहे. सर्वसामान्यांच्या घरांना कसे कायद्याच्या चौकटीत बसवून नियमित करता येईल, कशी वाचवता येतील असा आमचा प्रयत्न राहिल. हीच विनंती आमची काल होती, आजही आहे व उद्याही राहील. आज शिवसेना, बीजेपी यांची सत्ता

असलीतरी त्यांनी हे सांगितले होते की, आम्ही चार दिवसांत हा प्रश्न मिटवू, पंधरा दिवसांत मिटवू, आम्हाला सत्तेवर येऊ द्या. आम्ही हे करु. हे आश्वासन निवडणूकांपुरते ठिक होते खरेतर आत्ता कृति करायची वेळ आलेली आहे. नगरविकास खाते मा.मुख्यमंत्र्याकडेच आहे. हे असताना आपले शिवसेना-भाजपाचे सदस्य असतील, आपल्या इथली कोणी नेतेमंडळी असतील तर त्यांना विश्वासात घेऊन हा प्रश्न मार्गी लावावा लागणार आहे. त्याला कारणसुद्धा तसेच आहे. १९९७ ला पिंपरी चिंचवडमध्ये आमचे गाव आले आमची बांधकामे २००९ला नियमित केली. २००८ पासून अनधिकृत ठरवताय ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. जर २००९ला आमचा विकास आराखडा मंजूर झाला होता व आमची घरे २००८ पासून अनधिकृत ठरताहेत. जर आमचा विकास आराखडा मंजूर नसेल, आम्ही महापालिकेत आहोत का नाही हे माहित नसेलतर आम्ही परमिशन कोणाकडे मागायची हा प्रश्न आमच्यासमोर होता. २००९ नंतर महापालिकेत असा विकास आराखडा केलातर त्यात अनेक चूका होत्या. कोण कुठे कोण कुठे. आजही आमची मागणी आहे की, सर्वसामान्य नागरीकाने अर्धा गुंठ्यापासून कमीत कमी ३ गुंठ्याच्या आसपास घर बांधले. त्यापुढे कोणी बिल्डर असेल तर त्याच्याशी आम्हाला मतलब नाही. एक गुंठ्यात घर बांधायचे आहे तर आम्हाला त्या सातबा-याची पूर्ण मोजणी आणायला तीन पट पैसे भरावे लागतात. ती प्रोसिजर व्हायला सहा महिने लागतात. सर्वसामान्य कामगार वर्ग त्याच्या आयुष्याची पुंजी कुठेतरी घरासाठी जमा करतो. जे काही ठेवलेले पैसे असतील तो अन्न,वस्त्र व निवारा या मुलभूत गरजांसाठी तो जिवाचे रान करतो का तर कुठेतरी त्याचे छोटेसे घरकुल असावे यासाठी प्रयत्न करतो. तो कुठेतरी जागा घेतो. कुठेतरी पाच सहा लाख जमा करुन घर बांधायचा प्रयत्न करतो. कुठे पतसंस्था, बँका यातून कर्ज घेऊन, व्याजाने पैसे घेऊन, पैसा गोळा करुन घर बांधायचा प्रयत्न करतो. या सर्वसामान्य माणसासाठी आम्ही विनंती करतो की, त्याच्यासाठी या नियमांत शिथिलता आणणे ही काळाची गरज आहे. आज कन्जस्टेड एरिया डिक्लरेशन केलातरी प्रॉब्लेम आहे. आमच्या भागात परिस्थिती अशी आहे की, त्याने एक गुंठ्यात घर बांधले असेल, १,००० स्क्वे. फूटात घर बांधले असेलतर आत्ता या नियमावलीत केलेतर एका गुंठ्यात साईड मार्जिन साडेतीन मीटर सोडायचे म्हणजे त्याला नक्की एखादा मिनार उभा करावा लागेल. त्याला पोलवर लटकत-लटकत बांधावे लागले. ३० बाय ३०, ४० बाय ४० मध्ये जागा सोडलीतर मला वाटत नाही त्याला स्वतःला बांधण्यासाठी जागा राहील. हा विषय अतिशय चांगल्या पद्धतीने आणलेला आहे. यात सजेशन,ऑबजेक्शन्स घेऊ शकता. यात आणखी काही बदल करु शकता. प्रभागांत किंवा बांधकाम परवानगी विभागात मी बांधकाम परवानगीसाठी अर्ज केलातर आम्हाला १५ दिवसांत परमिशन मला घरपोच आली पाहिजे. अशा माध्यमातून आपण काही केलेतर अनधिकृत बांधकामांचा प्रश्न शंभर टक्के मिटणार आहे. कितीही नियम केलेतरी अनधिकृत बांधकामे थांबणार नाहीत कारण प्रत्येकाला घरात रहायचे असते. घर बांधायचे असते. प्राधिकरणाची नियमावली काय होती.

सर्वसामान्यांना घर द्यायला, नागरीकांना घर न दिल्यामुळे तिथे बिल्डर लॉबिंग झाले बिल्डरला प्लॉट दिले गेले. सर्वसामान्य नागरीक प्लॉटपासून वंचित राहिला. आम्हाला या लोकांना वाचवायची गरज आहे. आपण १७८ अधिकारी नेमले आहेत. आपण पुढचे पाऊल टाकले आहे. सर्वसामान्य नागरीकांचे घर पाडलेतर आपण त्याला घर बांधून देतोय. याला आमचा विरोध नाही. पण सर्वसामान्य माणसाने एखाद्या शेतक-याकडून रितसर खरेदी करुन, मोबदला भरला असेल तर त्याचे घर पाडायला आपण डायरेक्टली जातोय. हा दूजाभाव करताना आपण शासनासमोर, कोर्टासमोरसुद्धा काही गोष्टी निदर्शनास आणून दिल्या गेल्या पाहिजेत यांचा सातबारा झाला आहे. यांनी स्टँम्पड्युटी भरलेली आहे. तरीही ते आजही टांगणीवर आहेत. जिथे-जिथे रोड वाईडींग होणार आहे, तिथे रस्त्यात जे बाधित होत आहेत ती घरे पाडायला आम्ही कधीही विरोध करणार नाही. पण जिथे सर्वसामान्य माणूस बेघर होणार आहे. माझे १,००० स्क्वे. फूटाचे घर रेग्युलर करण्यासाठी मला १००/१५० स्क्वे.फूट कट करावा लागणार आहे. परंतू माझी जागा कुठेतरी राहील, माझे घर कुठेतरी राहील अशा माध्यमातून नियम केलेत तर ते खूप गरजेचे आहे असे मला वाटते परवा विधानसभेत दिल्लीतील अनधिकृत घरे अधिकृत केली आहेत. आयुक्त साहेब, आपण जर या समितीत आहात तर तिथे तशी चर्चा करत नाही का की, उल्हासनगरच्या धर्तीवर बांधकामे कशी लिगल केलीत, सोलापूर पॅटर्न आहे तो कसा केलाय, दिल्लीतली बांधकामे कशी रेग्युलराईज केलीत, काय-काय नियमावली बनवली आहे, तो विषय चर्चेतून कोर्टासमोर आणणेदेखील गरजेचे आहे. आपण एकच काम करतोय, आपली ज्या दिवशी तारीख आहे, त्या तारखेच्या १०/१५ दिवस आधी पाच पन्नास बांधकामे पाडायची आणि कोर्टासमोर आपली सेफ बाजू मांडायची एवढेच आपले काम आहे. यातून काहीतरी आऊटपुट काढा. हे काढण्यासाठी काहीतरी प्रयत्न केला पाहिजे. हे थांबले नाहीतर आपण जवळपास ७० टक्के यंत्रणा तिथे लावणार आहोत. प्रत्येक वॉर्डातून ३/४ अधिकारी दिले आहेत. त्यांनी तेही काम करायचे व अनधिकृत बांधकामे सुद्धा पाडायची. अधिका-यांना ऑर्डर आल्या आहेत. मला वाटते, उद्यापासून या अधिका-यांची, नगरसेवकांची दररोज भांडणे मिटवावी लागणार आहेत. नाहीतर आमच्यावरदेखील काहीतरी केस दाखल होणार आहे. इथून पुढे असेच होणार आहे. मला सांगायचे आहे की,आम्ही सर्वसामान्य नागरीकाचे घर पाडू देणार नाही. कमर्शियल बघा. तुमच्यात हिंमत असेलतर करुन दाखवा. पिंपरी चिंचवडमध्ये जेवढे बिल्डर आहेत. त्यांना रितसर परमिशन दिली आहे ते बांधकाम व त्याव्यतिरिक्त त्यांनी केलेली बांधकामे हे एकदा चेक करा. नवीन आले आहेत त्यांना एकदा कामाला लावा. शंभर टक्के त्या बिल्डर लोकांनी १०० स्क्वे. फूटावर त्यांनी १०१ स्क्वे.फूट बांधले आहे. त्याठिकाणी कारवाई का करत नाही. कमर्शियल बांधले आहे. तिथे मला एक गाळा दिला आहे. माझा धंदा चालला आहे. तिथे शेड बांधली आहे. पण एखाद्या गोरगरीबाने घर बांधले तर लगेच कारवाई करता कारण आपल्याला माहित आहे, प्रशासनाला नागरीक घाबरतो. गरीब नागरीकांचे काय. त्याचा फोन

फक्त नगरसेवकांपर्यंत येतो. कोणी संत्रीमंत्री कोणी वरिष्ठ त्याच्या ओळखीचा नसतो. मी जाहिर आवाहन करतो, पिंपरी चिंचवड शहरातील जेवढ्या बिल्डींग्जला बिल्डींग परमिशन दिलीत, ते सगळे रेग्युलराईज करा. मी अनेक वेळा बोललो आहे. तिकजे आपण दूर्लक्ष करता व इथे बिनधास्त काहीतरी करायचे काम करतो. कारण घर कसे बांधले जाते. हे सर्वसामान्य नागरीकांना माहिती आहे. कशा पद्धतीने घर बांधतो हे कामगाराला माहित असते. काही लोकांचे आया-बहिणींचे दागदागिने गहाण टाकून किंवा विकून घर बांधायचे काम सर्वसामान्य माताभगिनींनी केलेले आहे. म्हणून मला सांगायचे आहे की, बीजेपीचे जे कोणी नगरसेवक असतील, मा.सुलभाताई तुम्हाला विनंती आहे की, आता तुमची सत्ता आहे. काल आमच्या नावाने खूप काही डंका पिटवला आहे. मोर्चे काढले आहेत. आता आम्हाला सुद्धा हेच करावे लागणार असे वाटते आहे. कारण आम्ही लोकांसाठी करणार आहोत. बरेच चार पाच वर्षे पुढे जायचे आहे. म्हणून आपण सर्वांनी एक विचाराने जो काही विषय चालला आहे त्या माध्यमातून विचार करावा अशी विनंती आहे.

रेडझोनचा विषय आहे. रेडझोनबद्दल मी अनेक वेळा बोललो आहे. अनेक वेळा सांगितले तरी रेड झोन असेल तरी नागरीकांना सुखसुविधा देण्याचे काम करा तिथे काही करु नका असे काही सांगितलेले नाही. रेड झोनच्या नावाखाली आमचा निधी पूर्ण झिरो करुन ठेवला आहे. तिथे लोक राहतात. मग आपण त्यांना ड्रेनेजची सुविधा देणार नाही का, पाणीपुरवठ्याची लाईन देणार नाही का. मी याआधीही अनेक वेळा बोललो आहे. ही सेवा आपण करावी अशी विनंती आहे. मा.प्रशांत शितोळे यांनी विषय आणला आहे. त्या विषयात डि.सी. रुलमध्ये रुल चेंज करायचे चालले आहे. महापालिका ही स्वायत्त संस्था आहे. इथे बसलेले सर्व सभासद या संस्थेचे पदाधिकारी आहेत. त्यांना विश्वासात घेऊन काही नियम करायचे असतील तर करा. बंद केबिनमध्ये काही निर्णय करायचा प्रयत्न असेल तर कटाक्षाने करु नका. ज्यांना त्यातील ज्ञान आहे त्यांनी त्यांच्या सूचना/हरकती घ्याव्यात. त्यांना इनव्हॉल्व्ह करुन नियमावली बनवा. मा.प्रशांत शितोळे यांनी जे ५/६ विषय मांडले होते. त्यात हे अंतर्भूत करुन एक ते पाच गुंठयांच्या जागेत जे नागरीक राहतात, त्यांना परमिशन कशी देता येईल. कुठेही न जाता आपल्या लेव्हलला त्यांना बिल्डींग परमिशन देता येईल असे पहावे. आमच्या भागात जी जुनी घरे आहेत. आम्हाला आठवत सुद्धा नाही. पूर्वीची वीस/तीस वर्षापूर्वीची घरे आहेत, त्यांची हाईट आणि आत्ता नवीन झालेले रस्ते त्यांची हाईट. त्या रस्त्यांच्या हाईटमुळे ही घरे जमिनीत खाली गेली आहेत. पत्राशेड असेल, जे काही असेल अशी अनेक घरे आहेत. त्या घरांचे फोटो आपण काढून घ्यावेत. किंवा करसंकलन विभागाकडून त्या घरांचे स्क्वे. फूट, लांबी-रुंदी, खालचे फाऊंडेशन वर घेऊन त्याप्रमाणे ही घरे जमिनीच्या वर घेऊन ही घरे पुन्हा बांधायची परवानगी देण्यात यावी. ही घरे जुनी आहेत. या लोकांना पावसाळ्यात त्रास होणार आहे. या घरांना नीट छप्पर नाही. या लोकांचे हाल आम्हालासुद्धा बघवत नाहीत. कार्यकारी अभियंता यांनी जाऊन

बघा. कौलारु घर असेल तर कौलाचे बांधा. स्लॅब असेलतर स्लॅबचे बांधा. त्यांच्या घरांत पाणी जाते. तो सुद्धा जटील प्रश्न झाला आहे. या माध्यमातून करावे. आम्ही म्हणत नाही त्यांना आजूबाजूला जमिनीतून वाढवावे त्यांना फक्त जमिनीतील फाऊंडेशन वर घ्यावे. त्यांना बिल्डींग परमिशन द्यावी असे या निमित्ताने सांगतो. पूर्वीसारखी गुंठेवारी आणावी. गुंठेवारीत पूर्वी काही बांधकामे रेग्युलराईज करायचा प्रयत्न केला. मा.प्रशांत शितोळे यांनी विषय आणला. पूर्वी यात कलेक्टर एन.ए. करत नव्हतो. खाजगी प्लॅन आणत होते व आपण त्यांना परमिशन देत होतो. गुंठेवारी न लावता वेगळे नाव देऊन वेगळा काही नियम करता आलातर या बांधकामांना व्यवस्थितरित्या संरक्षण देता येईल.तुमची यंत्रणा असेलतरी लोक सोप्पे काम करतात. पत्राशेड लावतात व लोक रहायला आले आहेत. त्यांना स्वतःच्या राहण्यासाठी पत्राशेड करतात. झोपडपट्टीत लोक पत्राशेडमध्ये राहतात, तिथे आपण काही तर नाही. आम्ही सांगतो, बांधकाम करु नका. पण शेवटी स्वतःच्या जागेत रहावे अशी लोकांची अपेक्षा असते. ती लवकरात लवकर कशी पूर्ण होईल व कोर्टाचा निकाल नागरीकांच्या बाजूने कसा लागेल याचा या माध्यमातून विचार करावा. आपण या समितीत एक प्रतिनिधी आहात म्हणून माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे की, हा विषय लवकरात लवकर मार्गी लावावा.

**मा.नारायण बहिरवाडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह, मा.प्रशांत शितोळे यांनी प्रभागाच्या माध्यमातून एक अतिशय चांगला विषय मांडायचा प्रयत्न केला आहे. शहरात अनधिकृत बांधकामांचा प्रश्न मोठा जटिल बनलेला आहे. सन्मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर जवळजवळ १,६०,००० बांधकामांवर टांगती तलवार आहे. सर्वांना वाटते, ही सर्वसामान्य नागरीकांची गोरगरीबांची घरे आहेत, ती वाचली पाहिजेत. ती तोडली गेली नाही पाहिजेत. ज्या परिस्थितीत लोकांनी जागा घेतल्या, घर घेतले ती सगळी परिस्थिती सन्मा. सदस्यांनी सविस्तर सांगितली आहे. पिंपरी चिंचवड शहरात १९६० सालानंतर ख-या अर्थाने औद्योगिकरणाला सुरुवात झाली. शहरात ४५०० कारखाने आहेत. या कारखान्यांत रोजीरोटीसाठी संपूर्ण राज्यातून नव्हे देशभरातून लोक इथे आलेले आहेत मी या नगरीत काम करत असताना स्वतःचे एक घर असावे असे वाटणे स्वाभाविक आहे. सर्वांना बिल्डरची घरे परवडतात असेही नाही. सामान्य कामगारांनी शहराच्या आजूबाजूला जे काही शेतकरी असतील त्यांनी काही प्लॉट पाडलेले असतील तर अशा जागा विकत घेतल्या आणि त्याच्यावर बांधकाम केले आहे. ही बांधकामे अनधिकृत का झाली. महापालिकेची परमिशन घेण्यासाठी लोक का आले नाहीत. ख-या अर्थाने हा विचार केला पाहिजे. मा.प्रशांत शितोळे यांनी हा विषय मांडण्याचा उद्देश्य हाच आहे की, ३ गुंठ्यांपर्यंत ज्या कामगारांनी जागा घेतल्या, त्यांनी परमिशन का घेतली नाही हा मूळ मुद्दा आहे. परमिशन घेणे इतके सोप्पे आहे का. सहजासहजी परमिशन मिळते का. डिसी रूल मध्ये जी काही नियमावली आपण बनवली आहे. ती सर्वसामान्य नागरीकांना फुलफ्लेज करुन परवानगी घेणे किती जिकीरीचे आहे हे सर्व

सभासदांनी सांगितले आहे. याठिकाणी गुंठा/दोन गुंठे जागेवर सात बारा काढणे, सीटी सर्वे उतारा काढणे, जागेची मोजणी करणे. यात मोजणी प्रक्रिया सर्वात किचकट काम आहे हे सर्वांनी सांगितले आहे. डिसी रूल यासाठी जबाबदार आहे असे मी म्हणणार नाही. परंतू ही प्रक्रिया, याचे नियम किचकट आहेत त्यामुळे परवानगी न घेता बांधकाम केले आहे. या लोकांनी जागेवर अतिक्रमण केलेले नाही. त्यांनी त्यांच्या कष्टाच्या पैशांतून, घामाच्या पैशांतून, दागदागिने विकून या जागा खरेदी केल्या आहेत. आज जागा घेतली व पुढील आठवड्यात घर बांधले असेही नाही. जागा घेऊन अनेक वर्षे ती जागा तशीच पडून राहिली आहे. जसे जसे पैसे येतील तसे तसे साठवत गेले. पैसे कमी पडले तर बँकेतून घे, व्याजाने घे. हे पैसे घेतल्यानंतर ख-या अर्थाने बांधकामाला सुरुवात केलेली आहे. ही प्रक्रिया सुटसुटीत असली असतीतर लोकांनी अनधिकृत बांधकाम केलेच नसते. हे कोणी नाकारत नाही. ही बांधकामे त्यांनी स्वतःच्या जागेवर केली आहेत. अनधिकृत आहे अतिक्रमण नाही. त्याची संख्या जवळजवळ १,६०,००० च्या वर आहे. कोणी मारुती वंजारी नावाचा माणूस हायकोर्टात गेला. हायकोर्टाने आदेश दिला. आणि त्याप्रमाणे आपण कारवाई करतोय. आमच्या सरकारने, सरकारमधील मंत्र्यांनी देखील ही बांधकामे वाचवण्यासाठी प्रयत्न केले. याबाबतीत विरोधकांनी फायदा घेऊन सत्ता देखील हस्तगत केली आणि सत्ता हस्तगत केल्यानंतर आता ६ महिने उलटून गेले आहेत. तरीसुद्धा अनधिकृत बांधकामासंदर्भात कोणताही निर्णय होत नाही. काँग्रेसचे कै.विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना २००२ साली गुंठेवारी कायदा आला. त्यात २००१ पर्यंत शहरात जेवढी अनधिकृत बांधकामे होती ती सगळी रेग्युलराईज झाली. विशेष नमूद करावेसे वाटते की, गुंठेवारी कायदा आला तो फक्त पिंपरी चिंचवडमध्ये आला होता. कारण त्या काळातील शहराचे नेते स्वर्गीय रामकृष्ण मोरे यांनी विलासराव देशमुख यांच्या पाठिमागे लागून कायदा करुन घेतला. पिंपरी चिंचवड शहरासाठी केलेला हा कायदा संपूर्ण राज्यासाठी लागू करावा लागला. असा कायदा करता येत असेलतर त्याचा निश्चितच फायदा अनधिकृत बांधकाम केलेल्यांना झाल्याशिवाय राहणार नाही. डिसी रूलमध्ये शासनाच्या गाईडलाईन्स आहेत. हा भाग असेलतर त्यात कुठेतरी बदल केला, शासनाचा निर्णय आणून दिला यासाठी नियमांमुळे जाचक अटींमुळे शहरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे होत होती. त्यात बदल घडवून आणला तर नागरीक आपल्याकडे निश्चितपणे अधिकृत परवानगी घेण्यासाठी येतील. याचसाठी आपण निश्चितपणे काहीतरी करणे अतिशय गरजेचे आहे असे मला याठिकाणी वाटते. डिसी रुलमध्ये बदल करणे हा यावर मार्ग आहे. गावठाणात एक गुंठ्याला एक एफएसआय देतो. अशा पद्धतीने केलेतर निश्चितपणे नक्की फायदा होईल. बरेचसे मुद्दे माझे सहकारी बोलले आहेत. निश्चितपणे यात कसा बदल करता येईल ते बघावे. नुसती विषयाला मंजूरी देऊन प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा लागणार आहे. तो मा.सुलभाताईंनी करावा. शासनाकडून मंजुरी घेऊन यावी. म्हणजे शहरातील बांधकामे रेग्युलराईज होतील.

सर्वसामान्य कामगार, नागरीक आपल्याला दुवा देतील. या विषयी अधिक न बोलता याठिकाणी थांबतो.

**मा.सुलभाताई ऊबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, खरेतर विषय काय कोण काय व्यथा मांडतेय. जुनी दुखणी उकरुन काढतेय मा.प्रशांत शितोळे यांनी चांगला विषय सभागृहासमोर आणला आहे. मी त्यांचे अभिनंदन करेन. या आधी सुद्धा २.५ एफएसआय देण्याचा प्रस्ताव मंजूर करुन शासनाकडे पाठविला आहे. तो मंजूर झाला तर आपले बरेचसे प्रश्न सुटणार आहेत. हे आपल्याला माहितीच आहे. हा विषय चर्चा न करता मंजूर झाला असता तरी काही फरक पडला नसता. परंतू काही वेळा शासनाचा निषेध केला गेला. काही वेळा नाव घेऊन बोलले गेले. आपण सर्वजण सगळ्या क्षणांचे साक्षिदार आहोत. जेव्हापासून शहरात अनधिकृत बांधकाम नावाची किड पाठिमागे लागली. संपूर्ण महाराष्ट्रात अनधिकृत बांधकामे झालेली असतातना पिंपरी चिंचवडमध्येच हा प्रश्न का निर्माण झाला हे प्रत्येकाला माहित आहे इथे जयश्री डांगे नसत्या, मारुती वंजारी नसता, पद्ममीनीराजे मोहिते पाटलांसारख्या नसते तर कदाचित आपल्याला या मोहिमेला सामोरे जावे लागले नसते. डॉ.श्रीकर परदेशी हे आयुक्त म्हणून इथे आल्यानंतर त्यांनी कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली. त्यांनी त्यांच्या खुर्चीला साजेसे काम केले आहे. परंतू त्यावेळी आम्ही मोर्च काढले नसते, आंदोलन केले नसते तर मा.दत्ता काका साने आपल्या वॉर्डातले एकही बांधकाम शिल्लक राहिले नसते हे आपल्यालाही माहिती आहे. म्हणजे आम्ही केले ते राजकारण, आणि तुम्ही करताय ते समाजकारण असे मुळीच नाही. त्यावेळी हे मा.श्रीरंग आप्पा बारणे यांनी काढले. कदाचित ते त्यामुळे खासदार झाले असतीलही. आमचे आमदार पडले आमचे खासदार पडले आणि तुमचे निवडून आले. आख्या महाराष्ट्रात कारवाई चालू नव्हती. तुमचे आमदार इथेच पडले नाहीत तर आख्या महाराष्ट्रात तुमचे आमदार पडले आहेत. शिवसेनेचा खासदार इथेच निवडून आला नाही तर आख्या महाराष्ट्रात निवडून आला आहे. ते कारण नाही. काहीतरी करायचे आणि कोणाचे काहीतरी कारण सांगून बोलायचे. आत्ता मा.दत्ता काका साने म्हणाले, आमची राष्ट्रवादी. मला धक्काच बसला. तुम्ही म्हणालात आमचे आमदार पडले. का पडले याचे तुम्ही आत्मपरिक्षण केले असते तर राष्ट्रवादीचा आमदार पडलाच नसता. आपण बोलतोय काय, करतोय काय. कुठुन कुठे जातोय. एकमेकांना ऐकून घ्यायला आपण सगळे सक्षम आहेत. मा.प्रशांत शितोळे बोलले. तिथपर्यंत ठिक आहे. ते राष्ट्रवादीची भूमिका ठामपणे मांडू शकतात ते आजही राष्ट्रवादीच्या डायसवर आहेत. आम्ही मान्य करु. परंतू ज्या तांत्रिक,लिगल अडचणी आहेत. तुम्हाला सगळ्यांना माहित आहेत. ज्यावेळी महाराष्ट्र सरकारमध्ये मुख्यमंत्री पृथ्वीराजजी चव्हाण हे होते. डॉ.श्रीकर परदेशी यांच्यासारखी त्यांची भूमिका होती. ते कायद्याला बांधून होते. दादा जरी आपली भूमिका मांडत असले तरी त्यांचा आवाज तिथपर्यंत जात नव्हता. तो आवाज जावा म्हणून आम्ही तुमच्याबरोबर मुंबईला, नागपूरला सारखे डोके आपटत होतो.

नगरसेवकांनी अनधिकृत बांधकामासंदर्भात राजिनामा द्यायचा विषय मांडला होता. त्यावेळी तत्कालिन महापौर मोहिनीताई लांडे यांच्या हातात सगळ्यांत पहिले राजिनामे शिवसेनेच्या नगरसेवकांचे होते. माझी तुम्हाला कृपा करुन विनंती आहे की, या प्रश्नात कधीही राजकारण आणू नका. मघाशी मा.अजित गव्हाणे यांनी सांगितले की, तुम्ही पीसीएमटीडीएकडून लोकांना घरे दिली नाहीत. गोरगरीबांना घरे मिळाली असती तर आज अनधिकृत बांधकामे झाली नसती. पण तुम्ही सांगा, इतकी वर्षे प्राधिकरणावर कोणाचे राज्य होते. का गोरगरीबांना घरे दिली गेली नाहीत. त्याची खंत आत्ता वाटतेय. याला काहीच अर्थ नाही. गेली १२ वर्षे पीसीएमटीडीएला पब्लिक बॉडी नाही, लोकप्रतिनिधी नाहीत. एकही अधिकारी तिथे नाही. त्यांना आपण काही करु शकलो नाही. आज आयुक्त साहेबांची मेहेरबानी आहे. हायकोर्टाचे एवढे सगळे सक्त आदेश असताना एक माणूस म्हणून त्यांच्याकडून कायद्याची अंमलबजावणी होते आहे व नगरसेवक सुद्धा शांत आहेत. आयुक्त साहेबांनी दोन्ही भूमिका चांगल्या सांभाळल्या आहेत. मा.आयुक्त साहेब, हे सांगितले गेले की, बिल्डर लोकांची अनधिकृत बांधकामे, कोणी कोणाला थांबवलेले नाही. बिल्डरलॉबी कोणाची आहे, कोण कोणाचे बगलबच्चे आहेत, कोण कोणाचे पोशिंदे आहेत हे सगळ्यांना माहित असते. पण आजही अनधिकृत बांधकामे मोठ्या प्रमाणावर चालू आहेत. हे मी तुम्हाला वारंवार सांगत्येय. जरी सरकारकडून आम्हाला खात्री नाहीतर मला पूर्ण विश्वास आहे. सगळे नाहीत पण काही प्रमाणात बांधकामे अधिकृत होणार आहेत. कुंटे समिती ही आधीच्या सरकारने बनवलेली समिती आहे. कोणत्याही पक्षाचे म्हणणे गोरगरीबांची घरे पाडा असे असूच शकत नाही. परंतू ज्या काही त्रुटी, अडचणी निर्माण झाल्या. आपल्याकडे प्राधिकरण आहे,एमआयडीसी आहे, महापालिका आहे. सगळ्यांचे नियम वेगवेगळे आहेत. २०१२ पर्यंतची बांधकामे नियमित होतील. तुमचा करंट डाटा पूर्ण नियमित होणार नाही. त्याची जबाबदारी कोणी स्विकारायची. या सभागृहाने स्विकारायची का आयुक्त म्हणून तुम्ही का सत्ताधारी म्हणवणा-यांनी स्विकारायची. कोणीह म्हणणआर नाही आत्ताही बांधकामे चालू आहेत. ती चालू राहू द्या मुंबई इथे २ बिल्डींगमध्ये आग लागली होती तेव्हा फायर ब्रिगेडची गाडी आत जायला जागा नव्हती. त्यावेळी स्थानिक प्रशासनावर टिका झाली. राज्य सरकारवर टिका झाली. अशावेळी तुम्हाला जर दुय्यम भूमिकेतून वागावे लागते आहे तर इथून पुढील अनधिकृत बांधकामे तरी थांबवावीत, जोपर्यंत प्रश्न सुटत नाही. नाहीतर ६६,००० अनधिकृत बांधकामे आहेत असे ॲफेडेव्हिटमध्ये तुम्ही कोर्टाला लिहून दिले आहे तुम्ही तुमचे मरण स्वतःहून ओढून घेतले आहे सगळ्यांनी एकत्र आले पाहिजे. भले सरकार आमचे आहे. लोकांची घरे वाचणार आहेत. तरी आजही आम्ही रस्त्यावर असणार आहोत. कारण आमची बांधिलकी पिंपरी चिंचवड शहराशी पहिली आहे कोणी कशावर निवडणूक लढल्या, कोण कशामुळे पडला, कोण कोणाच्या पक्षातून पडला हे सांगायची ही जागा नाही. प्रत्येकाने आपापले राजकारण केले आहे. या माध्यमातून या प्रश्नाला पुन्हा तोंड फुटले आहे तर माझी आपल्याला विनंती आहे

की, कोणत्याही परिस्थितीत इथून पुढे अनधिकृत बांधकामे थांबवली पाहिजेत कुंटे समितीचा अहवाल फुटलेला नाही. राज्य सरकारने ॲफिडेव्हीट दिले आहे. कोर्टाने तुम्हाला फटकारले आहे, बाकी जी बांधकामे अधिकृत होऊ शकतात, त्यांना हात न लावता बाकी बांधकामांच्या अडचणी लोकांना समजून सांगितल्या पाहिजेत. नागरीक स्वतःची चूक करतात ते कधीही मान्य करणार नाहीत. ते म्हणतील आम्ही नगरसेवकांकडे गेलो होतो. त्यांना विचारले बांधकाम करु का. ते म्हणाले बघ बाबा कर किंवा करु नको. उद्या नगरसेवक रस्त्यावर उतरले नाहीतर त्याला आपले पद वाचवायची भिती वाटते. त्यावेळी महापालिका असेल, पीसीएनटीडीए असेल, अधिका-यांनी सुद्धा अतिक्रमण विभाग आहे त्यांनीसुद्धा चिरीमिरी घेतलेली आहे. लोकांनी इतके निष्काळजीपणे घरे बांधलीत ती फुकट नाहीत. त्यांना बांधकामाचा खर्च वेगळा आणि लाच दिल्याचा खर्च वेगळा झालेला आहे. तुमची भूमिका बरोबर आहे की सरकारला तोंड द्यायचे आहे आणि कोर्टाला तोंड द्यायचे आहे. आयुक्त साहेब, तुम्ही इथून बदलून गेलात तरी पुढे एखादी जयश्री डांगे निर्माण झालीतर तुमच्यावर सुद्धा आक्षेप घेऊ शकते गव्हर्नमेंटचा जी.आर आहे. राज्य सरकारने सांगितले आहे की, त्या व्यक्तीच्या काळात अनधिकृत बांधकामे होतील, त्यावेळी जो क्षेत्रिय अधिकारी, मुख्य अधिकारी असेल त्यावर, त्या पोलिस स्टेशनच्या मुख्य फौजदारावरदेखील गुन्हा दाखल होईल. सगळे पोलिस सस्पेण्ड झाले याचे कारण काय सांगितले तर तुमच्या हद्दीत बेकायदेशीर धंदा चालला होता. तुमच्या हद्दीत बेकायदेशीर बांधकामे झाली मग कारवाई का होऊ नये. आम्हाला मागील सगळे प्रश्न सोडवू द्यात. आमच्या नगरसेवकांना मत मागायला जायला त्यावेळी सगळे अनधिकृत बांधकामवाले आडवे पडतील. मग एक प्रश्न सोडवण्यासाठी दुसरा प्रश्न निर्माण करणार आहात का. गप्प बसून आमच्या समस्या वाढणार आहेत. बेस्ट सिटी झाली आहे. स्मार्ट सिटी बनवायची आहे. मग आपण आपलं रेटींग कसं घालवायचं ते तुम्ही सांगा. आपण चूक करतोय. सत्य तपासले पाहिजे. तुम्हाला स्वतःला दोष दिला नव्हता. आम्ही सगळे मग मा.दत्ता साने असतील, मा.आझमभाई पानसरे असतील आम्ही सगळे एका डायसवर भांडत होतो. पण राजकारण केले नाही. आंदोलन, मोर्चे केले म्हणजे आम्ही ते वर्षानुवर्षे करत राहिलो आहोत तो आमचा पिंड आहे. परंतू निवडणूकांसाठी आम्ही केलेले नाही. त्याचा कोणताही विषय निवडणूकांसाठी तुम्ही तुमच्या मनाने जोडताय. त्याचे काहीतरी कारण द्यायला पाहिजे म्हणून तुम्ही हे कारण पुढे करताय मा.महापौर साहेब, माझी विनंती आहे, हा विषय एकदा सभागृहातून गेला की, तिथेच ठेऊ नका. या विषयासहीत ज्या काही दुरुस्त्या असतील, जी काही एक गुंठा, दोन गुंठा, अर्धा गुंठा घेऊन घरे बांधली आहेत. ती वाचवण्यासाठी प्रयत्न झाला पाहिजे. कमर्शियल ॲक्टीव्हीटी वाचवायची गरज नाही. भोसरी इथे खोटी गुंठेवारी झाली आहे. सातबारा खोटा बनवला आहे. नाल्यात बिल्डींगी झाल्या आहेत. हे घडते आहे. लोक जेव्हा फ्लॅट घेतात तेव्हा त्यांना माहित नाही हे बांधकाम अनधिकृत आहे. कारण बँका कर्ज देतात. ती माणसे घरांत रहायला जातात. जेव्हा मिळकत

कराची पावती येते व त्यावर लिहिलेले असते की हे अनधिकृत घर आहे त्यावेळी या लोकांना कळते आपण अनधिकृत घरात राहत आहोत. आम्ही त्यांना सांगतो, बिल्डींग अनधिकृत आहे. यात लोक दोषी आहेत का. अनेक वेळा पत्रव्यवहार करुन सुद्धा त्या बिल्डरवर कारवाई होत नाही, झालेली नाही. मग फ्लॅटधारक अनधिकृत आहेत का. २६ फ्लॅटधारक गेले होते. त्यांच्या भविष्याची माती झाली असती. अशा चूका करत करत मग या चूका वाढत गेल्या आहेत. मग आम्ही एकमेकांच्या पक्षाला दोष देत बसायचे, भांडत बसायचे. आपण सगळे या सगळ्याला ईक्वल जबाबदार आहोत. नागरीक सुद्धा जबाबदार आहेत. एवढे शासन सांगत्येय. तरीसुद्धा लोक रोज विचारतात, बांधकाम बांधू का. हा बांधतोय. आम्ही नाही म्हणायचे म्हणजे आमचे मत गेले. दुसरा एखादा कोरा करकरीत कार्यकर्ता येतो. आणि बिनधास्त म्हणतो, बांधा. त्याचे काहीही नसताना ब्रँडींग चालू होते. तुमचे सगळे बीट निरीक्षक नेमले होते. तु कुठे गेलेत. काय कारवाई करत आहेत. प्रचंड प्रमाणात अनधिकृत बांधकामे चालू आहेत. याची पहिल्यांदा दखल घ्या. कोणाला सुद्धा नवीन प्रश्न वाढू देऊ नका. राज्य सरकारचे याबाबतीत काय स्टेटस आहे, कुंटे समितीचा काय लेखाजोखा आला त्याच्या संदर्भात नगरसेवकांशी चर्चा केली पाहिजे. महापालिका असो, पीसीएनटीडीए असो कोणीही फक्त दाखवायला कारवाई करत्येय. आम्हीही तेवढेच महत्वाचे आहोत, नागरीक तेवढेच महत्वाचे आहेत. सरकार सुद्धा तेवढेच महत्वाचे आहे. कोर्ट, कायदा सुद्धा तेवढाच महत्वाचा आहे. तुम्ही तुमची भूमिका वठवताय. इथून पुढे तुमचे सहकार्य लागणार आहे. आम्हाला कोणाचे बोलणे ऐकून घ्यायचे नाही. माझी तुम्हाला विनंती आहे की, आपण येणा-या काळात मागील बांधकामे अधिकृत कशी होतील तो प्रयत्न करत असताना अनधिकृत बांधकामे होणार नाहीत याकडे सुद्धा जणिवपूर्वक लक्ष दिले पाहिजे.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, वास्तविक पाहता या विषयावर आपण कितीही चर्चा केलीतरी हा प्रश्न चर्चेने शंभर टक्के सुटणार नाही. मला एवढेच सांगायचे आहे की, मा.सुलभाताईंना एवढा राग कशाचा आला हेच कळाले नाही. त्यांनी अनेक वेळी भरभरून तोंडसुख घेतले आहे हे त्या विसरलेल्या दिसतात. या सभागृहात विरोधात बोलणे ठिक आहे. सत्तेत सरकार तुमचे आहे. शंभर दिवसांची त्यांनी घोषणा केली होती. त्यातील २१० दिवस झाले आहेत. अजूनही काही झालेले नाही. ही आठवण करण्यासाठी आम्ही पोटतिडकीने प्रश्न मांडलेला आहे. त्यामुळे तुम्ही इतके दिवस आमच्याबरोबर होता. आता आम्ही तुमच्या बरोबर आहोत. हा प्रश्न सोडवू अशी तुम्ही घोषणा केली होती. तुम्ही केलेल्या घोषणांची पूर्तता करा. एवढीच आठवण करुन देण्यासाठी आम्ही इथे उभे राहिलेलो आहोत. मा.प्रशांत शितोळे यांनी विषय मांडला आहे. इथून मागेसुद्धा असे विषय मा.सभागृहाने शासनाकडे पाठवलेले आहेत. आणि त्यात काही होत नाही. मा.आयुक्त साहेब, मला दोनच गोष्टी सांगायच्या आहेत. हा विषय मा.दत्ता साने यांच्या रेडझोनचा विषय आहे. इथे कुठल्याही सुविधा देत नाहीत. नियमाप्रमाणे सुविधा देत नाही, तिथे मात्र कर वसूल करतो.

टॅक्स वसूल करतो. ऍमिनिटीज देत नाहीत मग कर कशासाठी वसूल करतो. असा टेक्निकल प्रश्न होऊ शकतो. मिनिमम ऍमिनिटीज पाणी असेल, ड्रेनेज असेल ते तरी द्यायला पाहिजेत. तूर्त हा विषय मंजूर करत असताना यात काहींचे म्हणणे हेच आहे, एन.ए. परमिशन नसावी, अर्धा गुंठा/एक गुंठ्याला परमिशन द्यावी. सर्वांचे दुखणे हेच आहे की,एका बाजूला लोकांनी अतिक्रमण केले. ही घरे नदीपात्रात बांधली. झोपडपट्टी वसवली. अशा लोकांना केंद्र शासन, राज्य शासन घर देते. पण ज्या गोरगरीबांनी एक गुंठा, अर्धा गुंठा घेऊन घर बांधले आहे. त्या लोकांना आपण बेघर करतो. हाच प्रश्न कोर्टाला देखील का कधी कळाला नाही. हे लोक काय पाकिस्तानातून आले आहेत. मग अशा लोकांच्या घरांवर बुलडोझर फिरवला जातो ही खेदाची बाब आहे. दुसरीकडे तुम्हाला कोर्टाचे आदेश पाळावे लागतात माझी सभागृहाच्या वतीने विनंती आहे की, हा विषय मंजूर करत असताना हा विषय लवकरात लवकर सोडवावा. शेवटी सजेशन/ऑबजेक्शन येणार. तुम्हाला हा पण अधिकार आहे. आम्ही हे पण लिहून टाकतो की, मा.आयुक्तांना अधिकार आहे. दुरुस्ती करण्यासाठी संत तुकाराम नगरमध्ये म्हाडाची घरे आहेत. ती अतिशय नित्कृष्ट दर्जाची आहेत. पंचवीस पंचवीस पन्नास घरांची एकत्र चाळ आहे. त्याला फ्रंट मार्जिन व बॅक मार्जिन आहे. ४० घरे एकत्र आहेत. अशा वेळेला ते म्हाडाकडून दुरुस्तीसाठी परमिशन आणतात. दुरुस्तीसाठी आपल्याकडे नियमांत बसत नाही. त्यामुळे देता येत नाही. कुंटे समितीवर जेव्हा शेवटचा हात फिरवला जाईल. तेव्हा त्यात दुरुस्तीच्या अनुषंगाने आत्ता मा.दत्ता साने यांनी सांगितल्याप्रमाणे, जे उदाहरण दिले आहे. संत तुकाराम नगरमध्ये असेच झाले आहे. पूर्वी तिथे फक्त डोंगर होता. अनलेव्हल होते. गेले २० वर्षांत रस्त्यावर लेअर टाकत टाकत झाले आहे काय, रस्ताची लेव्हल वर आली आहे. घरांचा ऊंबरा खाली गेला आहे. घरांत पाणी जाते. अशा परिस्थितीत किमान हाईट निश्चित उचलावी लागणार आहे. अशी घरे आहेत. त्यांच्याकडे ग्रामपंचायतीपासून घरे आहेत. त्यावेळी पक्के रस्ते नव्हते. अशा घरांना दुरुस्ती करण्याची मुभा असावी. डिपार्टमेंट करते. आपण जेई घेतले, कार्यकारी अभियंता घेतलेत, अशा घरांना दुरुस्तीची परवानगी कशी देता येईल हे सुद्धा आपले अधिकारी मग ते सिटी इंजिनिअर असतील याठिकाणी आवश्यकता आहे. पत्रा गळतोय. स्लॅब गळतोय. अशा परिस्थितीत त्यांना परवानगी देता आली पाहिजे. या अनुषंगाने आपण मिटींग घ्यावी. दुसरे महत्वाचे सांगायचे आहे की, बिल्डींग परमिशनमध्ये तुमचे काय प्लॅन आहेत मला माहित नाही. कोर्टाने रेग्युलराईज केले नाही. शासनाने अजून नियम काढला नाही. दुसऱ्या बाजूला एवढे लोक भरा व ही घरे ताबडतोब कशी पाडता येतील ते पहा असे कोर्टाचे म्हणणे आहे. त्याअनुशंगाने आपण जेईंची भरती, डेप्युटींची भरती करतोय. बीट निरीक्षक इ. सगळ्या प्रक्रिया पूर्ण केल्या आहेत. असे करत असताना बिल्डींग परमिशनमध्ये त्यांच्या कामाची व्याप्ती डिव्हाईड व्हावी असा तुमचा उद्देश्य दिसतोय. परंतू पुण्यात असे डिसेंट्रलायझेशन केले होते तेव्हा त्यांची परिस्थिती वाईट झाली. त्यांना पुन्हा सेंट्रलाईजेशन

करावे लागले. वर्क डिस्ट्रीब्युशन करत असताना बारकाईने बघा. साधारण डिसेंट्रलाईजेशन केलेतर ते सोप्पे असणार आहे. सरसकट कमी केलेतर काय होते. ॲमिनिटी स्पेस व ओपन स्पेसमध्ये एक एकरापुढे गेलेतर म्हाडा, २ एकरापुढे गेलोतर एव्हायर्नमेंट असे जटील प्रश्न आहे. सगळ्यात मोठा प्रश्न इंटरप्रिटेशनचा असतो. एकाने एक करायचे, मग दुस-याने दुसरे करायचे. स्ट्रिमलाईंड कामे चालतात हे खराब होऊ नये. पठाण साहेब, निकम साहेब अनुभवी अधिकारी आहेत. तुम्ही त्यांच्याबरोबर मिटींग घेऊन कसे असावे, किती हद्दीपर्यंत असावे, विस्कळीतपणा येऊ नये याकडे आपण लक्ष दिले पाहिजे ही विनंती आहे. यात दुरुस्तीची उपसूचना असणार आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, यात कितीजरी चर्चा केलीतरी चर्चेतून मार्ग निघणार नाही. हा विषय उपसूचनेसहीत मंजूर करावा अशी विनंती करतो. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार शहरातील अनधिकृत बांधकामांचा प्रश्न पाहता मनपा प्रशासनामध्ये बांधकाम परवानगी नियमावलीमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. त्यानुसार विषय क्र. १३ व १४ मंजूरी देणेत आली असून सदर विषयामध्ये घरदुरुस्ती करणेचे अनुषंगाने जेवढे क्षेत्रफळाचे बांधकाम केलेले आहे तेवढया क्षेत्रापुरते भिंत दुरुस्ती करणे, तोडून नवीन बांधणे, छप्पर दुरुस्ती करणे, धोकेदायक कॉंक्रीट स्लॅब असलेस नुतनीकरण करणे, पाया (Plinth) उचलणे,आदी दुरुस्ती करणेचे नियमांमध्ये तबदील करावा तसेच २०० स्क्वेअर मीटर पर्यंतच्या रहिवासी भूखंडासाठी N.A. (नॉन ॲग्रीकल्चर) दाखल्याची अट रद्द करावी व याबाबत म.प्रा.न.र.अ.१९६६ चे कलम ३७ नुसार पुढील कार्यवाहीसाठीचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना देणेस मान्यता देणेत येत आहे. तरी सदरचा ज्वलंत प्रश्न पाहता प्रस्ताव कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करावी.

**मा.शत्रुघ्न काटे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ७१० विषय क्रमांक - १३

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.प्रशासन अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय यांचे पत्र क्र.कक्षे/कावि/६७/२०१५ दि.०८/०६/२०१५

२) मा.प्रशांत शितोळे व मा.रोहित आप्पा काटे यांचा प्रस्ताव.

३) मा.क प्रभाग समितीकडील ठ.क्र.१२४ दि.०३/०६/२०१५

पिंपरी चिंचवड शहरामध्ये अनाधिकृत बांधकामाचा प्रश्न अतिशय जटील झाला व त्यामुळे आज अनेक सर्वसामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. वास्तविक पाहता औद्योगिक नगरीमध्ये समाविष्ठ असणा-या विविध गावांमध्ये १०० स्क्वेअर फुटांपासून ते

३००० स्क्वेअर फुटांपर्यंत छोटे भूखंड करुन त्याची खरेदी विक्री झाली. महानगरपालिका बांधकाम नियंत्रण नियमावली मध्ये छोटया बांधकामांकरिता परवानगी प्रक्रिया अतिशय किचकट असल्याने छोटे भूखंडधारक विशेषता २०० स्क्वेअर मीटरपर्यंतचे भूखंड मालक महानगरपालिकेकडे परवानगीसाठी आलेच नाहीत, त्यामुळे शहरातील असंख्य छोटया भूखंडधारकांनी किचकट वेळखाऊ बांधकाम परवानगी प्रक्रिया असल्याने परवानगीविना बांधकामे केली व त्याच अनाधिकृत बांधकामाचे स्वरुप आज शहरात कठीण स्वरुपात दिसत आहे. याकरिता शहरातील छोटया भूखंडधारकांना सोप्या पध्दतीने बांधकाम परवानगी महानगरपालिकेने देणे आवश्यक आहे. यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये काही प्रमाणात सुधारणा व बदल होणे गरजेचे आहे. यासाठी २०० स्क्वेअर मीटर पर्यंतच्या छोटया आकाराच्या भूखंडासाठी खालीलप्रमाणे बदल व्हावेत व MRTP च्या कलम १९६६ अन्वये विकास नियंत्रण नियमावलीमध्ये - १) शहरात २०० स्क्वेअर मीटरच्या भूखंडापर्यंतची मोजणी महानगरपालिका ठरवेल इतकी माफक फी आकारुन महानगरपालिकेच्या नगररचना व बांधकाम परवानगी विभाग यांचेमार्फत संयुक्तरित्या केली जाईल व तदनंतर मा.जिल्हाधिकारी व मा.नगर भू-मापन अधिकारी यांना कळविणेत येईल. २) २०० स्क्वेअर मीटरपर्यंतचे जागेचे क्षेत्रफळास दाटवस्ती (Congested Area) चे बांधकाम परवानगी नियम लागू असावेत. ३) Congested Area मधील २०० स्क्वेअर मीटर पर्यंतचे क्षेत्रफळास कमाल २.०० चटई निर्देशांक लागू राहिल. ४) Congested Area मधील पार्कींग नियमावलीत बदल करणे. ५) Congested Area मध्ये Shifted Boundary शिथील करणे. याप्रमाणे बदल होणेकामी मा. शासन मान्यतेस पाठविणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार शहरातील अनधिकृत बांधकामांचा प्रश्न पाहता मनपा प्रशासनामध्ये बांधकाम परवानगी नियमावलीमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. त्यानुसार विषय क्र. १३ व १४ मंजूरी देणेत आली असून सदर विषयामध्ये घरदुरुस्ती करणेचे अनुषंगाने जेवढे क्षेत्रफळाचे बांधकाम केलेले आहे तेवढया क्षेत्रापुरते भिंत दुरुस्ती करणे, तोडून नवीन बांधणे, छप्पर दुरुस्ती करणे, धोकेदायक कॉंक्रीट स्लॅब असलेस नुतनीकरण करणे, पाया (Plinth) उचलणे,आदी दुरुस्ती करणेचे नियमांमध्ये तबदील करावा तसेच २०० स्क्वेअर मीटर पर्यंतच्या रहिवासी भूखंडासाठी N.A. (नॉन ॲग्रीकल्चर) दाखल्याची अट रद्द करावी व याबाबत म.प्रा.न.र.अ.१९६६ चे कलम ३७ नुसार पुढील कार्यवाहीसाठीचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना देणेस मान्यता देणेत येत आहे. तरी सदरचा ज्वलंत प्रश्न पाहता प्रस्ताव कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करावी.

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७११ विषय क्रमांक - १४
दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.प्रशासन अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय यांचे पत्र
क्र.कक्षे/कावि/६७/२०१५ दि.०८/०६/२०१५
२) मा.प्रशांत शितोळे व मा.रोहित आप्पा काटे यांचा प्रस्ताव.
३) मा.क प्रभाग समितीकडील ठ.क्र.१२५ दि.०३/०६/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये शहरातील सर्व हद्दीमध्ये सर्वसामान्य नागरिकांच्या छोटया घरांची समस्या जटील झाली आहे. कामगार नगरीमध्ये लहान घरांचे भूखंड घेऊन लहान आकारांच्या घरांची संख्या मोठया प्रमाणात आहे व गेल्या काही वर्षामध्ये या लहान आकाराच्या भूधारकांनी महानगरपालिकेची बांधकाम परवानगी प्रक्रिया किचकट व तुलनात्मकदृष्टया लहान घरांना अधिक खर्चीक असल्याने या लहान आकाराच्या स्वमालकीच्या भूखंडावर अनाधिकृत बांधकामांची संख्या मोठया प्रमाणात झाली आहे. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील छोटया आकाराच्या स्वमालकीच्या दोन हजार चौरस (२००० चौ.फुट) फुटांपर्यंत क्षेत्रफळाच्या भूखंडाकरिता काही प्रमाणातील अधिकचा चटई निर्देशांक वापरणेकरिता व याकरिता महानगरपालिकेचे या क्षेत्रफळापर्यंतचे बांधकाम परवानगीचे किचकट नियमांमध्ये नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने काही प्रमाणात शिथीलता करणे आवश्यक असल्याने व याकरिता महानगरपालिकेने धोरणात्मक निर्णय घेऊन बांधकाम नियमावलीत बदल करणे व या नियमावलीस महाराष्ट्र शासनाचे नगरविकास खात्याकडून मान्यता घेणे क्रमप्राप्त आहे. यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत दोन हजार चौरस फुट (२००० चौ.फुट) क्षेत्रफळापर्यंतचा चटई निर्देशांक देणेबाबतच्या धोरणात्मक निर्णयास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७१२ विषय क्रमांक - १५
दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.प्रशासन अधिकारी फ क्षेत्रीय कार्यालय यांचे पत्र क्र.फक्षेका/सभा/कावि/५६/२०१५ दि.८/४/२०१५
२) मा.सुलभा उबाळे व मा.संगीता पवार यांचा दि. ८/४/२०१५ चा प्रस्ताव.
३) मा.फ प्रभाग समितीकडील ठ.क्र.६४ दि.८/४/२०१५
४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ६९६ दि.२०/५/२०१५

विषय - प्रभाग क्र. ११ यमुनानगर येथील प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुल येथे स्व.मिनाताई ठाकरे यांच्या पुतळयाऐवजी मा.शिवसेना प्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा प्रबोधनकार ठाकरे क्रीडा विकास संस्थेच्या खर्चाने उभारण्यास मान्यता मिळणेबाबत...

प्रभाग क्र. ११ यमुनानगर येथील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल येथे स्व. मिनाताई ठाकरे यांच्या पुतळयाऐवजी मा.शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा प्रबोधनकार ठाकरे विकास संस्थेच्या खर्चाने उभारणेस मान्यता देणेत येत आहे.
**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७१३ विषय क्रमांक - १६
दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था.सं.क/६/कावि/१४५/२०१५ दि.१५/६/२०१५
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ११७६९ दि.१६/०६/२०१५
३) मा.सभापती स्थायी समिती यांचेकडील दि१७/६/२०१५ चे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात दि.१ एप्रिल २०१३ पासून स्थानिक संस्था कर लागू झालेला आहे. सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता मा.राज्य शासनाने दि. ०३ जून २०१५ रोजीचे अधिसूचनेद्वारे नोंदणीकृत व बिगर

नोंदणीकृत व्यापा-यांकरीता व्याज व दंड माफीची स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५ घोषित केली आहे. अभय योजनेचा कालावधी दि.०३ जून २०१५ ते दि. ३१ जुलै २०१५ असा आहे.

**स्थानिक संस्था कर अभय योजनेचे स्वरुप व वैशिष्टे खालीलप्रमाणे आहेत.**

- बिगर नोंदणीकृत (व्यापा-याने किंवा व्यक्तीने अभय योजनेच्या विहीत मुदतीत त्याची स्वतःची नोंदणी केल्यास) तसेच नोंदणीकृत व्यापा-यांना किंवा व्यक्तींना लागू असेल
- स्थानिक संस्था कर लागू झाला त्या दिनांकापासून म्हणजे १ एप्रिल २०१३ पासून ते ३१ मार्च २०१५ पर्यंतच्या संपूर्ण कालावधीसाठी लागू असेल
- व्यापारी अथवा व्यक्तीने संबंधित महानगरपालिकेला
- देय असलेल्या स्थानिक संस्था कराच्या थकबाकीपैकी, मूळ कराची संपूर्ण रक्कम दि ३ जून २०१५ ते ३१ जुलै २०१५ या कालावधीत भरल्यास, त्यांना संपूर्ण व्याज व दंड माफ केले जाईल.
- अभय योजनेचा लाभ घेणेसाठी व्यापा-यास विहीत नमुन्यातील आवेदनपत्र प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता स्वतंत्रपणे सादर करणे आवश्यक आहे.
- आवेदन पत्रासोबत वैधानिक आदेशाची प्रत, कर भरणा केलेल्या चलनाची प्रत, विवरणपत्राची प्रत तसेच जर अपील दाखल केले असेल तर असे अपील विनाशर्त मागे घेतलेबाबतचे पुराव्याची प्रत सादर करणे आवश्यक आहे.
- अभय योजनेखाली कर भरावयाची शेवटची तारीख ३१ जुलै २०१५ असून या तारखेनंतर कर भरणा केल्यास/आवेदन पत्र सादर केल्यास या विशेष अभय योजनेअंतर्गत त्याचा विचार केला जाणार नाही.
- अभय योजनेचा परिणाम म्हणून कोणताही परतावा देता येणार नाही.
- योजनेची माहिती व्यापा-यांना देण्याकरीता व्यापारी व व्यावसायिक यांचेकरीता सदर योजना कालावधीत कार्यशाळेचे आयोजन करणेत येणार आहे.

मा.राज्य शासनाने निर्गत केलेली स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५ ची अधिसूचना व्यापा-यांचे माहितीकरीता महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. तसेच स्थानिक संस्था कर क्षेत्रीय कार्यालयाशी संपर्क साधून व्यापा-यांना योजनेची माहिती घेता येणार असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७१४ विषय क्रमांक - १७
दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र. स्था./बीआरटीएस/ ६३० /२०१५
दि. १६।०६।२०१५

बोपखेल हे गाव पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये येते परंतु त्या गावाच्या तिन्ही बाजुला संरक्षण खात्याची (Defence) ची जागा आहे व एका बाजुला मुळा नदी आहे. बोपखेल गावाची लोकसंख्या अंदाजे १७००० असुन गावातील गावक-यांना दापोडीकडे अथवा पिंपरीकडे येण्यासाठी जवळचा रस्ता हा सी.एम. ई. मधुन आहे व तो २.३० किमी लांबीचा आहे.

सी.एम.ई. ने सदरचा त्यांचे हद्दीतील रस्ता नागरिकांना ये-जा करणेसाठी दि. १३/०५/२०१५ पासुन बंद केला आहे त्यामुळे बोपखेल येथील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर आंदोलन केले. सदर आंदोलनास हिंसक वळण लागुन दगडफेक व लाठीमार इ. सारख्या घटना घडल्या. बोपखेल येथील नागरिकांना व विशेषतः शाळेतील मुलांना खुप लांबुन अंदाजे १२ कि.मी. लांबीचा वळसा घालुन (दिघी, कळस, शांतीनगर, खडकी मार्गे) यावे लागत आहे. नागरिकांना होणा-या त्रासातुन मार्ग काढणेसाठी दि. २८/०५/२०१५ दि. २९/०५/२०१५, दि. ०६/०६/२०१५ व दि. ०८/०६/२०१५ रोजी अशा चार बैठका जिल्हाधिकारी कार्यालय व शासकीय विश्रामगृह येथे झाल्या.

यामधील दि. २८/०५/२०१५ व दि. ०८/०६/२०१५ या बैठका शासकीय विश्रामगृह, पुणे येथे मा. संरक्षण मंत्री, केंद्र सरकार यांच्या उपस्थित झाल्या. सदर सर्व बैठकांना संरक्षण खात्याचे अधिकारी, सी.एम. ई. चे अधिकारी, खडकी कॅन्टोमेन्ट बोर्ड (KCB) चे अधिकारी, DEO (Defence Estate Office) चे अधिकारी, Ammunition Depot चे अधिकारी व जलसंपदा विभागाचे अधिकारी तसेच स्थानिक मा. खासदार, मा. आमदार, मा. नगरसेवक व लोक प्रतिनिधी उपस्थित होते. सदरच्या बैठकीत खालीलप्रमाणे अंतिम निर्णय झालेला आहे.

सी.एम.ई ने जो तात्पुरता पुल बांधला आहे, त्याच्या खडकी बाजुकडुन गोला बारुद कारखान्याच्या डेपोच्या (Ammunition Factory Depot) मुख्य प्रवेशद्वारापर्यंत तात्पुरत्या स्वरुपाचा ४०० मी लांबीचा व ७ मी रुंदीचा रस्ता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने तीन आठवडयात तातडीने बांधावा.

विषयांकित काम निविदा काढुन करणेस बराच कालावधी लागणार असल्याने बी.आर.टी.एस. विभागातील चालु असलेल्या कामाच्या बचतीमधुन करुन घेणे शक्य आहे

बोपखेल गावापासुन खडकी गावापर्यंत जाणारा रस्ता हा मनपा हद्दीबाहेरील आहे. विषयांकित काम अत्यंत तातडीने करावयाचे असल्याने सदर काम करणेकामी मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ८९ अन्वये मनपास हद्दीबाहेर खर्च करणेबाबत तरतुद आहे. त्याद्वारे सदरचे काम करणे शक्य आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता बी.आर.टी.एस. विभागातील चालु असलेल्या मे. कृष्णाई इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. (निविदा क्र.१०/०८-२०१४/२०१५) यांचे चालु असलेल्या कामातुन सी.एम.ई ने जो तात्पुरता पुल बांधला आहे, त्याच्या खडकी बाजुकडुन गोला बारुद कारखान्याच्या डेपोच्या (Ammunition Factory Depot) मुख्य प्रवेशद्वारापर्यंत तात्पुरत्या स्वरुपाचा ४०० मी लांबीचा व ७ मी रुंदीचा रस्ता करणेसाठी अंदाजे र.रु. १,२०,००,०००/- इतका खर्च येणार आहे.

सदर कामाचा अपेक्षित खर्च र.रू. १,२०,००,०००/- (अक्षरी र.रू. एक कोटी वीस लाख फक्त) चे खर्चास व मनपा हद्दीबाहेर काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७१५ विषय क्रमांक - १८

दिनांक - २०/६/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. शिक्षण/

साशिअ/९६/२०१५ दि.१६/०६/२०१५

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकास शाळेच्या पटावर नोंदविले जाणे, नियमित शाळेत येणे आणि त्याला दर्जेदार शिक्षण मिळणे याबाबतचा हक्क बालकांना प्राप्त झाला आहे. असे असले तरी विविध सर्वेक्षणाच्या निष्कर्षानुसार अजूनही लाखो विदयार्थी शालाबाहय आहेत. त्यामुळे या कायदयाची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

कधीच शाळेत न गेलेले, मध्येच शाळा सोडलेले किंवा महिनोन् महिने शाळेत अनुपस्थित असणारी बालके म्हणजे शालाबाहय बालके होय. राज्यातील अशा प्रत्येक

शालाबाहय बालकास पटावर नोंदविले जाणे, नियमित शाळेत आणणे आणि दर्जेदार शिक्षण देणे गरजेचे आहे.

त्याचाच एक भाग म्हणून अशा सर्व ६ ते १४ वयोगटातील शालाबाहय बालकांचे व्यापक सर्वेक्षण दि.४ जुलै २०१५ रोजी सकाळी ७.०० ते सायं. ७.०० वा. पर्यंत पुर्ण करण्याचा एक महत्वाकांक्षी संकल्प शासनाने केला आहे. यासाठी म.न.पा. स्तरावर व्यापक स्वरुपात एक दिवसीय सर्वेक्षण घेण्यात येणार आहे.

या सर्वेक्षणात शालाबाहय बालकांच्या नोंदी गजबजलेल्या वस्ती बसस्थानक, रेल्वेस्थानक, सिग्नलवर वस्तू विकणारी व भिक मागणारी मुले झोपडपट्टीत राहणारी, विविध ठिकाणी फिरुन सर्वेक्षण करावयाचे आहे. सर्वेक्षणाचे व्यापक उदबोधन होण्यासाठी सदर विषयाचे अवलोकन करणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.महापौर**- सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/२०३/१५
दिनांक - ७/७/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.